# मानवी जीवनातील गूढ रहस्ये

## (भाग १)

लेखक

स्वामी दत्तावधूत

ॐ वनिता बुक्स
मुंबई – ४०००१२

☯ **ॐ वनिता बुक्स**

☯ **पुष्प चौथे**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथमावृत्ती | : मार्च १९९८ | षष्ठमावृत्ती | : मार्च २०१३ |
| द्वितियावृत्ती | : मे २००२ | सप्तमावृत्ती | : जाने. २०१४ |
| तृतीयावृत्ती | : मे २००६ | अष्टमावृत्ती | : मे २०१५ |
| चतुर्थावृत्ती | : सप्टें. २००८ | नवमावृत्ती | : फेब्रु. २०१६ |
| पंचमावृत्ती | : डिसें. २०१० | दशमावृत्ती | : जून २०१८ |

☯ (सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन )

☯ **प्रकाशक**

ॐ वनिता बुक्स

बी २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था

डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई – ४०० ०१२.

दूरध्वनी : ०२२ –२४१८७३३९

☯ **मूल्य : रु. १३०/–**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | जन्म मृत्यू रहस्य | ५ |
| २. | कर्म | ७ |
| ३. | कर्माचे कायदे | १६ |
| ४. | शक्तींचे विश्व | २५ |
| ५. | अदृश्य मदतनीस | २९ |
| ६. | तारक शक्ती- मारक शक्ती | ३९ |
| ७. | तांत्रिकांच्या कथा | ६१ |
| ८. | धवल विद्येचे अनुभव | ६५ |
| ९. | प्राणी, पक्षी, झाडे यांच्यामागील चांगली व वाईट शक्ती | ७४ |
| १०. | भारतातील गूढ स्थाने | ८१ |
| ११. | दैवी शक्ती | ८५ |

१२. दैवी शक्ती प्राप्त करण्याचे मार्ग ९२

१३. मंत्रशास्त्र ९८

१४. प्रेम-शांती-आनंद १०४

१५. आत्मा १०८

१६. आत्म्याची अधोगती ११७

# १. जन्म मृत्यू रहस्य

या सृष्टीमध्ये असंख्य गूढ गोष्टी आहेत. यातील बऱ्याच गोष्टी विद्वानांना नैसर्गिक वाटत असल्या तरी त्यामागील गूढतेचा शोध अद्याप लागायचा आहे. अशा काही गूढ रहस्यमय गोष्टींकडे आपण लक्ष टाकणार आहोत.

गरोदर स्त्रीच्या भोवती हजारो आत्मे घोटाळत असतात. गरोदर स्त्री जवळ पुरेसे संरक्षण नसेल किंवा गरोदर स्त्रीला जर पिशाच्च बाधा असेल, तर पिशाच्च सृष्टीतील एखादा दुष्ट आत्मा जबरदस्तीने त्या स्त्री गर्भात प्रवेश करतो. परिणामी विकृत, कुरूप, खुजे असे मूल जन्माला येते. परंतु अशी घटना क्वचितच घडते.

प्रत्यक्षामध्ये गरोदर स्त्रीला सातवा महिना लागल्यानंतर त्या घराण्याच्या म्हणजे माता-पित्याच्या ऋणानुबंधानुसार जीवात्मा गर्भामध्ये प्रवेश करतो. या जन्माला आलेल्या मनुष्यामध्ये पूर्वजन्मांतील कर्मानुसार प्रवृत्ती असतात. तद्नुसार विशिष्ट ग्रहस्थितीतच मानवाचा जन्म होतो. त्यामुळे ज्योतिषशास्त्राचे सूक्ष्म ज्ञान असणारे ज्योतिषी या मानवाचे पूर्ण

भविष्य तंतोतंत वर्तवू शकतात. अगदी आजकालचे सामान्य ज्योतिषीही कुंडली पाहताच ही व्यक्ती डॉक्टर होणार की वकील, की इंजिनियर हे सांगू शकतात. कुंडलीवरून या स्त्री-पुरुषाला पुढे मूल होईल की नाही हेही सांगता येते. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी असे ज्योतिषी होते, की जे किती मुलगे व किती मुली होतील हेही अचूक सांगत असत.

अशा प्रकारे मनुष्य म्हणजे हाडामांसाचा देह नसून हाडामांसाचा देह हेच मनुष्याचे किंवा आत्म्याचे निवासस्थान आहे. ईश्वराने काही काळापुरते वापरायला दिलेले हे भाड्याचे घर आहे.

येथे जन्मल्यावर जर सात्त्विक कर्मे म्हणजे दान-धर्म केला तर शांती, सद्गती व अखंड समाधानाची प्राप्ती होते. पण फक्त स्वार्थच केला तर मानवाची अधोगती टळत नाही.

◆ ◆ ◆

# २. कर्म

या पृथ्वीतलावर मानव जन्माला आल्यानंतर जर त्याने दान, धर्म, परोपकार, ईश्वरभक्ती इत्यादी सद्गुणांचे आचरण केले तर हाडामांसाच्या देहात त्याचा जो आत्मा असतो तो तेजस्वी होऊ लागतो. त्या आत्म्याला वेगळे रूप प्राप्त होते. हे शरीर जेव्हा मरते, तेव्हा त्या देहातून एक तेजस्वी सूक्ष्मदेहधारी मनुष्य बाहेर पडतो. त्याच्या स्वागतासाठी वातावरणामध्ये अनेक तेजस्वी आत्मे गोळा झालेले असतात. अत्यंत प्रेमाने त्याचे स्वर्गात स्वागत केले जाते.

हे लिहित असताना मला एक गोष्ट आठवते...

एखाद्या नापास होणाऱ्या विद्यार्थ्याला दोन-चार ग्रेस मार्क्स मिळाल्याने तो पास होतो. तसा एक मनुष्य काही ग्रेस मार्क्स मिळाल्याने स्वर्गामध्ये गेला. तेथे गेल्यावर त्याने पाहिले की, महान पुण्यवान आत्म्यांच्या मस्तकावर रत्नजडित मुकुट शोभत होते. त्यांची वस्त्रे तेजाने चमकत होती. त्यामानाने या सज्जनाची वस्त्रे अतिसामान्य होती व मुकुट वगैरे याला काहीच प्राप्त झालेले नव्हते...

त्याने तेथील एका देवदूताला याविषयी विचारले. तेव्हा तो

देवदूत म्हणाला...

‘‘पृथ्वीतलावर तू सज्जनतेने जगलास म्हणून स्वर्गात आलास. पण हे लोक जेव्हा पृथ्वीवर होते तेव्हा सज्जन तर होतेच, पण सद्‌गुणीही होते. यांच्या अंगावरील एकेक अलंकार व त्यातील रत्ने ही सद्‌गुणांची प्रतिके आहेत. एकेक रत्न म्हणजे सद्‌गुण व एकेक अलंकार म्हणजे ईश्वर भक्तीचा एकेक प्रकार होय!’’

वरील बोधकथा बरेच काही सांगून जाते.

पुनर्जन्माच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत, त्यावरून हे सिद्ध होते की, मनुष्य आपल्या कर्मानुसार सद्‌गती किंवा दुर्गतीला जात असतो. याविषयी रहस्यमय गूढ विषय असा की...

मनुष्याच्या कर्मानुसार त्याच्या आत्म्याला रूप किंवा सूक्ष्मदेह प्राप्त होतो. सिद्धयोग्यांना ही रूपे दिसू शकतात.

उदा : **A** या व्यक्तीने खूप चांगली कर्मे केली. दान, परोपकार, दया, करुणा, इतरांना मदत करणे अशा सद्‌गुणांनी व सद्‌प्रवृत्तींनी जीवन व्यतीत केले. समजा, अशी व्यक्ती जर वयाच्या ९० व्या वर्षी मृत्यू पावली तर तिच्या देहातून ३५-३६ वर्षाचा तेजस्वी रूपाचा तरुण युवक बाहेर पडेल व स्वर्गलोकाकडे प्रयाण करेल.

अर्थात ही अवस्था फक्त पुण्यवान जीवांची होते. योगी, संत यांच्यासाठी नियम याहून वेगळे आहेत. ते स्वतःच्या इच्छेनुसार देह धारण करू शकतात.

**B** या व्यक्तीने फारसे पुण्य केले नाही व फारसे सत्कर्मही केले नाही. पण सज्जनतेने जगला, स्वत:च्या कुटुंबासाठी जगला. हे करताना थोडी ईश्वरभक्ती पण केली. जर अशी व्यक्ती वयाच्या ५० व्या वर्षी मृत्यू पावली, तर मृत्यूनंतर प्राप्त होणारा देह हा ५०-५५ वर्षांचा असेल व तो चौथ्या लोकात जाईल. तेथे त्याला थोडाफार त्रास भोगावा लागेल व परत मनुष्य योनीत जन्म प्राप्त होईल.

**C** या प्रकारातील माणसे संकुचित मनाची, अत्यंत कंजूष, महास्वार्थी, खूप दुर्गुणी व भांडकुदळ प्रवृत्तीची, द्वेष, मत्सर करणारी असतात.

आता अशा लोकांच्या बाबतीत ईश्वरी नियम वेगवेगळे आहेत. कुणाला कुठला नियम लागू पडेल व कोण कोठे जाईल हे सांगता येणे कठीण असते. परंतु...

मृत्युसमयी अशा मनुष्यदेहामधून कुत्रा, कावळा, मांजर, पक्षी अशी रूपे धारण करून आत्मा बाहेर पडतो, असे मी पाहिलेले आहे. यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही की, मनुष्याच्या कर्मानुसार त्याच्या आत्म्याला रूप प्राप्त होत असते.

**D** या प्रकारातील माणसे ही याहून महाभयंकर असतात. ही माणसे पृथ्वीतलावर आतंकवाद माजवतात. खून करणे हाच त्यांचा पेशा असतो. अशा लोकांना किमान ४८ लक्ष वर्षे नरक यातना भोगाव्या लागतात. यांचे आत्मे कधी प्रचंड शिळांमध्ये राहतात, उन्हाने त्या शिळा तापतात, तो प्रचंड ताप यांना सहन

होत नाही. कधी भूगर्भातील लाव्हारसामध्ये अशा आत्म्यांना भाजले जाते, तर कधी हे आत्मे लोखंडात राहतात. ते लोखंड गरम केले जाते व आत्म्याला प्रचंड यातनांना तोंड द्यावे लागते.

अशा प्रकारे विविध प्रकारचे आत्मे त्यांच्या कर्मानुसार सुख-दुःख भोगतात.

प्रचंड दुःख व यातनांनी असा हा पापी आत्मा जेव्हा परमेश्वराचा धावा करतो, तेव्हा यातून थोडीशी सूट म्हणून यातील काही आत्म्यांना झाडांमध्ये निवास करण्यास परवानगी मिळते. वड, पिंपळ, आंबा, औदुंबर अशा वृक्षांमध्ये अशा आत्म्यांना मी पाहिलेले आहे. आत्मा जर चांगला असेल, तर ते वृक्षही तेजस्वी दिसतात व आत्मा जर दुष्ट असेल तर ते वृक्ष तेजहीन व रूक्ष दिसतात.

झाडांमध्ये निवास करणाऱ्या चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारातील आत्म्यांना मी पाहिलेले आहे. चांगल्या आत्म्यांनी प्रेम दिले तर वाईट आत्म्यांनी सतत छळ केला, त्रास दिला.

माझ्या स्वानुभवाप्रमाणे झाडांमध्येही चांगले, वाईट आत्मे राहतात. चांगले आत्मे वेळप्रसंगी दर्शनही देतात, बोलतात, मार्गदर्शन करतात किंवा मदतही मागतात, तर वाईट आत्मे त्रास देतात.

या संदर्भात माझे काही अनुभव मी पुढे लिहित आहे.

## अनुभव

१) १९७७ मध्ये नागार्जुनसागर येथे मी आश्रम करून

राहायचे ठरविले. त्याप्रमाणे जागा पसंत करून प्रथम एक झोपडी बांधली. या झोपडीच्या आजूबाजूला मी स्वत: वड, औदुंबर, पिंपळ इतर बरीच झाडे लावली. विशेष म्हणजे नैसर्गिक क्रमापेक्षा ही झाडे अतिशय वेगाने वाढली.

त्या काळात माझे जीवन प्रवासी असल्याने झाडांना पाणी देण्यासाठी एक नोकर ठेवलेला होता.

एकदा असाच प्रवासाहून परत आल्यावर मी काही वेळ ध्यानस्थ बसलो असताना, ईशान्य दिशेकडील पिंपळ अचानक मला ध्यानात दिसू लागला व आवाज ऐकू आला.

''गेल्या आठ दिवसात रामय्याने (नोकराने) मला पाणी दिलेले नाही.''

ध्यान आटोपल्यावर मी रामय्याला बोलावून विचारले, ''त्या पिंपळाला किती दिवसात पाणी दिलेले नाहीस?''

''दररोज अगदी न चुकता पाणी देतो स्वामी!'' रामय्याने मला उत्तर दिले...!

यावर मी म्हणालो, ''गेल्या आठ दिवसात तू त्या पिंपळाला पाणी दिलेले नाहीस...! आता जास्त बडबड न करता, प्रथम त्या पिंपळाला पाणी दे...!'' माझा उग्र अवतार पाहून रामय्याने निमूटपणे त्या पिंपळाला पाणी दिले.

ही गोष्ट झाल्यानंतर सुमारे एक तासाने हिल कॉलनी येथून गुंडू नरसिंहा नांवाचा भक्त आला, त्याला रामय्या म्हणाला,

''गुंडू नरसिंहा आज एक अघटित घडले. मी गेल्या आठ

दिवसात पिंपळाला पाणी दिले नाही ही गोष्ट अगदी खरी आहे, पण हे स्वामींना कसे कळले? त्यांनी रामय्या! तू आठ दिवसात पिंपळाला पाणी दिले नाहीस हे कसे सांगितले?''

गुंडू नरसिंहाने ही हकिकत नंतर मला सांगितली.

यावरून माझी खात्री पटली...

झाडाने जे सांगितले ते खरे होते व रामय्या खोटं बोलला होता. या दोन्ही गोष्टी झाडाच्या आत्म्याने सिद्ध करून दाखविल्या होत्या.

यानंतर बऱ्याच वर्षांनी एका विशाल आकाराच्या साधूने त्या वृक्षातून बाहेर येऊन दर्शन दिले व तेथे शिवलिंगाची स्थापना करण्यास सांगितले. त्याप्रमाणे लेखकाने केले.

२) आश्रमापासून हजार मैल दूर अंतरावर एका स्थानी एकांतात मी साधना करीत असताना आश्रमातील औदुंबर वृक्षाने ध्यानात येऊन सांगितले की, ''मला मातीची अत्यंत आवश्यकता आहे, नाहीतर मी पडून जाईन.''

ध्यान समाप्तीनंतर मी तात्काळ आश्रम व्यवस्थापकाला पत्र लिहून त्या औदुंबर वृक्षाला मातीचा भराव देण्यास सांगितले.

३) आश्रमामध्ये दररोज रात्री हनुमान चालीसा म्हणून नारळ फोडला जातो.

१९८० मध्ये पादुकांची स्थापना झाली. त्या दिवसापासून आजतागायत ही प्रथा आहे. पादुका स्थापनेच्या दिवशी, हनुमान चालीसा समाप्तीच्या वेळी, मी सहज एक चौकोनी आकाराचा

एका हाताच्या पंज्यामध्ये मावेल एवढा दगड घेतला व त्यावर नारळ फोडला. त्यानंतर त्याच दगडावर ''नारळ फोडत जा!'' असे तेथील भक्तांना सांगितले. त्याप्रमाणे दररोज हनुमान चालीसा म्हटल्यानंतर त्या दगडावर नारळ फोडणे भक्तांनी चालू ठेवले.

अशी काही वर्षे गेल्यावर एक दिवस एका भक्ताने नारळ फोडण्यासाठी एक लोखंडी सळी बनवून दिली. पुजाऱ्याने त्या दिवशी त्या सळीनेच नारळ फोडला व दगड एका बाजूला ठेऊन दिला. ही घटना घडली तेव्हा मी आश्रमामध्ये आरामखुर्चीत बसून पुस्तक वाचत होतो. अचानक त्या दगडातील आत्म्याने माझ्याकडे तक्रार केली.

म्हणून मी चौकशी केली असता, सळी प्रकरण समजले, तेव्हा उपस्थित असणाऱ्या सर्व लोकांना मी सांगितले...

''ज्याप्रमाणे तुम्ही यथाशक्ती माझी सेवा करीत आहात, त्याप्रमाणे हा दगडही येथे सेवा करीत आहे. बारा वर्षे याची सेवा पूर्ण झाल्यावर याचा उद्धार होईल.''

कसलेही ज्ञान नसताना अगदी अचानक माझ्या मुखातून वरीलप्रमाणे सांगितले गेले. किंबहुना त्या दगडामधील आत्माच माझ्या मुखाने बोलला.

यानंतर बारा वर्षांनी म्हणजे १९९२ मध्ये मुख्य मंदिरासमोर (पादुकास्थानासमोर) हनुमान मंदिर बांधायचे ठरले, त्याप्रमाणे मंदिर बांधून झाल्यावर हनुमान मूर्तीची प्रतिष्ठापना करताना त्या दगडाच्या आत्म्याने येऊन सांगितले....

''माझी बारा वर्षे सेवा पूर्ण झाली आहे. मी या घटनेची वाट पहात होतो. आता मला तुम्ही हनुमान मूर्तीच्या खाली ठेवा. माझे काम संपले, मला देवरूप प्राप्त झाले आहे.'' असे म्हणून त्या दगडाच्या आत्म्याने हनुमान रूपात दर्शन दिले. यानंतर मी त्या दगडाला हनुमान मूर्तीच्या पीठात बसविले.

आज शेकडो लोक त्या हनुमान मूर्तीला व पर्यायाने त्या दगडाला प्रदक्षिणा घालीत आहेत.

नैसर्गिक जीवन व जीवात्म्याची शक्ती यांच्यातील वेगळेपणा दाखवून देण्यासाठी वरील तीन अनुभव कथन केले आहेत. यावरून पुढील गोष्टी लक्षात येतात.

| **नैसर्गिक सत्ता** | **दैवी सत्ता** |
|---|---|
| **१) गर्भधारणा होते. गर्भाची वाढ होते.** | १) सातव्या महिन्यामध्ये गर्भात जीवात्म्याचा प्रवेश होतो. |
| **२) दगड, शिला** | २) एखाद्या शिलेमध्ये आत्म्याने प्रवेश करणे किंवा परमेश्वराने आत्म्यांना शिलांमध्ये पाठवणे. |
| **३) नैसर्गिकरित्या फळ–बीजांपासून वृक्षांची निर्मिती होते.** | ३) वाढ झालेल्या वृक्षामध्ये जीवात्मा राहतो किंवा ईश्वरी सत्तेनुसार जीवात्मे राहतात. |

कुठल्या जीवात्म्याला कुठे पाठवायचे हे दैवी सत्ता त्या त्या जीवात्म्याच्या कर्मानुसार ठरवित असते.

जीवात्मा मनुष्य देहात जेव्हा प्रवेश करतो तेव्हा मनुष्य होतो. दगडामध्ये प्रवेश करतो, तेव्हा तो दगड होतो. झाडामध्ये प्रवेश करतो तेव्हा तो झाड होतो.

हे सर्व करताना तो ज्यामध्ये प्रवेश करतो ''तो मी आहे!'' हा भाव प्रत्येक वेळी त्याच्या अंतरंगात कायम असतो..

म्हणजे... मी झाड आहे. मी मनुष्य आहे. मी कुत्रा आहे...

असे जीवात्म्याला वाटत राहते. विशेष म्हणजे हे जीवात्मे माणसांच्या भाषेत बोलतात व माणसांच्या रूपात राहतात. म्हणजे शिळेतून किंवा वृक्षातून जेव्हा जीवात्मा बाहेर येतो, तेव्हा तो मनुष्य रूपातच असतो. फक्त त्याला ''मी मनुष्य आहे.'' अशी जाणीव नसते तर ''मी वटवृक्ष आहे'', ''मी शिळा आहे'' असे वाटत असते.

म्हणूनच तत्त्वज्ञानी मानवाला म्हणतात, ''अरे मानवा! तू स्वत:ला मानव का समजतोस ? मानवी देह हे तुझे साधन आहे. स्वत:ला मनुष्य समजू नको! तू कोण आहेस? याचा शोध घेण्याचा प्रयत्न कर, मग तुला कळेल,

**''तू ईश्वर आहेस''** (You are Light)

◆ ◆ ◆

# ३. कर्माचे कायदे

जीवात्म्याचा नेमका आकार काय आहे हे समजणे अतिशय कठीण आहे. कित्येकवेळा वटवृक्ष, औदुंबर, पिंपळ, आंबा अशा अनेक वृक्षांतून अत्यंत तेजस्वी आत्मे राहतात. हे देवतात्मे असतात. यक्ष-यक्षिणीही असतात. काही ठिकाणी याच वृक्षांमध्ये ब्रह्मसमंध, भूत, प्रेतही राहतात. बाभळीच्या वृक्षामध्ये मात्र भूतेच असतात.

नागाच्या रूपामध्ये पुष्कळवेळा योगी राहतात. शिवाय नागदेवताही खूप सामर्थ्य संपन्न असतात.

पृथ्वीतलावर सध्या मनुष्यांची रेलचेल झालेली असून लोकसंख्या पराकोटीला जाऊन पोहोचलेली आहे परंतु पृथ्वीतलावरील काही मनुष्यांचे आत्मे हे प्राण्यांचे आहेत. याचे प्रमाण नक्की सांगता येणे कठीण ! फक्त एवढेच सांगता येईल की, परमेश्वराने प्राणी सृष्टीतील जीवात्म्यांना मनुष्यरूपाने जन्म देऊन स्वत:चा उद्धार करण्याची संधी दिली आहे.

जीवात्म्याला मनुष्यदेह प्राप्त झाला आहे. आता मानवी गुण म्हणजे परोपकार, दान व ईश्वरभक्ती हे आचरणात आणून त्याने

खऱ्या अर्थाने मनुष्य बनायचे आहे. जर हे जमले तर ईश्वर पुढील विकास कसा करायचा याचे ज्ञान देईल व न जमले तर पुनश्च प्राणी लोकात अनेक जन्म घ्यावे लागतील.

समजा, एक मनुष्य आहे, त्याच्या काही पापकर्मांमुळे त्याच्या आत्म्याला कावळ्याचे किंवा कुत्र्याचे रूप प्राप्त झाले आहे. असा मनुष्य जेव्हा मरतो, तेव्हा त्याच्या देहातून एक मोठ्या आकाराचा कावळा किंवा कुत्रा (जे रूप जीवात्म्याला कर्मानुसार प्राप्त झाले असेल ते) बाहेर पडतो. त्या जीवात्म्याला कावळ्याची किंवा कुत्र्याची योनी प्राप्त झाली असे म्हणतात.

कावळा, कुत्रा किंवा अन्य प्राणी, पशु, पक्षी, वृक्ष इत्यादी जी योनी प्राप्त झाली असेल त्या रूपामध्ये तो अनेक वर्षे सूक्ष्म सृष्टीत राहतो. नंतर योग्य वेळी त्याचा त्याच योनीत जन्म होतो. जन्म होईपर्यंत त्या रूपामध्ये तो अनेक वर्षे सूक्ष्म सृष्टीत फिरत राहतो. जन्म झाल्यानंतर अनेक प्रकारच्या दु:ख व यातनांना तोंड देत त्याला जगावे लागते व जेव्हा त्याचा मृत्यू होतो, तेव्हा त्याची त्या योनीतून सुटका होते व पुनश्च तो मनुष्य रूपाने जन्माला येतो. या ठिकाणी जर प्राणी किंवा अन्य योनी प्राप्त होण्यापूर्वी, मनुष्य जन्मात जर खूपच पाप केले असेल तर... अनेक जन्म प्राण्यांचे प्राप्त होऊ शकतात किंवा यातना लोकात अनेक जन्म राहावे लागते. पुष्कळवेळा जन्म मिळण्यासच हजारो वर्षे लागतात.

पुष्कळवेळा लोक असा प्रश्न विचारतात की, ''प्राण्यांना

प्रारब्ध असते का?''

हो! प्राण्यांना प्रारब्ध असते.

म्हणूनच तर एक कुत्रा रस्त्यावरून उपाशी-तापाशी फिरत असतो. त्याला कित्येक दिवसात खायला मिळालेले नसते, अनेक रोग त्याला होतात व औषधच काय पण सहानुभूतीही त्याच्या नशिबी नसते. अशा प्रकारे पूर्वीच्या मनुष्य जन्मात केलेल्या अनेक चुकांचे प्रायश्चित्त भोगत रस्त्यावर तडफडत तो मृत्यू पावतो.

याउलट...

दुसरा कुत्रा मर्सिडिज गाडीतून फिरतो. त्याची काळजी घेण्यासाठी नोकर व डॉक्टर्स हजर असतात. कोट्याधीश मालक त्याला रोज फिरायला नेत असतो.

या कुत्र्याला हे जे नशीब प्राप्त झाले त्याचे कारण, पूर्वीच्या मनुष्य जन्मात त्याने खूप चांगली कर्मे केली, परंतु थोड्याशा वाईट कर्मांमुळे काही काळ त्याला ही कुत्र्याची योनी प्राप्त झालेली असते. येथे एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, भौतिक सुख हे दानाशिवाय प्राप्त होत नाही. या कुत्र्याने पूर्वीच्या मनुष्य जन्मात खूप दान केले म्हणून त्याला या योनीतही सुखाचा लाभ झाला. कर्माचा हा नियम आहे, की कर्म मग ते चांगले असो अथवा वाईट, कुठल्याही योनीत तुमची पाठ सोडत नाही.

कुत्र्याच्या योनीतील आणखी एक प्रकार म्हणजे पोलीसांचा कुत्रा!

हे कुत्रे वासाने चोराला अथवा गुन्हेगाराला पकडून देण्याचे काम करतात.

हे कुत्रे पूर्वजन्मात नक्कीच मनुष्य असले पाहिजे. त्यांनी पोलीसांना हैराण केले असले पाहिजे. गुन्हेगारीतून जो पैसा मिळवला त्या पैशातून थोडाफार दानधर्मही केलेला असला पाहिजे. या सर्वांचा परिणाम म्हणून ईश्वराने त्याला कुत्र्याचा जन्म दिला. कुत्र्याचा जन्म जीवात्म्याला इमानदारी शिकवितो. पूर्वजन्मातील चोरी व गुन्हेगारी करणारी बुद्धिमत्ता, कुत्र्याच्या जन्मात गुन्हेगारांना पकडण्यासाठी उपयोगी आल्याने बुद्धिही स्वच्छ होते.

अशा प्रकारे जीवात्म्याला **कर्म तैसे फळ** अथवा **जैसी करनी वैसी भरनी** या न्यायाला तोंड द्यावेच लागते. हा कर्माचा नियम आहे. **जसे पेरावे तसे उगवते** यातून कुणाचीही सुटका नाही. ईश्वराच्या दरबारात कोणीही लाच खात नाही. तेथे कुणालाही खूष करण्याचा प्रयत्न उपयोगी पडत नाही. विशेष म्हणजे मानवी बुद्धीचा तेथे काहीच उपयोग होत नाही. मानवाला त्याच्या कर्माप्रमाणे फळ मिळत राहते.

प्राणी, पशु, पक्षी, झाडे, किडे, जलचर, भूचर, खेचर, उद्भिज अशा विविध योनीतून प्रवास करीत जीवात्मा मनुष्य योनीत जन्म घेतो. मनुष्य योनी ही मधली अवस्था आहे. पुष्कळवेळा अधोलोक, खालचा लोक व पृथ्वीच्या पोटातील लोक, पिशाच्च लोक, उपदेवता लोक, जललोक, यक्षलोक अशा विविध लोकातील जीवात्मे मनुष्य लोकात जन्माला येतात.

मनुष्य लोकात कर्माचा कायदा आहे. येथे जसे कराल तसे फळ मिळते. म्हणून पृथ्वीला आत्म्यांची कर्मभूमी तसेच मनुष्य योनीला कर्मयोनी असे म्हटले आहे.

मनुष्येतर जीवात्म्याला जेव्हा ईश्वर कृपा करून मनुष्य जन्म देतो, तेव्हा त्या जीवात्म्याला प्रथम त्याची सूचना मिळते की, अमुक अमुक स्त्रीच्या पोटी तुला जन्म मिळणार आहे.

एखादा जीवात्मा जर हजारो वर्षे नरक यातना भोगत असेल व त्याच्या शिक्षेचा काळ संपत आला असेल तरच त्याला वरीलप्रमाणे सूचना मिळते. अशी सूचना जेव्हा जीवात्म्याला मिळते तेव्हा त्याला जो आनंद होतो त्या आनंदाची तुलना पृथ्वीवरील कुठल्याही आनंदाशी करता येणार नाही.

आपल्याला परत मनुष्य जन्म मिळणार, या यातना लोकातून आपली सुटका होणार याचा त्या जीवात्म्याला होणारा आनंद वर्णनातीत असतो. परंतु जर जीवात्मा वरच्या लोकातील असेल तर त्याला खाली येण्यात फारसा आनंद होत नाही. तो फक्त आध्यात्मिक प्रगतीसाठी खाली येतो. केवळ नाईलाज म्हणून खाली येतो, कारण वरच्या लोकात म्हणजे स्वर्गलोकात किंवा उच्च स्वर्गलोकात आनंद भरपूर असला तरी आध्यात्मिक प्रगती खूपच मंदगतीने होत असते. यासाठी काही आत्मे नाईलाजाने पृथ्वीतलावर जन्म घेत असतात.

याशिवाय काही महान आत्मे ईश्वरी कार्यासाठी, मानवाचे कल्याण करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म घेत असतात.

अशा प्रकारे विविध स्तरावरून पृथ्वीतलावर मानवरूपाने आत्मे, जीवात्मे, भूतात्मे, असुरात्मे, वृक्षात्मे, जलचरात्मे, खेचरात्मे  जन्म घेत असतात.

पृथ्वी ही संपूर्ण विश्वाची आध्यात्मिक मध्यबिंदू मानली जाते. येथून प्राणी वर किंवा खाली जातो.

पृथ्वीवर जन्माला आल्यावर जीवात्मा हे विसरतो की तो कोण आहे? व कशासाठी त्याने जन्म घेतला आहे?

जर तो खालच्या लोकातून जन्माला आला असेल तर त्याचे विचार व आचार हलक्या दर्जाचे असतात. तो संकुचित मनाचा असतो.

आजकाल एक नवीन प्रकार पाहायला मिळतो, तो म्हणजे धनपिपासूवृत्ती! पृथ्वीवर अशा प्रकारे हजारो लाखो प्रकारच्या प्रवृत्तींचा गोंधळ माजलेला आहे.

याशिवाय पोट कसे भरायचे? ही सर्वात मोठी समस्या मानवाला सतावत असते. अशा अनेक समस्यांतून त्याला ईश्वराची आठवण करण्यास किंवा स्वत:ची प्रगती करण्यास वेळच सापडत नाही.

सुदैवाने ज्याला वेळ सापडतो ते आळशी असतात, त्यांना काही करावेसे वाटत नाही.

अशा सर्व लोकांनी नर-जन्मरूपी मिळालेली सुवर्णसंधी वाया घालवलेली असते व ते पुनश्च जन्म-मरणरूपी चक्रात

अडकले जातात व विविध प्रकारच्या शिक्षा भोगत विविध योनीतून फिरत राहतात.

येथे मी फक्त सामान्य मनुष्याच्या बाबतीत लिहिलेले आहे.

जे लोक खून करतात किंवा वाईट मार्गाने जीवनक्रम व्यतीत करतात त्यांच्याविषयी या पुस्तकात लिहिण्यात काही अर्थ नाही.

सर्वसाधारण मृत्यू पावल्यावर आत्मा कुठल्या लोकात गेला हे पाहण्याच्या अनेक पद्धति हिंदू धर्मात आहेत, परंतु त्यात किती तथ्य आहे हे समजण्यास मार्ग नाही. सर्वसामान्यपणे प्राण जर डोळे, कान, तोंड, नाक या मार्गाने गेला तर जीव स्वर्गात जातो, देवलोकात जातो.

फक्त योग्याचाच प्राण ब्रह्मरंध्रातून म्हणजे मस्तकातून बाहेर पडतो. असा आत्मा थेट परमेश्वरापर्यंत जाऊन पोहोचतो.

परंतु ज्यांचा प्राण मल-मूत्र मार्गाने जातो, असे लोक नरकात म्हणजे विविध प्रकारच्या घाणेरड्या योनीत जातात. यात अगदी पिशाच्च लोकापासून कृमी कीटकापर्यंत सर्व प्रकारच्या योनी येतात.

मनुष्य मृत झाल्यावर त्याचा जीवात्मा कुठल्या लोकात गेला किंवा कुठल्या योनीत गेला हे योग्यांना तात्काळ कळते.

संतांच्या, योग्यांच्या अंत:करणात अपार करुणा भरलेली असल्याने त्यांना त्या सर्व जीवात्म्यांची खूप दया येत असते, पण

नुसती दया येऊनही काही उपयोग होत नाही. कारण पृथ्वीतलावरील मानव काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतोच. तो स्वत:ला सर्व काही कळते या भ्रमात सदैव राहतो. हिताच्या चार गोष्टी सांगितलेल्या त्याला कधीही आवडत नाहीत. त्याला फक्त कौतुक आवडत राहते. संतांनी, योग्यांनीही आपले कौतुक करावे, स्तुती करावी, असे आजच्या मानवाला वाटते. परिणामी त्याला त्याच्या दर्जाचे व्यापारी भेटतात.

परमेश्वराच्या राज्यामध्ये कल्पनातीत सुसूत्रता आहे. तेथे जराही कधी चूक होत नाही. ज्याचा स्वभाव परोपकारी आहे, अशा व्यक्तीला सतत परोपकाराची संधी मिळेल, अशी व्यवस्था केली जाते. परोपकार करणे किंवा इतरांना मदत करणे हे ज्यांच्या स्वभावातच नाही अशा स्वार्थी लोकांनाही अनेकदा परोपकाराची किंवा इतरांना मदत करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते व हजार वेळा संधी देऊनही उपयोग झाला नाही तर मग कठोर शिक्षेची तरतूद ईश्वरी शासन व्यवस्थेत केलेली आहे.

परमेश्वराच्या मानवाकडून फक्त दोनच अपेक्षा असतात.

१) तुमचे नियतकर्म व्यवस्थित करा! (Do your Duty properly) आणि...

२) परोपकार करा! (Don’t miss a single chance to help others)

परंतु आजकालच्या मानवाला या दोन साध्या गोष्टी करणेही जमत नाही. या दोन गोष्टी सोडून तो अशा काही गोष्टी करतो, की

ज्यामुळे ईश्वरी कृपा प्राप्त करण्याची संधी तो गमावतो.

ईश्वराचे संपूर्ण जीवसृष्टीवर शासन चालते. त्याच्या शासनात सुईच्या टोकाएवढीही चूक होत नाही. प्रत्येक आत्म्याच्या अनेक जन्मातील कर्मांचा हिशेब तेथे अगदी अचूक ठेवलेला असतो. याविषयी अनेक पुरावेही उपलब्ध आहेत.

परमेश्वराकडे फक्त पृथ्वीतलावरील जीवांचा हिशेब नसून, त्रिमितीच्या पलीकडेही अनेक विश्वे असून, त्या अनेक विश्वातील प्रत्येक जीवाचा हिशेब अगदी अचूक ठेवलेला असतो.

ईश्वरी शासन व्यवस्थेमध्ये करोडोंच्या संख्येने मदतनीस असून, हे सर्व आपापले कार्य व्यवस्थित पार पाडत असतात.

पृथ्वीतलावरील माणसाच्या मनातील श्रद्धा दृढमूल करणे, त्याला ज्ञान देणे, थोडीशी भक्ती, नामस्मरण केले की लगेच अनुभव देणे, संकटातून रक्षण करणे अशी असंख्य प्रकारची कार्ये देवदूत करीत असतात.

पुढील प्रकरणात मानवी जीवनामागील अशा विविध शक्तींचा विचार करू!

◆ ◆ ◆

# ४. शक्तींचे विश्व

पूर्वजन्मात किंवा पूर्वींच्या अनेक जन्मांत तसेच या जन्मातील सत्कर्मांमुळे मनुष्य सतत चांगल्या किंवा शुभ शक्तीच्या अंतर्गत राहतो. एखादी व्यक्ती शुभ शक्तीच्या अंतर्गत असेल तर ती कशी असेल ते पाहू!

व्यक्ती जर शंभर टक्के शुभ शक्तीच्या अंतर्गत असेल, तर ती सदैव प्रसन्न अंत:करणाची, इतरांना आनंद देणारी, परोपकारी, प्रेमळ व ईश्वर भक्त असते. तिच्या प्रत्येक कार्यात तिला यश येत राहते. अशी व्यक्ती अत्यंत नम्र असते व शक्यतो कुणाचेही मन दुखवत नाही.

अशा व्यक्ती कालांतराने आध्यात्मिकदृष्ट्या प्रगत होतात व त्यांचा दैवी शक्तीत प्रवेश होतो.

वातावरणातील आत्मे, स्वर्गातील देवता, देवदूत, संत, महात्मे नेहमी सज्जनाला मदत करण्यास तत्पर असतात. त्यामुळे आध्यात्मिकदृष्ट्या प्रगत झालेल्या व्यक्ती जे बोलतात ते खरे होते. त्यांना वाचासिद्धी व अंत:स्फूर्ती प्राप्त होते. परमेश्वरी संरक्षण

प्राप्त झालेल्या अशा व्यक्ती समाजातील दु:खितांचे अश्रू पुसण्याचे काम करतात. लोकांना वाईट मार्गापासून परावृत्त करून चांगल्या मार्गाला लावण्याचे प्रयत्न करतात. त्यांच्या या प्रयत्नात वातावरणात फिरणारे अनेक चांगले आत्मे, देवदूत मदत करतात. अदृश्य रूपाने अनेक आत्मे संरक्षण व मार्गदर्शन करतात.

कोणालाही समजेल अशा सोप्या भाषेत जरी हे लिहिलेले असले तरी प्रत्यक्षामध्ये प्रकार थोडा वेगळा असतो.

आपल्या मेंदूमध्ये तसेच शरीरात इतरही अनेक ठिकाणी शक्तींची अनेक केंद्रे असून, पूर्वजन्मात जर चांगली कर्मे केली असतील तर चांगली शक्ती खेचणारी केंद्रे जागृत होतात. परिणामी वातावरणातील चांगल्या शक्ती किंवा दैवी शक्ती, चांगले आत्मे अशा सर्व गोष्टी चांगल्या माणसाकडे खेचल्या जातात.

म्हणून म्हणतात, "Good Attracts Good!"

मनात सतत चांगले विचार येणे, स्वप्नामध्ये वा ध्यानामध्ये देवी-देवतांची, तीर्थस्थानांची दर्शने होणे, चांगल्या विचारांच्या माणसांचा सहवास लाभणे, मनाची एकाग्रता प्राप्त होणे, सतत आनंद होत राहणे, मन कशातही अडकून न पडणे, प्रेम, आनंद व शांती या सर्व गोष्टी शुभ शक्तीच्या आणि दैवी शक्तीच्या अंतर्गत येतात. काही आत्मे थोडे रागीट स्वभावाचे असतात. परंतु त्यांचा राग दुसऱ्याच्या भल्यासाठी असतो. मन आतून शांत व प्रसन्नच असते.

दैवी शक्तीच्या अंतर्गत राहणारे आत्मे पूर्ण आनंदमय व कल्याणमय असतात. त्यांच्या सहवासाने इतरांचे कल्याण होते. अशा आत्म्यांना '**संत**' म्हटले जाते.

सिद्धपुरुषांचे समाधिस्थान, मंदिरे, सिद्धपुरुषांची तपश्चर्येची स्थाने, त्यांनी तपस्या केलेल्या जागा, एखाद्या भक्ताला ज्या ठिकाणी देवतेचे किंवा श्रेष्ठ आत्म्याचे दर्शन घडले ती जागा, ईश्वराच्या नांवाने अनेक लोक जेथे एकत्र येऊन प्रार्थना करतात अशा जागा...

अशा सर्व ठिकाणी दैवी स्पंदने स्वर्गाच्याही पलीकडच्या प्रांतातून पृथ्वीवर पाठवली जातात; त्यांचा स्पर्श मानवाच्या सूक्ष्मदेहाला होतो.

पृथ्वीतलावर काही ठिकाणी प्राचीन ऋषी आजही तपश्चर्या करीत आहेत. या ऋषींच्या दिव्य देहातून कधीतरी स्पंदने प्रसृत होतात. त्याचे परिणाम पृथ्वीतलावरील मानवांवर होतात. जे भक्तिमान आत्मे असतात, त्यांच्यातील भक्ती, प्रेम वाढू लागते. मानवांना सन्मार्ग प्राप्त व्हावा म्हणून हे ऋषी किमान वर्षातून एकदा तरी अशी स्पंदने वातावरणात सोडतात.

संध्याकाळी सूर्यास्तानंतर आकाशातून काही दिव्य स्पंदने पृथ्वीवर पाठविली जातात. या स्पंदनांमध्ये आनंदाच्या लहरी असतात. काही भाग्यवान लोकांना अशा वेळी दिव्य आत्म्यांचे

दर्शन घडते. सकाळी सूर्योदयाचे वेळीही वातावरणात दिव्य स्पंदन लहरी प्रसृत होत असतात. यामुळेच सूर्योदय व सूर्यास्त या दोन्ही वेळा ध्यानाला चांगल्या असतात. अशा वेळी ध्यान केले असता आध्यात्मिक उन्नति लवकर होते, असे म्हटले जाते.

उजवा शंख, तुलसी, स्फटिक, पुष्कराज, माणिक, पाचू, मोती, हिरा या वस्तूंमध्ये चांगल्या प्रकारची स्पंदने असतात परंतु या वस्तू जर पूर्वी अनेक वर्षे कुणी वापरल्या असतील तर त्या व्यक्तीची स्पंदने या वस्तूंना प्रभावित करतात, म्हणून इतरांनी बराच काळ वापरलेली वस्तू वापरू नये व मृत व्यक्तीचीही वस्तू वापरू नये. मृत व्यक्ती सज्जन असेल तर तिची वस्तू वापरली असता त्रास होत नाही. पण काही भूते इतकी दुष्ट असतात, की त्यांना स्वत:च्या मुलानेही आपली वस्तू वापरलेली आवडत नाही. अशा दुष्ट आत्म्यांच्या वस्तू वापरल्याने वापरणाऱ्याला त्रास होतो.

वातावरणातील अशा चांगल्या व वाईट शक्ती आपले प्रभाव मानवी जीवनावर कशा प्रकारे पाडत असतात, याविषयी मला स्वत:ला आलेले चांगले-वाईट अनुभव पुढे देत आहे.

◆ ◆ ◆

# ५. अदृश्य मदतनीस

साधना करण्यासाठी पुरेसा एकांत हवा म्हणून मी जेथे विपुल पाणी आहे व गुहा आहेत अशा अरण्यात जात असे. तेथे गेल्यावर असा अनुभव येई, की अरण्यातील आदिवासी लोकांना कोणीतरी माझ्या आगमनाची पूर्व-सूचना दिलेली असे व ते माझी वाट पहात असत. विशेष म्हणजे अगदी अपरिचित जागीही असा प्रकार घडून यायचा. हे कसे घडते ? याचे मलाही त्याकाळी आश्चर्य वाटत असे.

त्याकाळी चालत प्रवास करण्याचे माझे व्रत चालू होते. ज्या दिवशी चालत प्रवास सुरू केला, त्याच्या दुसऱ्या दिवशी मी एका खेडेगावात पोहोचलो. तेथे एका मुस्लीम स्त्रीने माझी अगदी आस्थेने चौकशी केली. तिने मला आपल्या घरी नेले व जेवू-खाऊ घातले. नंतर तिने मला सांगितले की....

त्या रात्री तिच्या स्वप्नात एक अवलिया आले व त्यांनी तिला माझ्या आगमनाची सूचना दिली होती. त्या काळात तिच्या कुटुंबाची परिस्थिती अगदी गरीबीची होती. आता त्यांचीही परिस्थिती खूपच चांगली असून ते सर्व बाजूने समृद्ध झालेले

आहेत व याचे श्रेय ते मला देतात. त्या स्त्रीची मुले आता मोठी झाली असून, सर्वजण अगदी आनंदात आहेत.

ती स्त्री म्हणते, त्या अवलियांनी तिला स्वप्नात सांगितले होते की...

''उद्या तुला एक महात्मा भेटेल, त्याचा आदर सत्कार कर, म्हणजे तुझे दिवस पालटतील.''

माझी सख्खी धाकटी बहीण मंगल हीसुद्धा अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढत होती. एक दिवस तिच्या स्वप्नात परमगुरु श्रीस्वामी समर्थ (अक्कलकोट स्वामी) गेले व म्हणाले,

''लवकरच दत्तगिरी तुझ्याकडे येईल व तुझे दिवस पालटतील.''

जवळजवळ वीस वर्षांत मी तिला भेटलो नव्हतो. अचानक तिच्याकडे जावे, असे मला वाटू लागले. मी तिच्याकडे गेलो. हे सांगण्याची गरज नाही, की स्वप्नात ज्याप्रमाणे तिला सांगितले गेले होते पुढे तसेच घडत गेले...

काही दिवस साधना करण्यासाठी म्हणून एकदा मी आंध्र प्रदेशातील एका गुहेत जाण्याचे ठरविले. नागार्जुनसागरहून हे स्थान जवळच होते. संध्याकाळी तेथे पोहोचलो तर एक म्हातारी स्त्री माझी वाट पहात नदीकिनारी बसली होती. तिने मला दुरून पाहिले व धावत येऊन नमस्कार केला व म्हणाली, ''दुपारपासून मी आपली वाट पहात आहे. ''

त्या स्त्रीला मी ओळखले नाही, कारण पूर्वी कधी तिला पाहिल्याचे मला आठवत नव्हते.

ती स्त्री म्हणाली, ''रात्री तुम्ही माझ्या स्वप्नात आलात व म्हणालात मी या गुहेत काही दिवस साधना करण्यासाठी उद्या येत आहे, तेव्हा तू माझी सेवा करण्यासाठी ये !''

हे ऐकून ईश्वरीलीलेचे मला आश्चर्य वाटले.

**''ईश्वर आपल्या भक्ताची सर्व बाजूंनी**
**काळजी करीत असतो हे अगदी खरे आहे.''**

अदृश्य सृष्टीमधील असंख्य आत्मे पृथ्वीतलावरील मानवांना मदत करण्याचे कार्य करीत असतात. हे आत्मे, एखादी व्यक्ती ज्या देवाची किंवा सत्पुरुषाची भक्ती करते, त्याच्या रूपाने स्वप्नात येतात व मार्गदर्शन करतात. अशा अदृश्य मदतनीसांपैकी कोणीतरी त्या स्त्रीच्या स्वप्नात माझ्या रूपाने गेला व माझी सेवा करण्यास त्या स्त्रीला सांगितले.

अदृश्य मदत करणारे आत्मे अशा प्रकारे फक्त स्वप्नात जाऊन मदत करतात असे नव्हे तर इतर अनेक प्रकारे ते मानवांना मदत करीत असतात.

आत्म्यांचे मुख्य कार्य मानवी मनातील श्रद्धा वाढविणे हे असते. यासाठी विविध प्रकारच्या उपाय योजना करून ते मानवी मनातील श्रद्धा वाढवित असतात. यासाठी ते एखाद्या माझ्यासारख्या साधूला अकारण श्रेय देतात. कुठूनतरी मानवी मनात श्रद्धा निर्माण

व्हावी यासाठी अदृश्य सृष्टीतील आत्मे प्रयत्नांची अगदी पराकाष्ठा करीत असतात. यासाठी त्यांना विश्वासाचा, मैत्रीचा, श्रद्धेचा अगदी बारीकसा तंतू मिळाला तरी पुरेसा होतो. तेवढ्या आधाराने ते मानवी मनाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करतात. अदृश्य सृष्टीतील असंख्य आत्मे मानवाच्या विकासासाठी सतत परिश्रम करीत असतात.

एखादा सत्पुरुष किंवा परिचित व्यक्ती स्वप्नात येऊन मार्गदर्शन करते, तेव्हा त्या रूपामध्ये अदृश्य लोकातील कोणीतरी आत्मा रूप घेऊन स्वप्नात आलेला असतो.

पुष्कळवेळा हे अदृश्य मदतनीस नजीकच्या भविष्यकाळात घडणारी दृश्येही दाखवतात किंवा अंत:स्फूर्ती देतात.

माणसाच्या अंत:करणात श्रद्धा व भक्ती जितक्या प्रमाणात असेल त्या प्रमाणात हे अदृश्य आत्मे सहकार्य करीत असतात.

एका व्यक्तीचा माझ्यावर खूप विश्वास होता. माझ्यावर खूप प्रेम होते. एकदा रात्री अकरा वाजता त्या व्यक्तीला इंगळी चावली व खूप वेदना होऊ लागल्या. त्याला तात्काळ हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. डॉक्टरांनी त्याला तीन इंजेक्शन्स दिली, परंतु त्याला रात्रभर झोप आली नाही. वेदनांनी तो तळमळत होता व ईश्वराची प्रार्थना करीत होता.

सकाळी सात वाजता एक आठ-नऊ वर्षांचा मुलगा त्याच्याजवळ आला व त्याने त्याची चौकशी केली. बरोबर

त्याचा एक नातेवाईक रात्रभर जवळजवळ जागाच होता. त्या नातेवाईकाने त्या आठ नऊ वर्षाच्या मुलाला पेशंटसंबंधी माहिती दिली व डॉक्टरी उपचाराने अद्याप बरे वाटलेले नाही, म्हणून सांगितले. यावर तो मुलगा म्हणाला,

''मला एक औषध ठाऊक आहे, मी पाच मिनिटांत ते घेऊन येतो'', असे म्हणून तो मुलगा धावतच हॉस्पिटलच्या बाहेर गेला. दोन तीन मिनिटांत तो एक काडी घेऊन परत आला.

ती काडी पेशंट व त्याच्या नातेवाईकाला दाखवत तो मुलगा म्हणाला, ''पहा ! काही क्षणात वेदना गायब होतील.'' असे म्हणून तो पेशंटच्या पायाजवळ उभा राहिला व दोन हातांच्या चिमटीत (आंगठा व तर्जनी) त्याने ती काडी आडवी धरली व हळूहळू ती काडी आपल्या दिशेने फिरविण्यास सुरुवात केली व म्हणाला,

''पहा! वेदना आता खाली खाली उतरू लागल्या आहेत.''

पेशंटने हो! म्हणून सांगितले. अशा प्रकारे पायाच्या घोट्यापर्यंत वेदना उतरवल्यानंतर तो मुलगा म्हणाला...

''बघा! वेदना आता पायाच्या घोट्यापर्यंत उतरल्या आहेत. तुमच्या लक्षात आले असेलच, काडी मी माझ्या दिशेने गुंडाळल्याप्रमाणे फिरवीत होतो. वेदना वरून खाली खाली आल्या. आता मी काडी उलट्या दिशेने फिरवतो, म्हणजे तुमच्या दिशेने फिरवतो म्हणजेच वेदना पुन्हा वाढतील व वरवर चढू लागतील.''

असे म्हणून त्या मुलाने काडी उलट म्हणजे पेशंटच्या दिशेने फिरवायला सुरुवात केली. तात्काळ वेदना वाढू लागल्या. दोन मिनिटांपूर्वी जो पेशंट वेदना मुक्तीने आनंदित झाला होता तो पुनश्च तळमळू लागला व वेदना काढून घेण्यासाठी त्या मुलाला विनवू लागला. मुलाने काडी आपल्या दिशेने फिरवून पेशंटला वेदनामुक्त केले व त्या काडीविषयी माहिती देताना मुलगा म्हणाला, ''आले लक्षात! काडी आपल्या दिशेने फिरविली की, वेदना उतरतात व पेशंटच्या दिशेने फिरवली की, वेदना पुनश्च चढतात. इंगळी, विंचू यांचे विष उतरवणारी ही सिद्ध वनस्पती आहे.'' इतकी माहिती देऊन त्या मुलाने ती काडी त्या माझ्या पेशंट भक्ताला दिली व तेथून निघून गेला.

माझ्या भक्ताला वाटले, त्या मुलाचे नातेवाईक हॉस्पिटलमध्ये असणार... ते खेडेगावातील छोटेसे हॉस्पिटल होते... म्हणून त्या मुलाला शोधण्याचा प्रयत्न केला, पण तो अदृश्य मदतनीस जसा गूढरितीने आला तसाच तो गूढरित्या अदृश्य झाला.

ही घटना १९७६-१९७७ ची असून, माझ्या त्या भक्ताने ती काडी मला दाखविली. बॉलपेनच्या रिफिलच्या आकाराची ती काडी होती. कुणालाही विंचू चावल्यास तो तेथे जाऊन विंचवाचे विष उतरवून वाहवा मिळवीत असे.

नंतर काही दिवसांनी अचानक ती वनस्पती अदृश्य झाली. कुठलेही कारण नसताना हा भक्तही माझ्यापासून दूर निघून

गेला.

यावरून एक गोष्ट लक्षात येते, की श्रद्धा कमी झाली किंवा नष्ट झाली तर अदृश्यसृष्टीतून मिळणारी मदतही बंद होते. श्रद्धा जेवढी दृढमूल व घट्ट असते, अदृश्य सृष्टीतून तितकीच भरघोस मदत मिळत राहते.

एका खेडेगावात एका भक्ताच्या घरी रात्री मुक्काम होता. त्या काळात खेडेगावातून रात्री दहा, साडेदहाच्या सुमारास सर्वजण झोपी जात असत. त्याप्रमाणे सर्वजण झोपी गेले होते. सवयीप्रमाणे मी ध्यान करीत बसलो होतो. रात्रीचा बारा साडेबाराचा सुमार असावा. अचानक पलीकडच्या खोलीतून कोणीतरी स्त्री रडतेय असे वाटू लागले. मी बराच वेळ ऐकत राहिलो. पलीकडील खोलीतून रडण्याचा आवाज ऐकू येत होता. भक्ताची पत्नी रडत होती. मला काय करावे समजेना! शेवटी मी हाक मारली, ''वहिनी! काय होतंय!'' भक्ताची पत्नी उठून बाहेर आली व म्हणाली, ''स्वामी कान खूप दुखतोय!''

माझ्याजवळ साधी वेदनाशामक गोळीसुद्धा नव्हती. शेवटी ईश्वराची प्रार्थना केली व त्या स्त्रीच्या कानात चक्क चमचाभर पाणी टाकले आणि आश्चर्य म्हणजे तत्क्षणी वेदना गायब झाल्या. त्या स्त्रीने माझे आभार मानले व झोपी गेली.

या घटनेनंतर जवळजवळ दोन वर्षांनी मी नागार्जुनसागर येथील आश्रमात रहात होतो. अचानक माझा कान दुखू लागला. कानाचे दुखणे इतके वाढले, की त्यामुळे मला हलताही येईना.

डॉक्टर्सना कळेना की काय प्रकार आहे? खूप औषधे झाली, शेकडो रुपये खर्च झाले, अशा प्रकारे जवळजवळ दोन अडीच महिने झाले तरी कान दुखणे थांबेना आणि एक दिवस त्या स्त्रिचे मला पत्र आले. पत्रात पुढीलप्रमाणे मजकूर लिहिलेला होता.

''प्रिय स्वामीजी,

सुमारे दोन वर्षांपूर्वी आपण आमच्याकडे आला होतात, तेव्हा माझा कान दुखू लागला होता. आपण दोन थेंब पाणी टाकलेत व कानाचे दुखणे तात्काळ थांबले!

त्या दिवसापासून कान परत कधीही दुखला नाही.

सुमारे दोन महिन्यांपूर्वी सकाळी नऊ-दहा वाजता अचानक कान परत ठणकू लागला. माझ्या मनात सहज विचार आले. ''आता स्वामी असते तर त्यांनी माझा कान तात्काळ बरा केला असता!''

माझ्या मनात विचार येत आहे, इतक्यात हवेतून एक हात प्रकट झाला व माझ्या कानावरून तो हात फिरला व तत्क्षणीच कान दुखणे बंद झाले. कुणाला सांगून विश्वासही बसणार नाही, परंतु सकाळी दहाची वेळ होती. दिवसाच्या लख्ख प्रकाशात मी हवेत एक हात प्रकट झालेला पाहिला. त्या हस्तस्पर्शाने माझी कानदुखी पूर्ण थांबली.

बरेच दिवस पत्र लिहून तुम्हाला हे सारे कळवायचे म्हणत होते, पण संसारातील व्यापामुळे पत्र लिहायला दोन महिने वेळच मिळाला नाही. आता जरा निवांत वेळ मिळाला म्हणून पत्र

लिहायला घेतले. अशीच सदैव कृपादृष्टी ठेवा. आमच्या दु:खाचे निवारण करीत रहा वगैरे वगैरे.''

पत्र वाचल्यावर मी स्वत:वर औषधोपचार करणे बंद केले व साधनेने कान बरा केला.

वाचक हो!

आमच्या भारतातील भक्त हे अशा प्रकारचे असतात. त्यांना फुकट, चोखट व लवकर हवे असते व वर ते निंदा करायला सदैव तयारच असतात.

आता या स्त्रीने विचार करायला हवा होता, की पूर्वी जेव्हा कान दुखू लागला होता तेव्हा रात्रीची वेळ होती, त्यामुळे स्वामींनी कान दैवी शक्तीने ठीक केला.

दुसऱ्या वेळी दिवसाची वेळ होती. दैवी शक्तीला म्हणजे अदृश्य मदतनीसांना त्रास देण्याऐवजी तिने डॉक्टरकडे जायला हवे होते.

अशा प्रकारे अदृश्य मदतनीस तुम्हाला सर्व बाजूंनी मदत करतात, ते तुमच्यातील श्रद्धा, भक्ती, प्रेम या वृत्ती वाढाव्यात यासाठी! या वृत्ती वाढल्यानंतर आत्म्याचा विकास होतो. परंतु आजकालचा मनुष्य स्वत:च्या विकासाकडे दुर्लक्ष करतो व फक्त स्वार्थ पाहतो. स्वार्थासाठी देव, गुरु, स्वामी, साधू व अदृश्य मदत करणारे आत्मे त्याला हवे असतात. परंतु अशा प्रकारे दैवी शक्तीचा दुरुपयोग झाल्यानंतर त्या शक्ती अशा स्वार्थी माणसांना मदत करणे बंद करतात. परोपकारी व नि:स्वार्थी

स्वभावाच्या माणसांना दैवी शक्तीकडून मदत मिळत असते. इतर लोकांनाही मदत मिळते परंतु ती तात्पुरती व मार्गदर्शन करण्यापुरती असते. दाखविलेल्या मार्गाने जर ती व्यक्ती मार्गक्रमण करीत नसेल तर दैवी शक्ती अशा व्यक्तीकडे दुर्लक्ष करतात. एकदा का दैवी शक्तींनी दुर्लक्ष केले, की मग दैवी शक्तींची कृपा सहजासहजी प्राप्त होत नाही.

यासाठी देवाला भिऊन वागा! व देवाची करुणा भाका! असे पूर्वीचे लोक सांगत.

आजकालच्या लोकांना तथाकथित सुशिक्षितपणामुळे या दोन्ही गोष्टी जमत नाहीत. परिणामी दैवी शक्ती अगदी पाच दहा वेळा उपयोगी पडल्या तरी यांच्यात सुधारणा होण्याऐवजी स्वार्थ वाढतो. कृतज्ञता येण्याऐवजी निष्काळजीपणा वाढतो. अशा वागण्यामुळे दैवी शक्ती किंवा अदृश्य मदतनीस हे नाराज होतात व एकदा का हे नाराज झाले, की मग हजारो वेळा प्रार्थना करूनही उपयोग होत नाही, म्हणून दैवी शक्तींची सतत प्रार्थना करीत रहायला हवी.

**‘‘हे परमेश्वरा! मला योग्य मार्गाने ने!**
**हे परमेश्वरा! मला तुझ्या हातातील**
**कळसुत्री बाहुली बनव!’’**

अशा प्रार्थना सतत करीत रहायला हव्यात!

◆ ◆ ◆

# ६. तारक शक्ती – मारक शक्ती

मनुष्याच्यामागे तारक शक्ती व मारक शक्ती अशा दोन प्रकारच्या शक्ती असतात. काही माणसांच्या मागे फक्त तारक शक्तीच असते. परंतु अशा व्यक्ती फारच थोड्या असतात. काही व्यक्तींच्यामागे मारक शक्ती असते. असे लोक बरेच असतात, परंतु तारक शक्ती व मारक शक्ती दोन्ही शक्ती असलेले लोकच पूर्ण जगभर रहात असतात, हेच संख्येने जास्त असतात.

सर्व धर्मातील धर्मग्रंथांनी या तारक शक्ती व मारक शक्तींची वर्णने विविध नांवांनी केलेली आहेत. तरीसुद्धा मानवाला आपल्यामागे काही तारक मारक शक्ती आहेत, याची जाणीव नसते व तो आपल्याच भ्रमात वावरत असतो. या प्रकरणात मी तुम्हाला तारक–मारक शक्तींची तोंडओळख करून देणार आहे. तारक शक्ती ही माणसाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करते. परोपकार, दान, ईश्वरी नामस्मरण इत्यादी सन्मार्गाच्या आचरणाने आपल्यामागे तारक शक्ती वाढत जाते व ती सर्व बाजूंनी आपल्याला उपयोगी पडते. म्हणून ‘‘**सत्कर्म सर्वत्र फळते**’’ असे म्हणतात. समजा तुम्ही तुमच्या गावापासून हजारो मैल दूर

गेलात, तेथे तुमच्या ओळखीचे कोणीही नाही, अशा वेळी कोणीतरी अपरिचित मनुष्य तुम्हाला उपयोगी पडतो व तो तुमची सर्व सोय करतो. हे असे का घडते? ठाऊक आहे? तुमच्या मागे असलेले आई-वडिलांचे आशीर्वाद, सत्पुरुषांचे आशीर्वाद, वृद्ध व्यक्तींचे आशीर्वाद, ईश्वराची कृपा व तुम्ही केलेले दान, परोपकार, पुण्य, ईश्वर भक्ती इत्यादी सर्व मिळून जी शक्ती निर्माण झाली ती शक्ती हे सारे कार्य करीत असते.

सुमारे २० वर्षांपूर्वी मी एक गोष्ट ऐकली होती, ती येथे सांगण्याचा मोह आवरता येत नाही.

एक स्वामी होते. गुरुंच्या आज्ञेने लोकोद्धाराचे कार्य करण्यासाठी ते अमेरिकेला गेले. अमेरिकेत एकही मनुष्य परिचित नव्हता. ते एअरपोर्टवर उतरले, इतक्यात एक अमेरिकन त्यांच्याजवळ आला व त्याने त्यांना विचारले,

''स्वामी आपण कोठे जाणार आहात?''

''माझा एक मित्र येथे राहतो त्याच्याकडे जाणार आहे!'' स्वामींनी स्मित करीत उत्तर दिले.

''त्या मित्राचे नांव काय? तो एअरपोर्टवर आला आहे काय?'' त्या गृहस्थाने विचारले.

''त्याचे नांव मला ठाऊक नाही! पण तो एअरपोर्टवर आला आहे'' स्वामींनी उत्तर दिले.

''कुठे आहे तो?'' त्या गृहस्थाने विचारले.

''तो तूच आहेस!'' स्वामींनी त्याला सांगितले आणि खरेच तो गृहस्थ त्या स्वामींचा एकनिष्ठ भक्त बनला.

आपल्या पाठीमागे जर चांगली शक्ती असेल, तर ती कसे कार्य करते हे या गोष्टीवरून दिसून येते.

पूर्वजन्मातील तसेच या जन्मातील वाईट कर्मांमुळे एखाद्या व्यक्ती मागील चांगली शक्ती कमी होते व वाईट शक्तींचा प्रभाव मानवी मनावर वाढू लागतो.

द्वेष, मत्सर, अहंकार, हट्टीपणा, जिद्द या साऱ्या प्रवृत्ती तुम्ही वाईट शक्तीच्या आधीन झाल्याचे दर्शवितात. जसजशी वाईट कर्मे वाढतात तसतसा मनुष्य दुष्ट शक्तीच्या आधीन होत जातो व असा मनुष्य सन्मार्गाला लागणे कठीण होते.

येथे चांगली शक्ती व वाईट शक्ती यांचा संग्राम सुरू होतो. यालाच देव-असुर संग्राम असे म्हणतात. वाईट शक्ती मनुष्याला वाईट मार्गाकडे खेचते. चांगली शक्ती त्याने चांगले वागावे यासाठी प्रयत्न करते. या युद्धामध्ये बऱ्याच वेळा वाईट शक्तीचा जय होत असतो.

कारण वाईट शक्ती निर्माण करण्यासाठी किंवा वाईट शक्तीच्या आधीन होण्यासाठी काही फारसे करावे लागत नाही. उतारावरून गाडी आपोआप वेगाने खाली जाते, त्याप्रमाणे अधोगतीला जाण्यास फारसे परिश्रम करावे लागत नाहीत. द्वेष, मत्सर, तिरस्कार एवढ्या प्रवृत्ती मानवाला अधोगतीला नेण्यास पुरेशा ठरतात,

उलट चांगली शक्ती निर्माण करण्यासाठी खूप कष्ट व परिश्रम करावे लागतात, दान करावे लागते. ईश्वरी नामस्मरण करावे लागते. परोपकार करावा लागतो. या गोष्टी वर्षानुवर्षे केल्यावर मग कुठे चांगली शक्ती निर्माण होते. चांगली शक्ती मिळविणे व ती सांभाळणे अवघड असते. वातावरणातील दुष्ट शक्ती तुमची चांगली शक्ती नष्ट करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. वाईट शक्ती या खूपच क्रियाशील असतात. या वाईट शक्ती तुम्हाला ईश्वराचे नामस्मरण करू देत नाहीत. दान व परोपकार करू देत नाहीत. समजा, एखाद्या साधू पुरुषाच्या (सत्पुरुषाच्या) सांगण्याने जर थोडाफार दान धर्म केलाच तर लगेच आपल्याला फार मोठा मान-सन्मान मिळावा, ही प्रवृत्ती या वाईट शक्ती निर्माण करतात.

नम्रतेने ईश्वरी कृपा होते. अदृश्य मदतनीस नम्र व्यक्तीला सदैव सहकार्य करतात, म्हणून वाईट शक्ती माणसातील नम्रता प्रथम नष्ट करतात, नंतर प्रेम नष्ट करतात व स्वार्थ, अहंकार, कंजूषपणा हे दुर्गुण निर्माण करतात.

वाईट व दुष्ट शक्तींच्या आधीन झालेले लोक अशांत, अस्वस्थ, दुर्मुखलेले असतात, त्यांना स्वप्नेही भूतांचीच पडतात व बऱ्याच वेळा असे लोक दक्षिण दिशेकडे पाय करून झोपतात.

असे म्हणतात, की नैऋत्य दिशेकडे दुष्ट शक्तींचे खूप खूप प्रवाह असतात ते नैऋत्य ते दक्षिण या भागात वाहत असतात.

त्यामुळे भूत-प्रेतांना वश करण्यासाठी किंवा दुष्ट शक्तींना आपल्या काबूत आणण्यासाठी ज्या साधना केल्या जातात त्या साधना दक्षिण दिशेकडे तोंड करूनच करतात.

वाईट शक्ती व दुष्ट शक्तींनी सध्या जगावर खूपच प्रभाव पाडलेला आहे. या वाईट व दुष्ट शक्ती समाजातील मानवता नष्ट करीत आहेत व यामुळे जिकडे तिकडे स्वार्थ, व्यापारी वृत्ती, आतंकवाद, छळ, भ्रष्टाचार, हिंसा अशा दुष्ट प्रवृत्तींची भरमसाठ वाढ झालेली आहे. या दुष्ट शक्तींचा प्रभाव इतका प्रचंड आहे, की मनुष्याला रोज कानी कपाळी ओरडून सांगितले की, द्वेष करू नको! मत्सर करू नको! तरीही त्याच्यात काहीही बदल घडत नाही. परोपकार करा! दान-धर्म करा! प्रेमाने वागा! कुणाला दु:ख देऊ नका! या जगातून जाताना एक सिंगल नया पैसा पण तुम्ही बरोबर नेणार नाही, मग उगाच भांडणे कशासाठी ? परमेश्वराने या जगात तुम्हाला फक्त साठ सत्तर वर्षे राहण्यासाठी पाठवले आहे. यातील वीस वर्षे बालवयातील व वीस वर्षे वृद्धापकाळातली वगळली तर राहिलेल्या तीस वर्षात जर चांगले वागलात, ईश्वराशी कृतज्ञ राहिलात व थोडा फार दान-धर्म, परोपकार केलात तर बिघडले कुठे? जीवन हे स्वत: आनंदाने जगून इतरांना आनंद देण्यासाठी आहे. जो इतरांना आनंद देत जगतो त्याच्या आयुष्यात त्याला कधीही आनंदाला उणीव पडत नाही. ईश्वर सर्व बाजूंनी त्याचे रक्षण करतो. उलट जे लोक इतरांना दु:ख देतात, पीडा

देतात, त्यांच्या नशिबी जन्मोजन्मी तेच येते, कारण पेरावे तसे उगवते हा ईश्वराच्या दरबारातील न्याय आहे.

वस्तुत: या गोष्टी कुणालाही सहज समजाव्यात इतक्या सोप्या आहेत, परंतु वातावरणात दुष्ट शक्तींचे प्रवाह इतक्या जोराने वाहत आहेत की, मनुष्याला एखाद्या भुकेलेल्याला अन्न देण्याचेही सुचत नाही.

सुमारे शंभर वर्षांपूर्वी मानवाला रेडिओ, टी. व्ही. इत्यादी अत्याधुनिक उपकरणांविषयी काहीच माहीत नव्हते. आज रेडिओ, टी. व्ही. या गोष्टी सामान्य झाल्या आहेत.

आणखी काही वर्षांनी संशोधकांना वस्तू व त्यावरील चांगली, वाईट स्पंदने, वातावरणातील चांगल्या वाईट शक्तींचे प्रवाह, चांगल्या शक्तींचे प्रवाह मार्ग व वाईट शक्तींचे प्रवाह मार्ग या सर्व गोष्टी संशोधनाद्वारे कळण्याची शक्यता आहे.

दुष्ट शक्ती मानवाला वाईट मार्गाकडे कशा प्रवृत्त करतात, चांगल्या शक्ती मानवाचे रक्षण करण्यासाठी कशा प्रयत्न करतात, या विषयावरील माझे स्वत:चे अनुभव व काही माझ्या जवळपासच्या माणसांचे अनुभव कथन करीत आहे.

## अनुभव

जवळजवळ चार पाच महिने ठिकठिकाणी प्रवास करून मी नागार्जुनसागरला परत आलो होतो. बऱ्याच दिवसांनी आल्याकारणाने खूप लोक भेटायला आले होते. त्यातील काही

परिचित होते, तर काही अपरिचित!

इतक्यात एक मनुष्य आला व त्याने माझ्या मांडीवर डोके ठेवले. बराच वेळ तो मांडीवरून डोके बाजूला करेना! या व्यक्तीला मी पूर्वी कधीही पाहिलेले नसल्याने मी जरा गोंधळलो. जवळजवळ दहा मिनिटे तो मांडीवर डोके ठेवून होता. नंतर बाजूला बसला. त्याने आपली हकिकत सांगायला सुरुवात केली.

''गेले सहा-सात महिने मला खूप मानसिक त्रास होत होता. हा त्रास कसला ते काही सांगता येत नाही, परंतु सारखं वाटे आपण आत्महत्या करावी. मनाला क्षणभरही विश्रांती नव्हती. आत्महत्या करावी म्हणून कुठली तरी शक्ती माझ्या मनावर प्रचंड दडपण आणत होती.

तीन वेळा आत्महत्या करण्यासाठी म्हणून मी डॅमवर गेलो, पण प्रत्येकवेळी आकाशात तुम्ही दिसत व आशीर्वाद मुद्रेत हात करीत, लगेच एक अदृश्य शक्ती मला घरापर्यंत खेचत आणायची! माझ्या मनाची ओढाताण होत होती. एक शक्ती मला खूप छळत होती व आत्महत्या करण्यासाठी माझ्यावर दडपण आणत होती. दुसरी तुमची शक्ती मला आत्महत्येपासून परावृत्त करीत होती. या ओढाताणीने मी अगदी व्याकुळ होऊन गेलो व तुम्ही केव्हा येता याची वाट पहात होतो. तुम्ही आल्याचे कळताच धावत आलो.

तुम्हाला नमस्कार करण्यासाठी तुमच्या मांडीवर डोके ठेवले मात्र, तत्क्षणी सारे दडपण कुठल्याकुठे निघून गेले. मनाला अभूतपूर्व शांती प्राप्त झाली.''

वरील सर्व हकिकत ऐकल्यावर तीन गोष्टी लक्षात येतात.

१) शुभ शक्ती व वाईट शक्ती यांच्यात युद्ध चालू होते. त्यात प्रथम दर्शनी शुभ शक्तीचा विजय झाला.

२) माझ्या रूपामध्ये त्या माणसाचे संरक्षण करून त्याला वाचवून शुभ शक्तीने म्हणजे दैवी शक्तीने त्याला सूचित केले होते, की या सत्पुरुषाची कास धर म्हणजे तुझे कल्याण होईल. ही गोष्ट त्याच्या मनावर चांगल्या रितीने ठसावी म्हणून माझा स्पर्श होताच त्याच्या डोक्यावरील दडपण निघून गेले. हा सर्व अनुभव अदृश्य मदतनीसांनी दिला व मला फुकटचा मोठेपणा दिला.

३) माझ्या आश्रमापासून फक्त चार कि. मी. अंतरावर तो रहात होता, परंतु तो परत कधीच भेटला नाही. मी त्याला खूप निरोप पाठविले, पण तो कधी आला नाही. याचा अर्थ शेवटी वाईट शक्तीचा विजय झाला. त्यांनी त्याला माझ्याकडे येऊच दिले नाही. सुमारे वर्षभरातच त्याची बदली झाली व तो आणखी दूर निघून गेला.

या घटनेला वीस वर्षे होऊन गेली, त्या माणसाचे काय झाले हे कळायला मार्ग नाही.

दैवी शक्ती माणसाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात तर

आसुरी शक्ती माणसाचे नुकसान करण्याचा प्रयत्न करतात. द्वेष, मत्सर, अहंकार केल्याने आसुरी शक्तीचे बळ वाढत जाते. उलट शांती, आनंद, प्रेम, परोपकार केल्याने दैवी शक्तीची कृपा होते.

त्या माणसाकडे थोडीशी कृतज्ञता बुद्धी असती तर नक्कीच आसुरी शक्तींच्या पाशातून त्याची सुटका झाली असती. पण शेकडा ९९ टक्के लोकांना असे वाटते, की काम झाले ना! मग परत सत्पुरुषाकडे कशाला जा!

चांगले सुशिक्षित व सज्जन लोकही काम झाल्यावर ईश्वर भक्तीची कास धरीत नाहीत, परिणामी आसुरी शक्ती परत त्यांच्यावर आपला प्रभाव गाजवायला सुरुवात करतात.

समजा! बाजारातून तुम्ही एक नवीन किंमती शर्ट आणला व हँगरला अडकवून ठेवला. दोन चार वर्षे तिकडे पाहिलेच नाही तर त्यावर धूळ बसून तो शर्ट खराब होईल.

या जगात प्रत्येक वस्तू नैसर्गिकरित्या खराब होते, सडते, कुजते... पण, ती खराब होऊ नये म्हणून विशेष काळजी घेतली, तिच्यावर स्वच्छतेच्या प्रक्रिया करीत राहिले तर ती नेहमी साफ राहते व तिचे आयुष्यही वाढते.

तुम्ही कपडे खरेदी केलेत तर ते नेहमी धुवावे लागतात. भांडी खरेदी केलीत तर रोज साफ करावी लागतात. अगदी बुटापासून ते कारपर्यंत प्रत्येक गोष्ट रोज साफ करावी लागते.

रोज आंघोळ केली नाही तर अस्वच्छ वाटते. आठ दिवस आंघोळ केली नाही तर अंगाला घाण वास येऊ लागतो. सर्वात शेवटी सांगायचे ठरविल्यास एक दिवस शौचाला झाले नाही तर मन बेचैन होते.

या सर्व गोष्टींचा मानवाला रोजचा अनुभव आहे व म्हणून अगदी जागरुकतेने बुटापासून ते कारपर्यंत प्रत्येक वस्तू साफ राहावी म्हणून तो प्रयत्न करीत असतो. यासाठी नोकर ठेवतो. कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशीन खरेदी करतो. घरातील कचरा काढण्यासाठी व्हॅक्यूम क्लिनर खरेदी करतो. कपड्याला रोज इस्त्री करतो. सेंट वापरतो.

या सर्व गोष्टी तो स्वच्छता व नीटनेटकेपणा यासाठी करीत असतो व या सर्व गोष्टी दररोज अगदी जागरुकतेने करणे आवश्यक आहे.

**पण**

आपले **मन** साफ राहावे यासाठी काय केले पाहिजे ? याचा मानवाने कधी विचार केला आहे का? आपली **बुद्धी** सदैव जागृत राहून तिने योग्य निर्णय घ्यावेत. यासाठी काय केले पाहिजे? याचा मानवाने कधी विचार केला आहे काय ? आपण ज्या वास्तूत राहतो त्या वास्तूमध्ये आसुरी शक्तींनी प्रवेश करू नये व घर खराब होऊ नये यासाठी काय केले पाहिजे? याचा मानवाने कधी विचार केला आहे काय?

आपण ज्या वास्तूमध्ये राहतो, त्या वास्तूमध्ये जर चार-पाच वर्षे दिवा लावला नाही तर त्या वास्तूमध्ये दुष्ट शक्ती यायला सुरुवात होते. हळूहळू संपूर्ण वास्तू खराब होते. यासाठी वास्तूमध्ये नेहमी तूपाचा किंवा तेलाचा दिवा जरूर लावावा तसेच सकाळ-संध्याकाळ अगरबत्ती लावावी.

वास्तूमध्ये प्रत्येक खोलीत एखाद्या सिद्ध पुरुषाचा किंवा देवाचा फोटो लावावा.

वास्तूमध्ये फोटो शक्यतो पूर्व-पश्चिम असावेत.

वास्तूमध्ये देवाची प्रार्थना-स्तोत्रे मोठ्याने म्हणावीत. सर्वांनी मिळून मोठ्याने एखाद्या मंत्राचा जप करावा.

दिव्याच्या ज्योतिकडे दररोज किमान एक मिनिट एकटक बघावे. याने दैवी स्पंदने आपल्या सूक्ष्मदेहात प्रवेश करतात.

वरील गोष्टी केल्याने वास्तू शुद्ध राहते व घरात दैवी स्पंदने निर्माण होतात.

ज्या घरात दैवी स्पंदने असतात, त्या घरात प्रवेश केल्यावर मन प्रसन्न होते. आनंदाच्या लहरी हृदयात निर्माण होतात. प्रेम व आनंद निर्माण होतो.

अर्थात घरातील दैवी स्पंदनांबरोबर त्या घरात राहणारी माणसे शुद्ध सात्त्विक विचारांची असायला हवीत, नाहीतर कालांतराने घरातील वातावरण खराब होते व दैवी स्पंदने नष्ट होऊन जातात.

जर एखाद्या घरामध्ये वाईट स्पंदने असतील तर त्या घरात उदास वाटते. झोपेत दचकून उठायला होते. वाईट स्वप्ने पडतात. बरकत राहत नाही म्हणजे समृद्धी नष्ट होते. तेथे राहणारी माणसे क्रोध व द्वेष-मत्सर करू लागतात. संतती दुर्दैवी निर्माण होते. पैसा पुरा पडत नाही. स्वभाव चिडचिडे बनतात. पिशाच्चबाधा होतात.

हळूहळू अशा घरातील प्रत्येक वस्तू म्हणजे कपडे, भांडी-कुंडी, अंथरूण-पांघरुण अशा सर्व वस्तू दूषित होतात. अशा घरी एखादा पवित्र किंवा सज्जन मनुष्य गेल्यास त्याला तात्काळ त्रास होऊ लागतो. विशेष म्हणजे त्या घरातील दुष्ट शक्ती तेथे राहणाऱ्या माणसांना कधीही सद्‌बुद्धी होऊ देत नाहीत.

बुद्धी बिघडलेली ही माणसे मृत्यूनंतर पिशाच्च लोकात हजारो वर्षे खितपत पडतात. या माणसांचे वैशिष्ट्य म्हणजे कितीही प्रयत्न करा त्यांच्यात श्रद्धा निर्माण होतच नाही. दुष्ट शक्ती त्यांची बुद्धी पूर्ण भ्रष्ट करून टाकते.

कर्नाटकमध्ये एका घरी गेलो होतो, त्या घरामध्ये एक पिशाच्च होते. त्या पिशाच्चाने मला रात्रभर झोपू दिले नाही. खूप त्रास दिला. ते पिशाच्च तेथील घरमालकाच्या वडिलांचे होते. घरमालक हा सत्तर वर्षांचा वृद्ध होता. मी त्या पिशाच्चाला विचारले, ''तुझा मुलगा सत्तर वर्षांचा आहे. तुझे नातू व नाती मोठे होऊन त्यांनाही मुले झाली आहेत, म्हणजे तुला मरून तीस-चाळीस वर्षे नक्की

झाली असणार, मग तू अजून येथे काय करीत आहेस? व या लोकांना त्रास का देत आहेस?''

यावर पिशाच्च म्हणाले, ''हे लोक माझी आठवण काढीत नाहीत, माझा मान-सन्मान ठेवीत नाहीत. मी त्यांना सतत छळत राहणार. माझा मुलगा जो सत्तर वर्षांचा म्हातारा आहे, तो मेल्यावर त्याचा आत्मा मी माझ्या कैदेत ठेवणार व त्याला खूप खूप छळणार, त्याच्या मुलांनाही छळणार!''

ते पिशाच्च काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. ते फक्त मी माझ्या मुलांना असे छळणार व नातवांना तसे छळणार अशी बडबड करीत होते. शेवटी मी त्याला सांगितले...

''तुला त्यांचे काय करायचे ते कर! मला जरा स्वस्थ शांत झोपू दे! सकाळी मी तुझ्या घरातील सर्वांना सुधारण्यासाठी जरा समजावून सांगेन आणि हे बघ! इतरांना त्रास देऊन कोणी कधी सुखी होत नसतो व येथे तू तर तुझ्याच वंशातील लोकांना त्रास देत आहेस!''

यावर ते पिशाच्च म्हणाले,

''खरं आहे, मी गेली पन्नास वर्षे यांना त्रास दिला पण माझा काहीच फायदा झाला नाही उलट गेले दोन तास तुमच्या सहवासात राहिल्यावर मलाही जरा मन:शांती वाटत आहे. माझ्यातील क्रोध व अहंकारामुळे मी तुम्हाला त्रास दिला याबद्दल मी तुमची क्षमा मागतो.'' असे म्हणून ते पिशाच्च तेथून निघून गेले व मी झोपलो.

पिशाच्चांचा प्रभाव रात्री बारा ते तीनपर्यंत खूप जोरदार असतो. आमचे संभाषण संपले तेव्हा जवळजवळ साडेतीन पावणेचार वाजले होते व नीट झोप लागेपर्यंत जवळजवळ चार साडेचार झाले. साहजिकच सकाळी उठेपर्यंत दहा वाजले. रात्री सुरुवातीला त्या पिशाच्चाशी बरीच लढाई झाल्याने अंग ठणकत होते व सूज आली होती.

माझ्या चेहऱ्यात झालेला बदल तेथील सर्वांच्या लक्षात आला. ते म्हणाले...

''स्वामीजी! तुमच्या सर्वांगाला सूज आली आहे.''

मी त्या सत्तर वर्षांच्या घरमालकाला व त्याच्या मुलांना रात्री घडलेली हकिकत सांगितली तेव्हा त्या सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्याचे डोळे रागाने लाल झाले. त्याला खूप चीड आली व तो आपल्या मृत बापाला शिव्या घालू लागला.

''साल्याने जिवंत असताना आम्हाला छळले व मेल्यावरही छळतो आहे!'' वगैरे बोलून त्याने आपला राग व्यक्त केला. हा सत्तर वर्षांचा मुलगा म्हणजे आपल्या वृद्ध बापाचाच अवतार आहे असे मला वाटू लागले.

थोड्याच वेळात तो शांत झाला व म्हणाला, ''माफ करा! मला राग अगदी अनावर झाला होता. पण काय करू? आमचा बाप खूप क्रूर होता, त्याने अनेक पापे केली. आम्ही दोघे भाऊ, बहीण नाही. त्याच्या छळाला व क्रूरतेला आमची आई बळी

पडली. तिला तो दिवसातून दोन वेळा तरी मारायचा. तेव्हा आम्ही आठ-दहा वर्षांचे होतो. आम्हालाही तो सारखा मारीत राहायचा. आमचा बाप किती क्रूर होता याचे एकच उदाहरण सांगतो. एकदा त्याने रागाच्या भरात माझ्या धाकट्या भावाची करंगळीच तोडून टाकली. त्याच्या क्रूरतेमुळे आई वारली व वर्षभरात आम्ही घरातून चक्क पळून गेलो. शहरात मोलमजुरी करून पोट भरले. परमेश्वराने खूप सहकार्य केले व आम्ही श्रीमंत व्यापारी झालो.''

''घर सोडले तेव्हा मी पंधरा-सोळा वर्षांचा होतो. भाऊ दोन वर्षांनी माझ्याहून लहान! बापाच्या कैदेतून सुटताच चार वर्षात आम्ही समृद्ध झालो. खाऊन-पिऊन सुखी झालो. आम्ही कधीही आमच्या बापाचे तोंड पाहिले नाही. आम्हाला नंतर कळले की अनेक रोग होऊन आमचा बाप तडफडत मेला!''

''आमच्या बापाच्या क्रूरतेची कहाणी मी तुम्हाला थोडक्यात सांगितली. पण त्याच्या क्रूरतेमुळे गावातील लोक त्याचे तोंडही पहात नसत की कोणी त्याच्याकडे मजुरीवर काम करायला येत नसत. म्हणून त्याच्या मृत्यूनंतरही तो आमचा छळ करतोय, हे कळल्यावर मला खूपच चीड आली.''

त्याचे म्हणणे मी शांतपणे ऐकून घेतले व एखाद्या अंतर्ज्ञानी सिद्धयोग्याच्या थाटात त्याला त्याने भोगलेल्या साऱ्या यातना सांगितल्या. त्या सत्तर वर्षांच्या वृद्धाला व घरातील सर्वांना याचे

फार आश्चर्य वाटले की, या स्वामींना संपूर्ण भूतकाळ अचूक कसा काय कळला?

त्या वृद्ध गृहस्थाने व त्याच्या मुलामुलींनी जे जे काही दु:ख भोगले ते सर्व सांगून मी त्यांना म्हणालो, ‘‘ठाऊक आहे! या गोष्टी मला कशा कळल्या?’’

त्यावर आश्चर्यचकित झालेल्या त्या सर्वांनी म्हटले...

‘‘आपण महात्मा आहात. आपल्या साधनेने किंवा तपस्येने या गोष्टी आपल्याला कळल्या असणार!’’

मी म्हटले तसे नाही! या सर्व गोष्टी तुमच्या त्या बापानेच मला सांगितल्या. तो प्रत्येक घटनेचे वर्णन करून म्हणाला, ‘‘येथे मी अमुक केले व याला असा तोंडघशी पाडला.’’ असे सांगून त्यांना दोन चार प्रसंग सांगितले.

त्या मृतात्म्याला शांती प्राप्त व्हावी व सद्‌गती प्राप्त व्हावी म्हणून काही विधी करण्यास सांगितले.

जर तुम्ही परिकथा वाचल्या असतील किंवा हातिमताई सिनेमा पाहिला असेल, तर दोन गोष्टी तुमच्या लक्षात येतील.

१) पऱ्या हवेत उडतात.

२) जर त्यांना एखाद्या मानवाने वासनेने प्रेरित होऊन स्पर्श केला तर त्या पाषाण प्रतिमा बनतात. पायापासून वरवर त्या जड होत जातात.

यातील रुपकाचा भाग जर काढून टाकला तर या कथेमागील

खरे तत्त्व लक्षात येईल.

पऱ्यांचे अस्तित्व आहे, हे अगदी खरे आहे. परंतु त्यांना पंखांची मुळीच गरज नाही. त्या चतुर्थ मितीतील असल्याने त्यांच्यावर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा काही प्रभाव पडत नाही. त्या हवेतून कुठेही जाऊ शकतात. परंतु या पऱ्या म्हणजे ''**अर्धदेवता**''असल्याने थोड्या चंचल असतात व त्या फॅशनप्रियही असतात, त्यामुळे आपल्याला पंख असावेत असे त्यांना वाटताच आकाशीय तत्त्वाचे पंख निर्माण होतात.

पाऱ्याचा उपयोग कसा करावा याचे ज्ञान जर संशोधकांना झाले तर मनुष्य गुरुत्त्वाकर्षण शक्तीवर विजय प्राप्त करू शकेल. सुमारे शंभर वर्षांपूर्वी हिमालयात असे योगी रहात की, त्यांच्याजवळ एक काठी असे. या काठीत संस्कार केलेला पारा भरत. ही काठी हातात घेऊन ते हवेतून उडत जात. परंतु सध्या असे लोक आढळत नाहीत व जे आहेत ते गुप्त आहेत. त्यांच्या इच्छेशिवाय त्यांच्यापर्यंत कोणी पोहोचू शकत नाही.

सांगण्याचा मुद्दा असा की, पऱ्या, यक्ष, यक्षिणी, अप्सरा, अर्धदेवता, देवता इत्यादी सर्वांचे अस्तित्व असून, आकाशगमन करण्याची क्षमता त्यांचेजवळ असते व योग्य साधना केली तर त्यांचे दर्शनही होते व त्यांचे आशीर्वादही प्राप्त करता येतात.

दुसरा मुद्दा, एखाद्या परीला मानवस्पर्श झाला तर ती पाषाणाची होते. बगदादच्या परिकथेत अशी कितीतरी वर्णने आहेत. त्याचा

अर्थ असा...

पवित्र मनुष्य जेव्हा अपवित्र जागेत जातो किंवा अपवित्र माणसांचा त्याला स्पर्श होतो तेव्हा दगडासारखे जडत्व त्याला प्राप्त होते. हे जडत्व जाण्यासाठी व पुन्हा हलकेपणा प्राप्त होण्यासाठी त्याला खूप साधना करावी लागते.

पायातून दुष्ट शक्ती मस्तकाकडे प्रवाहित होतात व पायापासून शरीर जड होऊ लागते. एखाद्या स्प्रिंगमधून वीजेचा प्रवाह कसा जातो त्याप्रमाणे जाणवते. नंतर पाय, पोटऱ्या दुखू लागतात. पाय जड होतात. इकडे दुर्लक्ष झाले व योग्य वेळीच उपाय योजना केली गेली नाही तर पूर्ण देह हा पाषाणाप्रमाणे जडवत होतो. परमेश्वराची आराधना करणाऱ्या साधकाला सर्व बाजूंनी जपावे लागते. ईश्वरी शक्ती ब्रह्मरंध्रातून प्रवेश करते, त्यामुळे प्रथम ब्रह्मरंध्र शुद्ध होते. तेथून ती खाली खाली उतरत पायापर्यंत जाते व पायातून बाहेर पडत राहते. यासाठी हिंदूधर्मात सिद्धपुरुषांच्या पायाला महत्त्व आहे. सिद्धपुरुषाच्या, सद्गुरुच्या, देवाच्या पायांची पूजा केली जाते.

**याउलट**

**वाईट शक्ती पायातून आत शिरतात. त्यामुळे प्रथम पाय दूषित होतात व हळूहळू सर्व शरीर दूषित होते.**

याबाबत पुढील अनुभव पहा.

एका भक्ताचे माझ्यावर खूप प्रेम होते. तो मला नेहमी

त्याच्या घरी बोलवायचा. पण मी त्याच्या घरात पाऊल टाकताच... माझी परिस्थिती अधांतरी टांगल्यासारखी व्हायची. माझ्या सूक्ष्मदेहाचा मानेपासूनचा भाग (मान व डोके) वर सरकायचा; परिणामी सूक्ष्मदेहाचे पाय जमिनीपासून एका फूटावर असायचे.

अर्थात स्थूल देहाचे पाय जमिनीवर राहायचे पण मला मात्र ते जमिनीवर आहेत असे वाटायचे नाही.

याशिवाय भक्ताला, त्याच्या पत्नी-मुलांना घरात आगीचे लोळ दिसायचे. जवळजवळ पाच वर्षे उपाय केल्यावर घर चांगले शुद्ध झाले. ज्या घरात मी पाऊल टाकणेही कठीण होत होते. त्याच घरात मी आरामात राहू लागलो.

काही काही स्थानामध्ये एका विशिष्ट कोपऱ्यातच दुष्ट शक्ती असतात. बाकी सर्व जागा व्यवस्थित असते.

एका तथाकथित योगिनीचे नांव बरेच दिवस ऐकून होतो. भारतात अशा प्रकारच्या लोकांना तोटा नाही. एकदा एका स्त्रीने मला सांगितले की, मी योगा टीचर आहे. असे म्हणून तिने पुराव्यादाखल योगा टीचरचे सर्टिफिकेट व योगावर लिहिलेला प्रबंध दाखवला. परंतु तिला हे कधीही कळले नाही की तिने तो प्रबंध दुसऱ्याकडून लिहून घेतला होता व तिला योग विषयावरचे काडीचेही ज्ञान नाही हे मला चांगले ठाऊक होते. तिच्या अपेक्षेप्रमाणे मी तिचे भरपूर कौतुक केले व योगातले मला फार

काही कळत नाही असे सांगितले. हे अगदी खरे आहे, की मला योगातले काहीही कळत नाही. परंतु हेही तितकेच खरे आहे, की परमेश्वराची अपार कृपा असून, मी त्याच्या हातातील एक बाहुले आहे. तो रोज नवीन काहीतरी शिकवीत असतो.

तर त्या योगा टीचरला तेरा वर्षांनंतर एकदा मी सहज विचारले, ''जरा पद्मासनात बसशील का?'' तेव्हा ती म्हणाली, ''मला कुठे पद्मासन येतंय!''

''पण तू तर योगा टीचरचा कोर्स तेरा वर्षांपूर्वी केलास! व त्यावेळी तू जो भेटेल त्याला आपण सध्या योगा करीत आहोत म्हणून सांगत होतीस!'' यावर तिने उत्तर न देता मान खाली घातली.

असो! तर मी त्या तथाकथित योगिनीला भेटायला गेलो.

आध्यात्म आणि योग या विषयावर तिला फारशी गति नव्हती, ती एक साधी स्त्री होती. वृद्धावस्थेमुळे तिला जपजाप्य करणे पण जमत नव्हते.

रात्री तेथे झोपलो तेव्हा मला जाणवले की त्या जागेत खूप वाईट स्पंदने आहेत. मला खूपच त्रास होऊ लागला. कशीबशी मी रात्र काढली व दुसऱ्या दिवशी झोपायची जागा बदलली. झोपायची जागा बदलल्यावर काहीच त्रास झाला नाही. फक्त एका कोपऱ्यातच वाईट स्पंदनांचा प्रभाव होता.

भारतात काही साधक असे आहेत, की भूत पिशाच्चांची

साधना करणे व भूतांना आपल्या मुठीत ठेवणे, त्या भूतांच्या मदतीने लोकांची कामे करणे हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय त्यांनी ठरविलेले असते. अशा लोकांना तांत्रिक म्हणतात. स्वत:हून व जाणूनबुजून स्वेच्छेने त्यांनी हा मार्ग स्वीकारलेला असतो.

माझ्या प्रवासी जीवनात मला बरेच तांत्रिक भेटले. हे तांत्रिक भूत-पिशाच्चांना निरनिराळ्या प्राण्यांचे बळी देऊन त्यांच्याकडून काही शक्ती प्राप्त करतात. त्यांच्या शक्तींनी व चमत्कारांनी सामान्य जनता प्रभावित होते. परंतु त्यांना शांती व ईश्वरी आनंद प्राप्त होत नाही. वृद्धावस्थेमध्ये मन दुर्बल झाले की, साधनेने एकेकाळी वश केलेली भूते मग तांत्रिकांच्या मानगुटीवर बसतात व त्यांना यातनामय मृत्यू प्राप्त होतो. मृत्यूनंतरही त्यांचे अनंतकाळपर्यंत हाल होतात. म्हणून चुकूनही कधी तंत्र मार्गाने जाऊ नये.

या पुस्तकातील अक्षरन्अक्षर जरी सत्य असले तरी शक्यतो नांवाचे उल्लेख टाळले आहेत, कारण कुणाच्याही मनाला दुखवले जाऊ नये.

तंत्र मार्गाला ''**तामसमार्ग**'' असे म्हणतात. या मार्गाने थोडीशी साधना केली की, खूप शक्ती प्राप्त होते. असे खूप लोक मी पाहिले आहेत, की त्यांनी फक्त चाळीस दिवस साधना करून शक्ती प्राप्त केलेली आहे.

अदृश्य सृष्टीमध्ये असंख्य भूते तडफडत असतात. त्यांना

रक्त पिण्याची इच्छा सतत होत असते. अशी भूते तांत्रिक साधकांना तात्काळ वश होतात. दर अमावस्येला एका कोंबडीचा बळी द्यायचा या करारावर काम करण्यास कबूल होतात. याशिवाय या करारात आणखी बऱ्याच अटी भूते घालतात. त्या सर्व कबूल कराव्या लागतात.

फक्त चाळीस दिवस साधना करा व सिद्धी मिळवा अशा प्रकारे जाहिरातबाजी करणाऱ्या लोकांची संख्या भारतात काही कमी नाही. केवळ अशा जाहिरातबाजीवर जगणारे व तंत्र-मंत्रावर थापेबाजी करून जगणारे लोक आहेत.

भारतात अशा सर्व प्रकारचा बाजार भरलेला आहे. अनेक देशी-परदेशी लोक त्यांच्या नादी लागतात, परंतु प्रेम, शांती व आनंद प्राप्त करण्याचा मार्ग अत्यंत भिन्न असून, तो स्वत:च शोधावा लागतो.

पुढील प्रकरणामध्ये मला भेटलेल्या काही तांत्रिकांविषयी चर्चा करू, अर्थात सर्व तांत्रिकांची माहिती या एका पुस्तकात घेणे शक्य नाही.

''**भारतीय गूढविद्या**'' (Mysticism in India) या माझ्या दुसऱ्या पुस्तकात मी या विषयावर बरेच लिहिले आहे.

◆ ◆ ◆

# ७. तांत्रिकांच्या कथा

गुजरातमध्ये दोन प्रसिद्ध तांत्रिक रहात होते. त्या दोघांना भेटायचे ठरवून मी गुजरातमध्ये गेलो.

तांत्रिक स्वभावाने खूपच चांगला होता, पण जेव्हा मी त्याच्या पूजास्थानात पाऊल ठेवले, तेव्हा स्प्रिंग आकारामध्ये शक्तीचे प्रवाह माझ्या देहात प्रवेश करू लागले. तात्काळ मी तेथून बाजूला झालो. त्या साधकाने राहण्याचा खूप आग्रह केला, पण मी तेथे राहिलो नाही.

नंतर माझ्या लक्षात आले, त्याच्या पूजास्थानात त्या तांत्रिकाने काही प्राणी मारून त्यांची मुंडकी जमिनीत पुरून त्याची वेदी बनवली होती. तेथे जाताच मला धोक्याची सूचना मिळाली.

हे महाशय त्यांना वश असलेल्या भूतांद्वारा लोकांची कामे करीत.

दुसऱ्या तांत्रिकाकडे त्याच दिवशी गेलो. ते पहिल्या तांत्रिकापेक्षा जास्त प्रभावी होते. त्यांनी माझ्यातील दैवी शक्ती खेचून घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या आश्रमात प्रवेश करताच मला वाईट शक्तींचा त्रास होऊ लागला. त्यात आणखी त्यांनी

माझ्यातील दैवी शक्ती खेचण्यास सुरुवात केल्यावर मला काय करावे ते सुचेना. मी तात्काळ ईश्वराची प्रार्थना केली व कशीबशी तेथून स्वत:ची सुटका करून घेतली. त्या दिवशी माझ्यातील दैवी शक्ती जेवढी नष्ट झाली तेवढी परत प्राप्त करण्यास मला अनेक वर्षे साधना करावी लागली. याशिवाय त्या एका तासातच माझा सूक्ष्मदेह इतका दूषित झाला, की तो परत शुद्ध करायला मला कित्येक महिने लागले.

अर्थात सर्वच साधू काही वाईट नसतात. खूप साधू असे आहेत, की ज्यांनी लोककल्याणासाठी अक्षरश: सर्वस्वाचा त्याग केलेला आहे. समाजात ज्याप्रमाणे शंभरात एकदोन माणसे वाईट असतात, त्याप्रमाणे साधूंमध्येही एक-दोन साधू स्वार्थी वृत्तीचे असतात.

सर्वसाधारणपणे तंत्रमार्गाचे थोडक्यात पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

साधक प्रथम काही भूते प्रसन्न करून घेतो व ती प्रसन्न झाल्यावर त्यांच्याशी करार करतो, की दर अमावस्येला मी तुम्हाला रक्त देईन, तुम्ही माझे काम करा.

या तंत्रमार्गातही अनेक पोटमार्ग आहेत पण मुख्य मार्ग दोन...

१) दुसऱ्याचे वाईट करणे Black Magic

२) दुसऱ्याचे चांगले करणे White Magic

## काळी जादू Black Magic

अदृश्य सृष्टीमध्ये काही जीवात्मे असे असतात, की ते फक्त इतरांचे वाईटच करू शकतात.

ज्याप्रमाणे पृथ्वीतलावरील काही लोक फक्त सत्तेचा दुरुपयोग करतात, काही लोक खुनी किंवा हत्यारे असतात, त्याप्रमाणे अदृश्य जगातही काही आत्मे अत्यंत दुष्ट असतात. हे फक्त वाईटच करू शकतात. असे आत्मे भयंकर यातनांनी तडफडत असतात.

दुष्ट तांत्रिक लोक अशा आत्म्यांना पकडतात. अशा दुष्ट पिशाच्चांना पकडणे अगदी सोपे असते. त्यांना मद्य-मांस-रक्त इत्यादी दिले जाते. काही वेळा किंवा काही काळ गेल्यानंतर हे दुष्ट आत्मे त्या तांत्रिकाच्या शरीराचा ताबा घेतात. असे लोक फक्त वाईट काम करू शकतात. चांगले काम फारच कमी प्रमाणात ते करू शकतात.

## धवल जादू White Magic

दुसऱ्या प्रकारचे तांत्रिक फक्त चांगले कामच करतात. वाईट काम करीत नाहीत.

त्यांची पद्धत अशी...

पृथ्वीतलावर जीवन जगताना बहुतांशी लोक परोपकार किंवा दान-धर्म करीत नाहीत. मृत्यूनंतर त्यांना शांती प्राप्त होत नाही. त्यांचे अशांत आत्मे शांती मिळावी म्हणून तडफडत असतात.

परंतु शांतीची प्राप्ती परोपकारात असते, दान-धर्मात असते. दान-धर्म, परोपकार करण्याचे साधन मानवी देह आहे व हा देह पुनश्च प्राप्त होण्यास शेकडो वर्षांचा कालावधी लागणार असतो. अशा वेळी शांती प्राप्त व्हावी म्हणून काय करायचे हा सर्वात मोठा प्रश्न सोडविण्यासाठी जीवात्मे एका मार्गाचे अनुसरण करतात. तो म्हणजे तांत्रिक साधकांद्वारा परोपकाराचे कार्य करणे.

असे आत्मे तांत्रिक साधकासमोर प्रकट होतात व त्यांच्यात पुढीलप्रमाणे करार होतो.

१) कुठलेही वाईट काम जीवात्म्यांकडून करवून घेणार नाही.

२) जीवात्म्यांच्या नियमात न बसणारे असे एक जरी काम सांगितले तरी तो जीवात्मा बंधनातून मुक्त होईल. त्या तांत्रिकाचे काम तो पुन्हा कधीही करणार नाही.

३) बळी अथवा नैवेद्य कधीही चुकणार नाही. चुकवल्यास शिक्षेस पात्र होईल. काही जीवात्मे हे रक्त-मांसप्रिय असतात. तर काही जीवात्मे भोजनप्रिय असतात. त्यांना आवडणारा पदार्थ दिला की काम संपले.

४) कुणाकडून पैसा मागून घेणार नाही म्हणजे पैसे घेऊन काम करणार नाही. पैशासाठी अडवणार नाही. स्वेच्छेने दिले तर घेईन पण आशा ठेवणार नाही.

अशा प्रकारे करार ठरवून मग जीवात्मे त्या तांत्रिकाच्या हाताखाली काम करू लागतात.

◆ ◆ ◆

# ८. धवल विद्येचे अनुभव

उत्तर प्रदेशामध्ये एक असे साधक होते, की त्यांच्याकडे अनेक प्रकारचे जीन्स (आत्मे) काम करीत. त्यांच्याकडे कोण मनुष्य येत आहे? त्याचे नाव गाव काय? तो कोणत्या कामासाठी येत आहे? त्यावरचे उपाय कोणते? इत्यादी सर्व गोष्टी ते जीन्स त्या व्यक्तीला अगोदरच सांगत असत. थिएटरमध्ये चाललेला सिनेमा हे महाशय आपल्या घरातील भिंतीवर उपस्थितांना दाखवित असत.

कर्नाटकातील ऐनापूर येथील भूताळी नांवाच्या व्यक्तीच्या अंगात एक भूताळसिद्ध नांवाचा आत्मा येत असे व तो लोकांना बऱ्याच गोष्टी अचूक सांगत असे.

मुंबईत एका व्यक्तीकडे एक पिशाच्च असून, एखाद्या व्यक्तीने नाव सांगताच ते पिशाच्च त्या व्यक्तीच्या कानात त्या व्यक्तीची जन्म तारीख अचूक सांगते.

मुंबईतील आणखी एका स्त्रीकडे तिचे आजोबा व आजी यांची भूते असून, या स्त्रीकडे बरेच लोक मार्गदर्शनासाठी येत असतात.

पुण्यात पूर्वी एक साधक रहात, त्यांना अनेक भूते वश होती. ते माणसाचे भूत-भविष्य अचूक सांगत. अनेक लोक त्यांच्याकडे जात. वृद्धावस्थेमध्ये त्यांच्याकडून काही चुका घडल्या, परिणामी त्या भूतांनी त्यांना खूप त्रास दिला. छळून छळून त्यांचा अंत घडवून आणला.

मला दोन स्त्रिया भेटल्या...

एका स्त्रीच्या हातातून कुंकू व विभूति बाहेर पडत असे, तर दुसऱ्या स्त्रीच्या पायातून हळद व कुंकू बाहेर पडत असे. एका पायातून हळद तर दुसऱ्या पायातून कुंकू बाहेर पडत असे.

एका मुस्लीम फकिराजवळ दोन भूते होती. त्याच्या आधाराने तो लोकांची कामे करीत असे. एकदा काही चुकीचे काम जीनला सांगितल्याने त्या जीनने त्या फकिराच्या एक मुस्काटात लगावली व तो जीन त्या फकिराला सोडून गेला. त्या फकिराचे तोंड कायमचे वाकडे झाले.

आंध्रप्रदेशात एक अवलिया रहात होते. त्यांचेकडे खूप माणसे येत असत. एकदा एक दुकानदार त्यांचेकडे आला व म्हणाला, ''माझे दुकान चालत नाही.''

त्या अवलियाने त्याला सांगितले...

''तुझ्या दुकानाची जागा खराब आहे, तेथे काही दुष्ट शक्ती आहेत, त्यामुळे तुझे दुकान चालत नाही. तीन महिन्यांनंतर तुझ्या दुकानाच्यासमोरील एक जागा मोकळी होईल ती तू घे! तेथे

चांगली स्पंदने आहेत. तेथे तुझे दुकान चांगले चालेल.''

या सर्व गोष्टी त्यांना त्यांच्या जीनने सांगितल्या. प्रत्यक्षात ते त्या व्यक्तीच्या गावी कधीही गेले नव्हते.

''पण माझ्या दुकानासमोर ज्यांचे दुकान आहे ते तर खूपच चांगले चालत आहे, मग तीन महिन्यांनी तो ती जागा कशी सोडेल? चांगला चालणारा धंदा कोण कशाला गुंडाळेल?'' या माणसाने विचारले.

यावर ते अवलिया म्हणाले....

''तू तीन महिन्यांनी याचे उत्तर स्वतःच दे.''

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तीन महिन्यांच्या आत त्या समोरच्या दुकानदाराचा धंदा बसला व त्याने ती जागा सोडून दिली. ती जागा त्या व्यक्तीला भाड्याने मिळाली व धंदा चांगला चालू लागला.

यानंतर परत तो त्या अवलियांना जाऊन भेटला व त्याने त्यांना स्पष्टच विचारले,

''मला जागा मिळावी म्हणून तुम्ही तुमच्याकडील जीन्समार्फत त्या दुकानदाराला सतावून ती जागा सोडण्यास भाग पाडलेत, खरे ना!''

यावर त्या अवलियाने त्याला शांतपणे सांगितले, ''त्या माणसाचे पुण्य संपले होते व त्याचा धंदा तीन महिन्यात बसणार हे मला जीनने सांगितले, त्यामुळे मी तुला ती जागा घेण्यास

सांगितली.''

ही गोष्ट खरी आहे की, पुण्य संपल्यावर धंदे बसतात, लक्ष्मी निघून जाते, दारिद्र्य येते. हिंदूधर्माप्रमाणे एखाद्या घरामध्ये सत्तर ते पंचाहत्तर वर्षे (जास्तीत जास्त) लक्ष्मी राहते. नंतर ती तेथे रहात नाही. जर लक्ष्मी नेहमी राहावी, पिढ्यान्‌पिढ्या राहावी असे वाटत असेल तर आपल्या उत्पन्नातील वीस टक्के रक्कम दानधर्मात खर्च करावी, तरच लक्ष्मी टिकून राहते. बऱ्याच घराण्यातील लक्ष्मी तीस वर्षातच नष्ट होते.

मुस्लीम धर्मामध्ये बरेच लोक दर्ग्याजवळ चाळीस दिवस साधना करून जीन्सना वशीभूत करतात. हैद्राबादमध्ये अगदी गल्लोगल्ली असे पीर फकीर आढळतात.

महाराष्ट्रात पुण्याजवळ एक दर्गा असून त्या दर्ग्याचे द्वार खूपच छोटे आहे. या छोट्या चौकोनी (१।। x १।। फूट) दारातून जाडजूड माणसे कशी काय आत जातात ते कळत नाही. परंतु एखाद्या व्यक्तीच्या कमरेला चामड्याचा पट्टा असेल तर तो मनुष्य आत जाऊच शकत नाही.

ज्यांच्याजवळ दैवी शक्ती आहे, अशा लोकांनी, जे लोक भूत, प्रेत, जीन्स, मृतात्मे यांच्या आधाराने लोकांची कामे करतात त्यांच्याजवळ जाऊ नये. कारण हे आत्मे जरी चांगली कामे करीत असले तरी ते ज्या लोकात असतात तो लोक खूपच खराब असतो. या मृतात्म्यांची किंवा जीन्सची स्पंदने चांगली नसतात.

त्यामुळे ज्यांची स्पंदने पवित्र आहेत, अशी व्यक्ती अपवित्र स्पंदनांच्या जागी गेली की, तिला तात्काळ त्रास होतो. तिचा सूक्ष्मदेह दूषित होऊ लागतो व मग पुन्हा साधना, ईश्वर भक्ती करून सूक्ष्मदेह शुद्ध करण्यास बरेच दिवस लागतात. त्यामुळे गूढविद्येच्या आधारे अचूक गोष्टी सांगणाऱ्याकडे पवित्र माणसांनी जाऊ नये हेच जास्त चांगले.

पावित्र्य हे फक्त ईश्वराची भक्ती केल्यानेच येते. ज्याप्रमाणे पवित्र व्यक्ती अपवित्र व्यक्तीच्या संपर्कात, स्थळांच्या संपर्कात आली तर तिला त्रास होतो. त्याप्रमाणे खूप अपवित्र व्यक्ती जर पवित्र व्यक्तीच्या संपर्कात आली तर तिलाही पवित्र व्यक्तीची स्पंदने सहन होत नाहीत. इतकेच नव्हे तर अपवित्र व्यक्ती जर पवित्र स्थळात गेली तरी तिला त्रास होतो.

मी अरण्यात साधना करीत होतो, तेथे मला भेटण्यासाठी एक गृहस्थ व त्यांचा मुलगा आला. ते काही दिवस राहणार होते.

त्या मुलाच्यामागे मला दुष्ट शक्ती दिसत होती म्हणून मी त्या मुलाला म्हटले, ''हे बघ! समोरच्या जंगलात मुळीच जाऊ नकोस. तसेच झाडावर किंवा कुठेही उंच जागी चढू नको!''

त्या मुलाने सर्व हो म्हटले.

दुसऱ्या दिवशी तो मुलगा मी ज्या परिसरात जाऊ नको असे सांगितले होते तेथे गेला. त्याच्या हातात कुऱ्हाड होती.

अचानक त्याला कुणीतरी ढकलल्यासारखे झाले व तो

खाली पडला. कुऱ्हाड मांडीवर पडली. शेवटी मला धावपळ करावी लागली. हॉस्पिटल तेथून चाळीस किलोमीटर अंतरावर होते व त्यातील तेरा किलोमीटर प्रवास चालत करावा लागणार होता.

शेवटी धावपळ करून माणसे गोळा केली व मुलाला हॉस्पिटलमध्ये दाखल केला. त्याच्या मांडीला चौदा टाके पडले. एक महिन्याने तो ठीक झाला.

एक वर्षाने परत तोच मुलगा आला. मी त्याला परत त्याच सूचना दिल्या. या खेपेला त्याने सर्व सूचना काळजीपूर्वक पाळण्याचे वचन दिले. दोन दिवसांनंतर तो तेथील पाण्याच्या टाकीवर चढला. वर चढताच त्याला कोणीतरी खाली ढकलले व तो पाण्यात पडला. सुदैवाने पोहता येत असल्याने त्याला काहीही झाले नाही.

एकदा एक मुलगी मुंबईहून आली. मी तिला म्हटले इतर कुठेही फिरलीस तरी चालेल पण धुनीच्या झोपडीत जाऊ नकोस.

तिला असे सांगण्याचे कारण, तिच्यामागे खूप दुष्ट शक्ती होत्या व धुनीच्या झोपडीमध्ये खूप दैवी शक्ती होत्या. ती जर त्या झोपडीत गेली असती तर दोन्ही शक्तींमध्ये वितुष्ट आले असते व तिला त्याचा त्रास झाला असता.

दोन दिवसांनंतर तिला मी जे सांगितले त्याचा विसर पडला व ती त्या झोपडीत गेली, परंतु प्रवेशद्वारातून आत जाताच तिला खूप त्रास होऊ लागला. कोणीतरी आपले प्राण खेचत आहे, असे

वाटू लागले. कशीबशी ती बाहेर आली व बेशुद्ध पडली. तिच्यावर उपचार करून तिला शुद्धीवर आणली व म्हणालो,

''पुन्हा असे करू नकोस! येथे खूप पवित्र शक्ती आहेत. तुझ्यातील अपवित्र शक्तींना ती पवित्र करण्याचा प्रयत्न करते म्हणून तुला त्रास होतो. हे काम हळूहळू व्हायला हवे.'' कालांतराने तिचा सूक्ष्मदेह पूर्णपणे शुद्ध झाला व तिला कुठेही फिरण्याची परवानगी मिळाली.

चांगल्या व वाईट शक्तीचे ज्ञान हे स्वत:च्या अनुभवानेच मिळवावे लागते. आध्यात्मशास्त्र अशा प्रकारचे शास्त्र आहे, की त्याच्या शाळा काढता येत नाहीत. कारण प्रत्येक व्यक्तीचा मार्ग वेगळा असतो. त्याने स्वत:च तो शोधायचा असतो. यात घाईगर्दी चालत नाही. कुठलेही मोजमाप येथे उपयोगी येत नाही. अगदी शांतपणे व सावधपणे परमार्थ करायचा असतो. थोडीशी असावधानी जन्माचे नुकसान करण्याची शक्यता असते.

आध्यात्मिकता ही एखाद्या वृक्षाप्रमाणे हळूहळू वाढायला हवी. परोपकार, दान केल्याने आध्यात्मिकता आपोआपच येते व विकसित होते, पण उगाचच शक्ती, सिद्धी मिळविण्यासाठी धडपडून काहीही उपयोग होत नाही. यदाकदाचित बऱ्याच शक्ती व सिद्धी प्राप्त झाल्या तरीही मृत्यूनंतर अशा लोकांना उच्च गती प्राप्त होत नाही. याशिवाय परमेश्वर दर्शन होणे अथवा परमेश्वरापर्यंत जर पोहोचायचे असेल तर अशा शक्तींना सोडावेच लागते.

शक्ती व सिद्धी सोडल्याशिवाय परमेश्वराच्या दरबारात प्रवेश प्राप्त होत नाही व यदाकदाचित अशी साधना करताना अपयश आले तर वेडही लागते. मृत्यू ओढवतो किंवा नखशिखांत तो पिशाच्च शक्तींनी भरून जातो. महादरिद्री, दुर्दैवी व भिकारी होतो.

कुमारस्वामी नांवाचा एक तामिळ साधू होता. त्याने स्मशानात बसून, पिशाच्च साधना केली. दोन चार दिवसांतच तो अंतर्बाह्य पिशाच्च बनून गेला. आपण काय करतोय हेच त्याला कळत नसे. काही दिवसांनी त्याने स्मशानात जाळायला येणाऱ्या प्रेतांचे मांस खाण्यास सुरुवात केली, परंतु तो हे करतोय हे त्याला कळत नसे. त्याला लोक विचारीत की, तू इतका भुकेलेला का आहेस ? आम्हाला सांग! आम्ही तुला खायला आणून देऊ, पण प्रेतमांस कशाला खातोस? आपण प्रेतांचे मांस खाल्ले हेच त्याला आठवत नसे.

अशा प्रकारे साधना करीत असताना एक दिवस त्याच्या कानात रक्त हवे! रक्त हवे! असे शब्द ऐकू येऊ लागले. त्वरित त्याने वीरासनात बसून स्वत:ची मांडी चिरली. लगेच रक्ताची धार सरळ आकाशात उभी गेली व पिशाच्चाने रक्त प्राशन केले.

दुसऱ्या रात्री एक भयंकर जीन प्रकट झाला. त्याला मुंडके नव्हते. त्याचे ते भयंकर रूप पाहून कुमारस्वामी इतक्या जोराने

किंचाळला की त्याचे ते किंचाळणे एक कि. मी. दूर ऐकू गेले व तो तेथेच बेशुद्ध पडला. नंतर त्याला एक सिद्धी प्राप्त झाली. या सिद्धीमुळे त्याला रोज शंभर रुपये मिळत. हे शंभर रुपये त्याने त्या दिवसात पूर्ण खर्च करायचे, शिल्लक ठेवायचे नाहीत. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचे भूतभविष्य त्याला कळू लागले.

कालांतराने काही चुकीमुळे त्याला मिळालेली सिद्धी नष्ट झाली. सर्व बाजूंनी भूते त्रास देऊ लागली व हा भिकारी बनला. मागूनही भीक मिळेना. त्यामुळे अनेक दिवस उपाशी राहावे लागे. साधे रामनाम मुखात येईना. सर्व बाजूंनी दैन्यावस्था झाली.

श्रीशैल क्षेत्री तो मला भेटला. मला त्याची दया आली. मी त्याला सरळ आश्रमात आणून ठेवले. आता तो सुखी आहे.

◆ ◆ ◆

# ९. प्राणी, पक्षी, झाडे यांच्यामागील चांगली व वाईट शक्ती

आतापर्यंत आपण मानवामागील चांगल्या व वाईट शक्तींविषयी माहिती घेतली. आता झाडे, प्राणी, पक्षी यांच्यामागील शक्तींविषयी माहिती घेऊ.

**प्राणी**

**गाय :** हिंदू धर्मामध्ये लोक गाईला खूप पवित्र मानतात. गाईमध्ये खूप पवित्र स्पंदने आहेत. अपवित्र स्पंदने मुळीच नाहीत. यासाठीच गाईची पूजा करतात.

**बैल :** बैलामध्येही चांगली स्पंदने असतात.

**कुत्रा :** कुत्र्यामध्येही चांगली स्पंदने असतात. कुत्रा हा भैरवाचा प्रतिनिधी आहे.

**गाढव :** वाईट स्पंदने असतात.

**मांजर :** मांजरामध्ये मिश्र स्पंदने आढळतात. शुभ्र मांजरामध्ये चांगली स्पंदने आढळतात. तर काळ्या मांजरामध्ये वाईट पैशाचिक स्पंदने आढळतात. पिशाच्च काळ्या मांजराच्या रूपात दिसते.

**शेळी व मेंढी :** शेळ्या तसेच मेंढ्यांमध्ये चांगली स्पंदने असतात. शेळ्या मेंढ्यांच्या सहवासात राहणारी व्यक्ती निरोगी असते. त्यांच्या सहवासात राहणाऱ्या व्यक्तीला क्षयाचा (टी. बी.) विकार होत नाही.

**म्हैस व रेडा :** या प्राण्यांमध्ये दुष्ट स्पंदने असतात. तांत्रिक लोक दुष्ट शक्ती प्राप्त करण्यासाठी यांचा वापर करतात. स्वप्नात म्हैस वा रेडा येणे, हे खूप वाईट मानले जाते. त्यामुळे संकटे येतात असे हिंदूधर्मात मानले जाते.

**डुक्कर :** वाईट शक्तींचे प्रतिनिधित्व करतो. याच्यामध्ये खूप वाईट शक्ती असतात. पिशाच्चे डुकराच्या रूपात दिसतात किंवा वाटेत आडवी येतात.

**वानर :** वानरामध्ये पिशाच्च शक्ती दूर करण्याचे सामर्थ्य असते असे म्हटले जाते.

**हरिण :** हरिणामध्ये पवित्र स्पंदने खूप असतात. याच्या चर्मावर बसून मंत्रजप केला असता ज्ञान प्राप्त होते. यासाठी भारतातील बरेच साधू हरिणाच्या चर्मावर बसून जप करतात. आध्यात्मिक प्रगतीसाठीही हरिणाजिनावर बसून जप करणे, श्रेष्ठ मानले गेले आहे. हा सात्त्विक स्पंदनांचा प्राणी आहे.

**वाघ :** वाघामध्ये नवग्रहांकडून येणारी स्पंदने आपल्याला अनुकूल करण्याचे सामर्थ्य आहे. वाघनख धारण केले असता नवग्रहांची शांती होते, असे मानले जाते. नैसर्गिकरित्या (मारलेल्या

नव्हे) मेलेल्या वाघाच्या चर्मावर बसून मंत्रजप केला असता शक्ती प्राप्त होते. वाघाचे, सिंहाचे सामर्थ्य सारखेच मानले गेले आहे. परंतु सिंहाची स्पंदने ही वाघापेक्षा अधिक पवित्र असतात.

**अस्वल :** अस्वलामध्ये वाईट स्पंदने असतात. पिशाच्च शक्ती यांच्यातही आढळते, परंतु बर्फामध्ये राहणाऱ्या पांढऱ्या अस्वलामध्ये चांगली स्पंदने असतात.

**तरस :** अतिशय घाणेरडी स्पंदने या प्राण्यात असतात.

**लांडगा :** याच्यामध्ये वाईट, तामसी स्पंदने आढळतात.

**कोल्हा :** या प्राण्याची स्पंदने मिश्र स्वरूपाची असतात. कोल्हा स्वप्नात येणे हे शुभ मानले जाते. एखाद्या कामासाठी जात असता वाटेत कोल्हा दिसला तर यश प्राप्ती होते.

**हत्ती :** हा सात्त्विक व शुद्ध स्पंदनांचा प्राणी आहे. हत्तीमध्ये दैवी स्पंदने आढळतात. हत्तीचे वैशिष्ट्य असे असते, की एखादा हत्ती खूप पिसाळलेला असेल व आपल्या अंगावर धावून येत असेल तर त्याला नमस्कार करताच तो शांत होतो व काहीही न करता बाजूला निघून जातो.

**मुंगूस :** हा दैवी स्पंदने असणारा प्राणी आहे. हा प्राणीही वाटेत दिसताच यश प्राप्ती होते.

## पक्षी

**मोर :** अत्यंत चांगली स्पंदने मोरामध्ये असतात. दैवी स्पंदनांचा हा पक्षी असल्याने दुष्ट शक्तीपासून स्वत:चे रक्षण

करण्यासाठी मोराची पिसे जवळ बाळगतात. हिंदू घरामध्ये मोराची पिसे ठेवली जातात. मुस्लीम धर्मस्थानामध्ये दर्ग्यामध्येही मोरचेले ठेवले जातात.

**पोपट :** हा अत्यंत शुभ पक्षी मानला जातो. त्यामुळे लोक याला घरी पाळतात.

**भारद्वाज :** हा पक्षीही दैवी स्पंदनांचा पक्षी आहे. याचे दर्शन हे अत्यंत शुभप्रद मानले जाते. घरातून बाहेर पडताना वा प्रवास करताना याचे दर्शन झाले असता प्रवास सुखरूप होतो व कामे तडीस जातात.

**हंस :** हा पक्षीही दैवी पक्षी आहे. याच्यामध्ये दैवी स्पंदने असून स्वप्नात याचे दर्शन होणे शुभ मानले जाते.

**गरुड :** याच्यामध्येही चांगली स्पंदने असतात.

**कबुतर :** याच्यामध्येही चांगली स्पंदने असतात.

**कावळा :** हा मिश्र स्पंदनांचा पक्षी आहे. तरीही याच्यामध्ये प्रामुख्याने अशुभ स्पंदनेच जास्त असतात. हा पितरांचे प्रतिनिधित्व करतो. हा शनीग्रहाचे वाहन आहे. शनीग्रहाची स्पंदने प्रसृत करतो. याला खायला दिले असता शनीची पीडा होत नाही, असे हिंदूधर्मात सांगितले आहे. हा मृतात्म्यांचे प्रतिनिधित्व करीत असल्याने याला खायला घातल्याने पितरांचीही तृप्ती होते, असे म्हटले जाते.

**चिमण्या :** या राहू ग्रहाचे प्रतिनिधित्व करतात, यासाठी

चिमण्यांना बाजरी खाऊ घालावी म्हणजे राहूची पीडा कमी होते, असे मानले जाते. चिमण्यांची स्पंदने ही चांगली असतात. ज्या वास्तूला आगामी काळात धोका नाही अशाच वास्तूत चिमण्या आपली घरटी बांधतात, असे म्हटले जाते.

**कोंबडा :** कोंबड्यामध्येही शुभ स्पंदने आढळतात.

**पिंगळा :** हा एक जंगली पक्षी असून, हा भविष्य कथन करतो. भारतात काही लोक स्मशानात काही दिवस साधना करून या पक्ष्याची भाषा जाणण्याची विद्या शिकतात. हा माणसाचे अचूक भूत-भविष्य कथन करतो. परंतु हा पिशाच्च शक्ती स्पंदनांचा पक्षी आहे.

**गिधाड :** गिधाडामध्ये खूप वाईट स्पंदने असतात. पिशाच्च शक्तीचे हा प्रतिनिधित्व करतो. प्रवासात गिधाड दिसले तर प्रवास कष्टप्रद होतो, असे मानले जाते.

**घुबड :** सर्व धर्मांमध्ये हा पक्षी अशुभ मानला जातो. जंगली जाती जमातीतही हा अशुभ समजला जातो. या पक्ष्यामध्ये खूप वाईट, दुष्ट स्पंदने असतात. तांत्रिक सिद्धींसाठी तांत्रिक लोक किंवा ब्लॅकमॅजिक करणारे या पक्ष्याचा वापर करतात. पैशाचिक स्पंदने या पक्ष्यात सर्वांत जास्त असतात.

**घार :** घारीमध्ये शुभ स्पंदने असतात.

## वनस्पती

**औदुंबर :** या वृक्षात अत्यंत दैवी स्पंदने आढळतात. याची

स्पंदने शांती प्रदान करतात. या वृक्षात शीतलता अधिक असते. सात्त्विक स्पंदनांच्या या वृक्षामध्ये दत्तात्रेयांची स्पंदने असल्याने हिंदूधर्मात याला पाणी घालणे वा याच्याजवळ दिवा लावणे हे शुभ मानले जाते. यामुळे साहजिकच त्या व्यक्तीला सात्त्विकता प्राप्त होते. नदीच्या किनारी असणाऱ्या औदुंबर वृक्षामध्ये खूप दैवी शक्ती असते.

**आंबा :** अत्यंत चांगली स्पंदने असणारा हा वृक्ष आहे. याच्यामध्ये दैवी स्पंदने आहेत, म्हणून शुभ कार्यामध्ये याच्या पानांचा तोरण म्हणून उपयोग करतात. याच्यामध्ये देवीची स्पंदने असतात.

**तुलसी :** अत्यंत सात्त्विक स्पंदनाचे हे झाड आहे. हिंदू घरांसमोर याचे वृंदावन असतेच असते. या झाडालाही पाणी घातल्याने सात्त्विकता व शांती लाभते.

**पिंपळवृक्ष :** या वृक्षामध्ये चांगली व मध्यम दोन्ही प्रकारची स्पंदने असतात. या वृक्षातळी दिवा लावल्याने भाग्य वृद्धी होते.

**वटवृक्ष :** चांगली व मध्यम दोन प्रकारची स्पंदने असतात. परंतु या वृक्षाची स्पंदने ही सुप्तावस्थेत असतात. वरील पाचही वृक्षांना नेमाने पाणी दिल्यास व्यक्तीचा भाग्योदय होतो. कष्ट तसेच त्रास कमी होतात.

**रुद्राक्ष :** रक्त शुद्ध करणारी स्पंदने या वृक्षात असतात.

**चंदन :** या वृक्षात सात्त्विक व शांती देणारी स्पंदने असतात.

**हिरडा :** ही औषधी वनस्पती आहे. हिरडा उशाखाली ठेवून झोपले असता वाईट स्वप्ने पडणे थांबते. याची स्पंदने चांगली असतात.

**सर्पगंधा :** या वनस्पतीच्या जवळ कधीही साप येत नाही. साप या वनस्पतीपासून सदैव दूर राहतो. या वनस्पतीचा वास सापाला सहन होत नाही. या वनस्पतीच्या काडीचा एक लहानसा तुकडा जर गळ्यात बांधला तर साप स्वप्नात येत नाही व जंगलातून फिरताना सर्प भय रहात नाही.

**बाभूळ :** या झाडाजवळ सतत पिशाच्चे राहतात. पिशाच्च साधना करणारे या झाडाच्या आश्रयाने साधना करतात.

तसा हा विषय अत्यंत सखोल आहे. परंतु आपल्या अवती–भोवती स्पंदनाचे साम्राज्य कसे आहे याची थोडीफार ओळख व्हावी म्हणून माहिती दिली आहे.

वड, औदुंबर, पिंपळ या वृक्षांची लागवड केल्याने खूप पुण्य मिळते. तसेच या वृक्षांना तोडू नये असे शास्त्रात सांगितले आहे.

◆ ◆ ◆

# १०. भारतातील गूढ स्थाने

अमरावतीजवळ (महाराष्ट्र) रिद्धपूर नांवाच्या गावात एक वृक्ष असून, या वृक्षात दैवी आत्म्याचा निवास आहे. या वृक्षातून पेढे, किसमिस, बेदाणा, खडीसाखर यांचा प्रसाद भक्ताला प्राप्त होतो. कधीकधी तर आपल्या प्रश्नाचे उत्तर देणारा कागद यातून बाहेर येतो.

भद्राचलम् (आंध्रप्रदेश) येथे जंगलात असा वृक्ष आहे, की त्या वृक्षाच्या प्रत्येक पानावर हनुमान मूर्ती असते. हे एक आश्चर्य आहे. दुष्ट शक्तीपासून संरक्षण व्हावे म्हणून लोक ही पाने घरात फ्रेम करून लावतात.

आफ्रिकेत असे वृक्ष आहेत, की ते सजीव प्राण्यांना खातात. ही गोष्ट मी सुमारे पंचवीस-तीस वर्षांपूर्वी एका पुस्तकात वाचली होती. हे वृक्ष इतके भयंकर आहेत, की त्यांच्या क्षेत्रात सजीव प्राणी जाताच त्या झाडांच्या फांद्या वाकतात व त्या सजीव प्राण्याला पकडतात. नंतर ते झाड त्या प्राण्याला खाते.

अनेक माणसांना त्या झाडांनी खाल्ल्यावर तेथील सरकारने त्या झाडांभोवती कुंपणे केली आहेत. कुंपणाबाहेर लोक उभे

राहतात, तेथे पक्षी विकण्याकरता लोक बसलेले असतात. पर्यटक पक्षी विकत घेतात व झाडाच्या दिशेने फेकतात. झाड त्या पक्षाला पकडते व खाऊन टाकते.

वरील गोष्ट मी एका पुस्तकात वाचली. त्या झाडाचा फोटोही त्या पुस्तकात दिलेला होता.

माझ्या मते नक्की त्या जागी राक्षसी आत्मा रहात असला पाहिजे.

पूर्वी कोकणप्रांतात काही ठिकाणी वेताळाची स्थाने होती. या स्थानात आसुरी शक्ती रहात. अनेक मणांचा भात शिजवून रेड्याच्या रक्तांत तो कालविला जाई व हवेत उडविला जाई. परंतु भाताचे एकही शीत खाली पडत नसे. रक्तात भिजवलेला सर्व भात अदृश्य होत असे.

ही सर्व स्थाने गेल्या तीस वर्षांपासून बंद पडत आली आहेत तरीही काही ठिकाणी या प्रथा आजही चालू आहेत.

काही गुहा मी पाहिल्या. लोक म्हणतात, की सुमारे शंभर वर्षांपूर्वी त्या गुहांच्या जागी प्रार्थना करून आपण ज्या वस्तू मागू त्या मिळत असत.

आदल्या दिवशी संध्याकाळी जायचे, वस्तूंची नावे तोंडाने मोठ्याने उच्चारायची व प्रार्थना करून परत यायचे.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या स्थानी त्या सर्व वस्तू सिद्ध असायच्या. आपण त्या घेऊन यायच्या. शंभर वर्षांपासून हे

प्रकार बंद झाले.

पुण्यापासून शंभर कि. मी. वर निघोण नांवाचे एक गाव असून, या गावात एक विहीर आहे. मार्च-एप्रिलमध्ये येथे मोठी जत्रा भरते. चैत्रनवमीला या विहिरीतून आपोआप मातीची घागर पाण्यावर तरंगते. लोक ती घागर बाहेर काढतात. तिची पूजा करतात. लोक चोवीस तास तिचे दर्शन घेतात व नंतर ती घागर परत विहिरीत सोडून देतात.

मी स्वत: या जागेला भेट दिली आहे. असे म्हणतात, की एक हजार वर्षांपूर्वी विहिरीतून सोन्याची घागर येत होती. जसजशी माणसांची नियत बदलू लागली तसतशी घागर चांदीची, तांब्याची, पितळेची व आता मातीची येत आहे.

अहमदनगर (महाराष्ट्र) जिल्ह्यात 'शनी-शिंगणापूर' नांवाचे एक गाव आहे. हे गाव शिर्डीपासून साठ कि. मी. दूर आहे. या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे...

या गावातील कोणाच्याही घराला दारे-खिडक्या नाहीत. कोणीही सुटकेसेस बंद करीत नाहीत. या गावात कधीही चोरी होत नाही. कारण येथे शनीची सत्ता आहे.

उज्जैन (मध्यप्रदेश) येथील भैरव मंदिरातील भैरवाची मूर्ती दारू पिते. लोक दारूच्या बाटल्या घेऊन जातात. पुजारी चांदीच्या ताटलीत दारू ओततो व मूर्तीसमोर ती ताटली धरताच कोणीतरी अदृश्य व्यक्ती दारू पीत आहे, असे प्रत्यक्ष दिसते.

राजापूर (महाराष्ट्र) एक स्थान असून, या स्थानाला 'गंगा' म्हणतात. या भागात चौदा कुंडे असून, दर तीन वर्षांतून एकदा अचानक ही कुंडे पाण्याने भरून वाहू लागतात. तेव्हा लोक याला 'गंगा' आली असे म्हणतात. तीन महिने गंगा राहते व एका रात्रीत सर्व पाणी अदृश्य होते. वैशिष्ट्य असे, की या कुंडांमधून पावसाचे पाणी अजिबात साठत नाही.

राजस्थानात एके ठिकाणी करणी नांवाच्या देवीचे मंदिर असून त्या मंदिरात सर्वत्र उंदीर आढळतात. तेथील उंदरांना कुणीही मारीत नाहीत.

परमेश्वराच्या साम्राज्यातील मनुष्य, दगड, पशु, पक्षी, वृक्ष यांच्यामागे चांगली, वाईट, मध्यम, दैवी स्पंदने व शक्ती कशा असतात याविषयी आतापर्यंत आपण माहिती घेतली.

दुष्ट शक्ती, वाईट स्पंदने यांना दूर करण्याचे कार्य करणारे बरेच लोक मी पाहिलेले आहेत. मेंटल हॉस्पिटलमध्ये शॉक ट्रिटमेंट देऊनही जे सुधारले नाहीत, ज्यांची वाचा पिशाच्च बाधेमुळे गेलेली आहे, फिट्स येत आहेत असे लोक सुधारलेले मी पाहिलेले आहेत.

हे सर्व जरी खरे असले तरी सर्व उपाय तात्कालीक ठरतात. ईश्वर भक्ती करून, ईश्वराची कृपा प्राप्त करणे हाच सर्व उपायांचा 'राजमार्ग' होय.

◆ ◆ ◆

# ११. दैवी शक्ती

दैवी शक्ती प्राप्त करण्याचे अनेक मार्ग आहेत. दैवी शक्ती प्राप्त झाल्यावर मनुष्यामध्ये आत्मविश्वास, उत्साह, कार्यकुशलता, प्रत्येक कार्यात यश, सर्वत्र विजय, सुख-समृद्धी अशा अनेक गोष्टी प्राप्त होतात. दैवी शक्तींनी संपन्न व्यक्ती या लोकात सुखी समाधानी असते.

अशा व्यक्ती पृथ्वीतलावर जीवन व्यतीत करीत असताना परमेश्वराशी कृतज्ञ राहून जर परोपकार करीत राहिल्या तर त्यांना प्राप्त झालेल्या दैवी शक्ती वाढत राहतात. परंतु मनुष्य जर कृतज्ञ, परोपकारी न होता उद्धटपणे वागू लागला, तर या शक्ती नष्ट होतात.

दैवी शक्तींनी संपन्न मनुष्य देव लोकात जातो. परोपकारीवृत्ती, दान-धर्म, प्रेम व शांती यांच्या आश्रयाने जो राहतो व जो इतरांना आनंद देतो, त्याच्यावर ईश्वरी कृपा होते व मृत्यूनंतर त्याला आनंदाच्या साम्राज्यात प्रवेश प्राप्त होतो.

पुष्कळवेळा असे घडते, की कुणाच्यातरी आशीर्वादाने किंवा थोड्याशा ईश्वरी कृपेने, एखाद्या दुर्दैवी माणसाला वैभव प्राप्त

होते. वैभव प्राप्त होताच तो अहंकाराने वागू लागतो. परोपकार व दान-धर्म करणे विसरतो. परिणामी कालांतराने पाठीमागील ईश्वरी शक्ती नष्ट होते व हा पहिल्यापेक्षा कितीतरी पटीने गरीब होतो. यासाठी नम्रता, परोपकार व दान-धर्म यांची कास कधीही सोडता कामा नये.

मी तुम्हाला अशा कितीतरी गोष्टी सांगू शकेन की, ज्या शंभर टक्के सत्य आहेत. पण मी अगोदरच तुम्हाला इतक्या गोष्टी सांगितल्या आहेत, की कदाचित वाचक कंटाळून गेले असतील. तरीपण एक छोटीशी गोष्ट सांगून मी मूळ विषयाकडे वळतो.

कर्नाटकामध्ये एक खूप श्रीमंत मनुष्य होता. पूर्ण गावावर त्याचा खूप दरारा होता. अनेक प्रकारे तो लोकांना त्रास द्यायचा, छळायचा!

मी त्या काळात अगदी तरुण होतो. जेमतेम सोळा-सतरा वर्षांचा! गावातील गोरगरीब माझ्याकडे आपल्या समस्या घेऊन येत. मी त्यांना यथाशक्ती मार्गदर्शन करीत असे. लोक मला आपल्या घरी कृतज्ञतेने जेवायला वगैरे निमंत्रित करीत व मीही आनंदाने गरिबांकडे जात असे.

माझी वाढत चाललेली लोकप्रियता त्या प्रचंड श्रीमंत माणसाला रुचली नाही. सर्वजण त्याला नाना म्हणत ! आणि एक

दिवस या नानाचा नोकर मला बोलवायला आला. मी गेलो! ते म्हणाले, ''मुला! तुझ्यासारख्या उच्च कुळातील मुलाने हलक्या जातीच्या लोकांकडे, गरिबांकडे जेवू नये. तेव्हा तू असे कर तू माझ्याकडेच रहा! मी तुला जेवायला देईन. सगळ्या लोकांना म्हणावे, तुला भेटायचे असेल त्यांनी माझ्या दारात यावं!'' बाह्यात्कारी त्याच्या त्या भाषेतील शब्द जरी साधे होते, तरी त्याच्या सूक्ष्म देहातील घाण मला स्पष्ट दिसत होती. अशा माणसाकडे जेवण तर सोडाच! पण त्याच्याबरोबर बोलत बसणेही मला बरे वाटेना!

मी त्याला समजुतीने सांगितले...

''ते सर्व गरीब आहेत, त्यांच्या दुःखावर फुंकर घालणे, त्यांचे अश्रू पुसणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे, हे सर्व करून वेळ मिळाला तर मी तुमच्याकडे जरूर येईन. त्या दुःखी गरीब पीडितांना जो आनंद माझ्यामुळे मिळतो, तो आनंद मी जर येथे बसलो तर मिळणार नाही. मला नदीकिनारी वृक्षाखाली बसणे आवडते, तेव्हा मी तुमच्या हवेलीत येण्याऐवजी जर तुम्ही नदीकिनारी त्या औदुंबर वृक्षाखाली याल तर फार बरे होईल.''

इतके सांगून मी तेथून निघून नदीकिनारी माझ्या आवडत्या औदुंबर वृक्षाखाली आलो.

नंतर संपूर्ण आठवडा मध्ये गेला. गावातील प्रत्येकाच्या

तोंडी एक प्रेमळ साधू! जे बोलेल ते खरे होते! वाचासिद्धी संपन्न साधू! निर्लोभी, एकाही पैशाची अपेक्षा न करणारा! अशी माझी वर्णने ऐकून त्या श्रीमंत माणसाला माझा राग आला.

त्याचे संपूर्ण आयुष्य स्वत:ची स्तुती ऐकण्यात गेले होते. गावातील कुणीही दुसऱ्याला चांगले म्हटलेले त्याला खपत नसे!

जर x ने y ची स्तुती त्याच्यासमोर केली तर तो नाना म्हणे, माझ्यासमोर त्याची वाखाणणी करतोस! तो काय मोठा झाला काय? की त्याने तुला काही लाच दिली.

अशा विचित्र स्वभावाच्या नानाला संपूर्ण गाव माझी स्तुती करीत आहे, हे पाहून खूप राग आला.

मी ज्या झाडाखाली बसलो होतो तेथे तो आला. बरेच काहीतरी बडबडला.

त्याचं सर्व बोलणं ऐकून घेतल्यावर मी त्याला म्हटले...

''नाना! सत्ता, संपत्ती, सामर्थ्य, सौंदर्य, आरोग्य, यश व कीर्ती या गोष्टी ईश्वराच्या कृपेने मिळत असतात, तेव्हा परमेश्वराशी नम्र व कृतज्ञ राहायला हवे. परमेश्वराशी नम्र राहणे म्हणजे सगळ्या लोकांशी प्रेमाने वागणे व परमेश्वराशी कृतज्ञ राहणे म्हणजे परोपकार करणे.''

तेथे उपस्थित लोकांना उद्देशून मी म्हणालो, ''आपण सामान्य

माणसे आहोत. या विश्वामध्ये साठ–सत्तर वर्षे राहायला ईश्वराने पाठवले आहे, तेव्हा या जगातील सर्वांशी नम्रतेने व प्रेमाने वागलो व सतत इतरांना मदत करीत राहिलो तर खऱ्या अर्थाने परमेश्वराची सेवा केल्यासारखे होईल.''

माझ्या वक्तव्याची सर्वांनी वाहवा केली. टाळ्या वाजवल्या. हा सारा प्रकार पाहून नाना खवळला व त्याने मलाही दमदाटी करण्यास सुरुवात केली.

मी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. नंतर मी दुसरीकडे निघून गेलो. मध्ये दोन तीन वर्षे गेली व परत काही कामानिमित्त त्या गावी गेलो तेव्हा गावातील लोकांनी मला सांगितले,

''तुम्ही गेलात त्या दिवसापासून नानाचे सर्व बाजूंनी नुकसान होऊ लागले. सर्व प्रॉपर्टी एक वर्षात विकावी लागली. सारा पैसा संपला. आता एक कप चहासाठी तो लोकांकडे चक्क भीक मागतो. एका विडीसाठी त्याला भीक मागावी लागते. आता तो बसच्या शेडमध्ये रात्री झोपतो. त्याच्याकडे एक जुना फाटका–तुटका सदरा व एक फाटके धोतर एवढेच आहे.''

मला हे सारे ऐकून खूप वाईट वाटले. मी त्याला भेटायला बस शेडमध्ये गेलो.

हात पाय थरथर कापत होते. दृष्टी खूपच मंद झाली होती. त्याचा चेहराच सांगत होता, की त्याने बरेच दिवसात पोटभर

खाल्लेले नव्हते.

मी जवळ जाऊन हाक मारली, नाना! त्याने वर पाहिले व म्हणाला, ''कोण! स्वामी!''

त्याने दोन्ही हात जोडले, डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले, मला तो म्हणाला,

''मी सगळ्या जगावर अन्याय केला पण माझे काहीच वाईट झाले नाही, पण मी एका संतावर अन्याय केला. माझे सर्व वैभव निघून गेले! बघा! स्वामी मी भिकारी झालो आहे. माझ्याकडे आता काही नाही.''

तो बोलताना त्याचे सर्व अंग थरथर कापत होते. त्याची दशा पाहून मला खूप दु:ख झाले.

मी त्याला म्हणालो, 'नाना! काळजी करू नका! देव दयाळू आहे. तो तुमची सोय करील.'

असे म्हणून मी त्यांना ग्लासभर चहा पाजला व खायला दिले व तेथील ओळखीच्या हॉटेलवाल्याकडे पैसे दिले व सांगितले, ''जोपर्यंत नाना जिवंत आहे, तो पर्यंत तू त्याला जे पाहिजे ते खायला, प्यायला दे व विड्या देत जा, पैसे मी देईन!''

नंतर वर्षा-दीडवर्षातच नाना अगदी रस्त्यावर स्वर्गवासी झाला. आता हा अध्याय लिहायला घेतला तेव्हा या गोष्टीची मला आठवण झाली.

## म्हणून

मानवी जीवन जगताना परमेश्वराशी कृतज्ञ राहूनच जीवन जगायला हवे व दैवी शक्ती वाढवत रहायला हवी.

आता आपण दैवी शक्ती कशा वाढवत राहायच्या किंवा ईश्वरी कृपेचा वर्षाव सतत व्हावा म्हणून काय काय गोष्टी करायला हव्यात इकडे लक्ष टाकू!

◆ ◆ ◆

# १२. दैवी शक्ती प्राप्त करण्याचे मार्ग

**१) स्तोत्रपठण :** आपल्या आवडत्या देव किंवा देवतेच्या किंवा एखाद्या संताच्या स्तोत्राचे सतत पठण करीत राहावे. सुरुवातीला दररोज किमान चाळीस वेळा स्तोत्र म्हणावे, नंतर हळूहळू वाढवत दररोज किमान एकशे आठ वेळा स्तोत्र म्हणावे.

**२) मंत्रजप :** आपल्या आवडत्या देव-देवता, संत यापैकी कुणाच्याही नांवाचा सतत जप करीत राहावे.

सुरुवातीला दररोज किमान पाच हजार जप करावा, नंतर हळूहळू वाढवावा. तसेच येता-जाता, उठता-बसता, नामस्मरण चालू ठेवावे.

भारतात काही लोक फक्त **ॐ** असा जप करतात. तर काही **ॐ नमः शिवाय** असा जप करतात. काही लोक नुसते **हरी ॐ** म्हणतात. अशा प्रकारे कोट्यावधी लोक परमेश्वराच्या कोट्यावधी नांवांपैकी एखादे नाव निवडतात व त्याचा जप करीत राहतात.

**३) ध्यान :** एकाच आसनावर बसून न हलता न डुलता आपल्या आवडत्या मंत्राचा श्वासावर लक्ष ठेवून जप करणे व

आपल्या इष्ट देवतेची मूर्ती बंद डोळ्यासमोर आणण्याचा प्रयत्न करणे. या प्रकाराला Transcendental Meditation म्हणतात.

वर एक, दोन, तीन क्रमाने साधना दिल्या असल्या व प्रत्येक साधना वेगवेगळी असली तरी कुणी एकदम वरीलप्रमाणे ध्यान Transcendental Meditation करण्याचा प्रयत्न करू नये. तसे करणे चांगले नसते.

जोपर्यंत सूक्ष्मदेह अशुद्ध आहे, तोपर्यंत मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी नामस्मरण, जप, दान व परोपकार या मार्गांनी सूक्ष्मदेह शुद्ध करण्याचा प्रयत्न करावा. सूक्ष्मदेह थोडाफार शुद्ध झाला की, मग ध्यान करावे.

सूक्ष्मदेह अशुद्ध असताना मन बळजबरीने एकाग्र केले तर ते अधोलोकात म्हणजे पिशाच्च लोकात भ्रमण करू लागेल व तेथून काढून त्याला देवलोकात नेणे अवघड होईल, म्हणून ... स्तोत्रपठण, नामस्मरण करून आधी देह शुद्ध करावा.

एका मराठी संताने म्हटले आहे...

**देह शुद्ध करूनी भजनी भजावे!**

**आणिकांचे नाठवावे दोष-गुण!!**

देह शुद्ध करून ईश्वर चिंतन केल्यानंतर मन आपोआप एकाग्र होते व ध्यानही आपोआप लागते. यासाठी परोपकार, दान, ईश्वरभक्ती करून देह शुद्धी करावी. देह शुद्ध झाला की मन एकाग्र होऊ लागते. मन एकाग्र झाले की ध्यान लागते.

वरील तीन अवस्थांमध्ये प्राविण्य प्राप्त झाल्यानंतर चौथ्या अवस्थेकडे पोहोचण्याचा प्रयत्न करावा.

**४) सो ऽहम् ध्यान :** या साधनेमध्ये आसनावर स्थिर बसून आपल्या प्रत्येक श्वासोच्छ्वासावर लक्ष ठेवायचे. बस! एवढेच! दुसरे काहीही करायचे नाही. मनात एकही विचार येऊ द्यायचा नाही. दोन तीन वर्षांच्या प्रदीर्घ अभ्यासानंतर हे जमू लागते. नंतर रोज चार ते सहा तास आसनावर बसून ही साधना केल्यानंतर आत्मसाक्षात्कार होतो.

साधना नंबर दोन एकदम सुरू करण्यास हरकत नाही. सुमारे दोन वर्षे साधना केल्यानंतर खूप दिव्य अनुभव येऊ लागतात व सात वर्षे साधना केल्यानंतर नंबर तीन व चार साधना करण्याची क्षमता आपोआपच येते. या साधना चालू असतानाच देव-देवता, अर्धदेवता, यक्ष, गण, गंधर्व, जलदेवता, अग्निदेवता, वायुदेवता, पितर, पृथ्वीवर ठिकठिकाणी भटकणारे आत्मे यांची दर्शने होतात, आणखी थोडी प्रगती झाल्यावर प्राचीनकालीन ऋषी, महाऋषी, सिद्ध, महासिद्ध यांची दर्शने होतात. आशीर्वाद व मार्गदर्शन प्राप्त होते. कितीही दर्शने झाली तरी मानवाने अर्ध्यावर साधना सोडू नये. अर्ध्यावर साधना सोडल्यानंतर उर्वरित साधना करण्यासाठी परत जन्म घ्यावा लागतो.

साधना करणाऱ्या व्यक्तीने परोपकार व दान करण्याचे व्रत घ्यायला हवे, जितका होईल तितका परोपकार, दान करीत राहायला

हवे. कारण परोपकाराने आपल्या पूर्वजन्मातील कर्मांचा ऱ्हास होतो व सूक्ष्मदेह शुद्ध होऊ लागतो.

सूक्ष्मदेह जर अशुद्ध राहिला तर साधक लक्ष लक्ष जप करीत राहिला तरी फारसा उपयोग होत नाही. कारण साधकाचा सारा जप त्याचा अशुद्ध देह शुद्ध करण्यात खर्ची पडतो. म्हणून जपाबरोबर दान व परोपकाराची खूप गरज आहे. म्हणजे दान व परोपकाराने अशुद्ध देह शुद्ध होतो व आपण जो जप करतो तो आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी उपयोगी येतो.

येथे मला माझे काही अनुभव आठवतात. ते अनुभव न सांगता त्यामागील सूत्रे सांगतो.

१) मी असे अनुभवले आहे, की एखादा मनुष्य खूप लोभी, स्वार्थी व कंजूष असतो. आयुष्यात त्याने दमडीचेही दान केलेले नसते, पण माझ्या सांगण्यामुळे तो एकदम लाख रुपयाचे दान करतो.

जेव्हा एखादा मनुष्य असे करतो, तेव्हा परमेश्वर त्या माणसाला दहा लाख रुपये मिळतील अशी व्यवस्था करतो. तो मनुष्य खूष होतो. म्हणतो, वा! काय स्वामींची कृपा आहे. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी दान केले तर माझा खूप खूप फायदा झाला. मला खूप पैसा मिळाला. परंतु त्याला हे कळत नाही की, ही ईश्वरी कृपा नव्हे! याला ईश्वरी कृपा म्हणत नाहीत. उलट जेव्हा या गृहस्थाने केवळ साधूच्या सांगण्यावरून दान केले तेव्हा त्याच्या

मनात प्रलोभनाची भावना होती.

स्वामी सांगत आहेत करू या! आपला फायदा होईल!

या व्यापारी वृत्तीमुळे ईश्वरही त्याच्याशी व्यापाऱ्यासारखा वागला व त्याने दान केलेल्या रकमेच्या दहापट रक्कम मिळेल अशी व्यवस्था केली. म्हणजे ईश्वराच्या दरबारात याच्या नांवाने काहीही पुण्य शिल्लक राहिले नाही.

**परिणामी – उद्धार नाही.**

२) काही लोक सुरुवातीला दानी नसतात, पण त्यांचे पूर्वजन्मांतील पाप फार कमी असते. त्यामुळे सत्पुरुषांच्या संगतीने ते पाप जळून जाते व दान–परोपकार, ईश्वर भक्ती व साधना करण्याच्या प्रवृत्ती यांच्यात निर्माण होतात व त्यांची प्रगती होते.

यावरून लक्षात येते, की दान–धर्म करताना ईश्वराबरोबर व्यापार करू नये. जो ईश्वराबरोबर व्यापार करतो, त्याच्याशी ईश्वरही तसाच वागतो.

अत्यंत नम्रतेने, प्रेमाने दान–धर्म करावा तरच आध्यात्मात प्रगती होते.

दैवी शक्ती प्राप्त होण्यासाठी मंत्रजप हे अत्यंत प्रभावी साधन आहे. कोठल्याही एका मंत्राचा श्रद्धेने रोज सकाळी तीन व संध्याकाळी तीन तास एकाच आसनावर बसून जप केला असता खूप शक्ती प्राप्त होते. सर्वसाधारणपणे सात महिने साधना केली असता मंत्रसिद्धी प्राप्त होते.

मंत्रसिद्धी प्राप्त झाल्यावर खूप सामर्थ्य येते. या सामर्थ्याचा वापर परोपकारासाठी करायला हवा.

अशा प्रकारे साधना करून खूप लोकांनी दैवी शक्ती प्राप्त केलेली आहे. या साधनेने फायदा असा होतो की, मंत्र देवता संपूर्ण आयुष्यभर आपल्या भक्ताला सांभाळते शिवाय मृत्यूनंतर स्वर्गात प्रवेश प्राप्त होतो.

इतरही अशा साधना असतात, की त्याने इहलोकी सुख प्राप्त होते, पण या साधना उपदेवता, अर्धदेवता यांच्या असतात. या दोन तीन महिन्यात सिद्ध होऊ शकतात, पण याने मृत्यूनंतर फार उच्चावस्था प्राप्त होत नाही.

याहीपेक्षा खालच्या दर्जाच्या साधनाही असतात. त्या दहा ते चाळीस दिवसांच्या असतात. या साधनेने जीन्स वश होतात. यानेही भौतिक सुख मिळते, परंतु मृत्यूनंतर पिशाच्चलोकात हजारो वर्षे खितपत पडावे लागते. म्हणून साधना करण्यापूर्वी आपण कुठली साधना करीत आहोत हे नीट माहीत असायला हवे.

◆ ◆ ◆

# १३. मंत्र शास्त्र

प्राचीन काळी भारतामध्ये असंख्य ऋषी रहात. हे ऋषी सतत निर्विकल्प समाधी अवस्थेत रहात. केव्हातरी वर्षातून एकदा ते जेव्हा समाधी अवस्थेतून उठत तेव्हा समाधी अवस्थेत जे ज्ञान होई ते ज्ञान ते लिहून ठेवीत किंवा आपल्या शिष्यांना सांगत व शिष्य लिहून घेत.

या दिव्य वातावरणात मंत्रशास्त्र, स्तोत्रे, प्रार्थना, उपनिषद व वेद लिहिले गेले. हे ऋषी प्रयोगशील होते. अक्षरातील स्पंदने किंवा सूक्ष्म लहरी ओळखून त्यावर आधारित ते मंत्र तयार करीत व त्यांचे मंत्र इतके प्रभावी असत की, मंत्रशक्तीने ते काहीही करू शकत असत.

त्या काळात ऋषी मंत्राने संतती निर्माण करीत. आपल्याला हव्या त्या वयाची, हव्या त्या सामर्थ्याने व गुणांनी युक्त असा मुलगा किंवा मुलगी, ऋषी एका क्षणात निर्माण करीत. यालाच मंत्रसंतती म्हणत.

याशिवाय काही ऋषी जलापासून, अग्निपासून, वायूपासून अशा विविध तत्त्वांपासून मंत्रसंतती निर्माण करू शकत.

या व्यतिरिक्त ते त्यांना हवी ती गोष्ट मंत्राने निर्माण करू शकत. अगदी विमानसुद्धा ते त्यांना हवे तसे मंत्राने निर्माण करीत. मंत्रशक्तीवर त्यांनी विजय प्राप्त केला होता.

त्यांना अशक्य नांवाचा शब्दच माहीत नव्हता. सूर्याच्या किरणांपासून, अग्निपासून, वायूपासून त्यांना हवी ती वस्तू ते निर्माण करीत असत. याला ते विज्ञान म्हणत. आध्यात्माचा व याचा काही संबंध नाही. हे आमचे पदार्थविज्ञान शास्त्र आहे, असे ते स्पष्ट म्हणत.

**देवता लहरी :** पूर्ण ब्रह्माण्डभर देवता लहरी पसरलेल्या असून, प्राचीन ऋषींनी समाधीद्वारा असंख्य देवता लहरींचा शोध लावून त्यांना नावे दिली, तसेच त्यांचे मंत्रही तयार केले.

देवता लहरींचा प्रांत स्वर्गापर्यंत आहे. तेथून खाली अप्सरा, यक्ष, गंधर्व, यक्षिणी यांचा प्रांत असून त्यांना उपदेवता म्हणतात. यांच्याही लहरी असतात. या लहरींचा प्रांत कनिष्ठ स्वर्गापर्यंत आहे.

याच्याखाली स्पंदनांचा प्रांत असून, सर्पाकृती स्पंदने प्रवाहित होत असतात. यांच्याही खाली स्थूल स्पंदनांचा प्रांत असून, या प्रांतात पिशाच्चे राहतात. हा प्रांत पृथ्वीला चिकटून आहे. तसाच तो पृथ्वीच्या पोटातही पसरलेला आहे.

अगदी सुरुवातीला ऋषींनी फक्त देवता लहरीपर्यंतच शोध लावला. खालच्या प्रांताकडे दुर्लक्ष केले, पण नंतर काळ बदलला

व ऋषी गुप्त झाले. नंतर मंत्र विद्येला स्वतंत्र महत्त्व देणाऱ्या उच्च कोटीच्या मंत्र महेश्वरांनी स्पंदन प्रांताचे मंत्र शोधून काढले व या विद्या चटकन साध्य होणाऱ्या असल्याने याचाच जास्त प्रसार झाला.

ज्याप्रमाणे आपण त्रिमिती विश्वात राहतो, त्याप्रमाणे इतर मितीही असून, त्यांचे वेगळे विश्व आहे. ज्याप्रमाणे त्रिमितीमध्ये मानव, प्राणी, पशु, जंगले, झाडे, वह्या, पुस्तके आहेत त्याप्रमाणे इतर मितीतही या साऱ्या गोष्टी असून, क्वचित एखाद्या भाग्यवान व्यक्तीला या इतर मितीतील लोक भेटतात किंवा त्या परलोक विश्वातील एखादी वस्तू मिळते.

एकदा एका व्यक्तीला रस्त्यात साधू भेटला. त्या व्यक्तीने त्यांना नमस्कार केला. त्या साधूने आपल्या झोळीतून एक अगदी छोटीशी पॅडसारखी दिसणारी व सहज खिशात मावेल अशी वही दिली व म्हणाला...

''वाहत्या पाण्याजवळ बसून यातील मंत्र तीन महिने वाच.'' त्याप्रमाणे त्याने केले. काहीच अनुभव आला नाही. म्हणून रागाने वहीतील पाने फाडली व वाहत्या पाण्यात टाकून दिली. पण दुसऱ्याच क्षणी **ती फाडलेली पाने परत जोडली गेली व वही तयार झाली व हवेतून उडत त्याच्याकडे आली.**

त्याने आणखी काही दिवस साधना केल्यावर त्याला खूप सिद्धी प्राप्त झाल्या व लोक त्याला 'मंत्रेश्वर' म्हणू लागले. सिद्धी

प्राप्त झाल्यानंतर एक दिवस ती वही अचानक अदृश्य झाली.

'प्रयोगशास्त्र' नांवाचे एक अत्यंत छोटे पुस्तक असून, ते फक्त हिमालयातील गुप्त आश्रमांमध्येच आहे. हे आश्रम संपूर्ण हिमालय फिरूनही दिसत नाहीत. हे आश्रम त्रिमितीच्या पलीकडील विश्वातील जरी असले तरी हे आश्रम म्हणजे हा परिसर एखाद्याला दिसावा असे त्या परिसरात राहणाऱ्या एखाद्या महासिद्धाला वाटताच तो सर्व परिसर दिसू लागतो. त्यांच्या इच्छेशिवाय तो परिसर कोणालाही दिसत नाही.

'सिद्धाश्रम' हे त्या परिसराचे नाव असले तरी तेथे बिल्डींग वगैरे काही नसून, अत्यंत निसर्गरम्य परिसर आहे. या परिसरासारखा निसर्ग पृथ्वीवर कोठेही नाही.

'सिद्धाश्रम' हा एकच गुप्त आश्रम नसून इतरही अनेक आश्रम आहेत व त्यांची नावेही वेगवेगळी आहेत.

अशा ठिकाणी हजारो वर्षांपासून तपस्या करणारे ऋषी राहतात. तसेच नवीन साधना करणारे साधकही राहतात. अशा आश्रमामध्ये पाण्यामध्ये न भिजणारे, अग्निमध्ये न जळणारे असे दिव्यग्रंथ आहेत. त्यात 'प्रयोगशास्त्र' नांवाचे एक छोटेसे पुस्तक असून, या पुस्तकात अनेक दिव्य मंत्र आहेत. हे मंत्र फक्त एक हजार वेळा म्हणताच खूप शक्ती प्राप्त होते. ज्या देवतेचा तो मंत्र असेल, ती देवता साकार होऊन दर्शन देते. परंतु एक हजार जप पूर्ण होण्यापूर्वी साधकाच्या अनेक परीक्षा घेतल्या जातात. एक

हजार जप व्हायला जेमतेम एक तास लागतो, पण एक तासात साधक सिद्ध होतो किंवा वेडा होतो किंवा भीतीने किंचाळून बेशुद्ध पडतो, इतक्या भयंकर परीक्षा घेतल्या जातात.

१९८८ मध्ये श्रीशैल्य येथे मी साधना करीत असता घडलेली एक घटना सांगतो. यावरून वाचकांना अदृश्य सृष्टीतील लोक कसे असतात याची कल्पना येईल.

तेथे एक वारूळ होते व आसपास थोडीफार झाडी होती. एका साधूने तेथे राहायचे ठरविले व तो तेथे राहू लागला.

पहिल्या रात्री त्याच्या स्वप्नात एक तेजस्वी देवता आली. तिने सर्वालंकार घातले होते. ती त्या साधूला म्हणाली,

'तू या जागी राहू नकोस त्यामुळे आम्हाला त्रास होतो. येथे राहण्याइतकी तुझी लायकी नाही.'

दुसऱ्या दिवशी त्या साधूने तेथून हलायला हवे होते, पण तो तेथून हलला नाही.

दुसऱ्या रात्री त्या देवतेने पुन्हा स्वप्नात येऊन तेथे राहू नये व राहिल्यास परिणाम वाईट होतील, असे सांगितले.

पण तो साधू तेथून हलला नाही.

तिसऱ्या दिवशी संध्याकाळी सात वाजता ती देवता तेथे आली. दोन वेळा स्वप्नात पाहिल्याने साधूने तिला ओळखले. ती खूप चिडलेली होती. तिने त्याला सांगितले, आत्ताच्या आता येथून निघून जा!

वस्तुत: याच वेळी त्या साधूने तिला नमस्कार करून क्षमा मागायला हवी होती, म्हणजे आशीर्वाद प्राप्त झाला असता. पण तसे न करता तो अहंकाराने तेथेच राहिला.

रात्री त्याच्या अंगाला विशिष्ट प्रकारच्या मुंग्या चावल्या. सकाळपर्यंत त्याच्या सर्वांगाला फोड येऊन त्यातून लस बाहेर पडू लागली व मग नाईलाजाने त्याला तेथून उठावेच लागले.

तेथून तो उठला. हॉस्पिटलला गेला व तीन महिने औषधोपचार करून ठीक झाला. पर्वतातून ठिकठिकाणी वारुळे असतात. श्रीशैल्य पर्वतात तर खूपच वारुळे आहेत. जवळजवळ दर शंभर फुटाला एक दोन वारुळे दिसून येतात. काही काही वारुळे तर वीस वीस फूट उंच असतात. जेथे आदल्या दिवशी काहीही नसते तेथे एका रात्रीत वीस वीस फूट उंचीची वारुळे तयार होतात.

याविषयी मी बऱ्याच लोकांना विचारले तर ते म्हणतात, की मुंग्या एका रात्रीत वीस फूट उंचीची वारुळे तयार करतात. पण खरे काय ते देवालाच ठाऊक !

◆ ◆ ◆

# १४. प्रेम-शांती-आनंद

## प्रेम

प्रेम या शब्दाचा गैरवापर गेल्या शंभर वर्षात जितका झाला असेल तेवढा पूर्वी कधीही झाला नसेल. खूप गैरवापर झालेला शब्द म्हणून त्याची नोंद जागतिक इतिहासात व्हायला हवी.

**प्रेम** हे ईश्वराचे एक रूप असून, हे प्रेम जेव्हा हृदयात उत्पन्न होते, तेव्हा सर्व प्रकारचे भेद-भाव नष्ट होतात. अशा मानवाचे अस्तित्व अगदी नाममात्र उरते व तेही केवळ जगावर उपकार करण्यापुरते. प्रेमाची ज्योत ज्याच्या हृदयात प्रकाशमान झाली आहे, असा मनुष्य संपूर्ण विश्वावर प्रेम करतो. आपला व परका असा भाव त्याच्या मनात रहात नाही. त्याला सर्व आपलेच वाटतात, परके कोणी वाटत नाही, सर्वांचे हित कसे होईल, सर्वांच्या हृदयात ईश्वरी प्रेम कसे निर्माण होईल, सर्वांमध्ये सद्गुण कसे निर्माण होतील यावर तो चिंतन करतो व विश्वातील सर्व मानवांच्या उत्कर्षासाठी प्रार्थना करतो.

तो कोणाच्या देहावर प्रेम करीत नाही, तर प्रत्येकाच्या आत्म्यावर प्रेम करतो व त्या आत्म्याचा विकास कसा होईल

याचा विचार करतो. विश्वावरील त्याचे प्रेम शांत व गंभीर असते. ते बाहेरून दिसत नाही व कळतही नाही. या प्रेमात स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, शत्रू-मित्र असे कुठलेही भेदभाव नसतात. इतकेच काय, तो जेवढे प्रेम मनुष्यावर करतो तितकेच प्रेम तो पशु-पक्षी, प्राणी, वनस्पती, झाडे, वृक्ष या सर्वांवर करतो. करुणा ही प्रेमाची परिपक्व अवस्था आहे किंवा पुढची पायरी आहे. प्रेम मुरले की, त्याचे रुपांतर करुणेत होते.

करुणामयी मनुष्य हा महामानव असतो.

प्रेम, दया, करुणा या एकापेक्षा एक चढत्या अवस्था आहेत. करुणारसाने ओतप्रोत आत्मा परमात्म्याशी एकरूप होतो.

## शांती

जन्मोजन्मी केलेल्या पापकर्मामुळे मन अशांत होते व अशांत मनुष्य कधीही सुखी होऊ शकत नाही. मनुष्य शांतीसाठी अनेक उपाय करतो. पण मन मुळात अशांत का झाले, याचा विचार करीत नाही.

पूर्वजन्मातील कुकर्मामुळे मन अशांत होते व अशांत मनामध्ये इतर अनेक विकार उदा-द्वेष, मत्सर, तिरस्कार, दीर्घद्वेष इत्यादी उत्पन्न होतात.

यासाठी शांतीच्या प्राप्तीचा प्रयत्न करीत असतानाच प्रारब्ध म्हणजे पूर्वकर्माच्या शुद्धीसाठी परोपकार व दान करीत राहायला

हवे. परोपकार व दान करीत राहायचे व शांतीसाठी प्रयत्न करायचा. अशा दोन्ही गोष्टी एकाच वेळी केल्या तर शांतीचा लाभ होऊ शकतो.

अर्थात पूर्ण शांती लाभणे कठीण असते, कारण पूर्ण शांती किंवा पराशांतीचा लाभ झाला की, परमेश्वर दर्शन होते, म्हणून पराशांती लाभणे कठीण असते. अनेक जन्मांच्या तपस्येनंतर पराशांती व परमेश्वराशी तादात्म्यता प्राप्त होते.

## आनंद

परमेश्वराशी तादात्म्यता प्राप्त झाल्यावर उरतो तो केवळ आनंद याला **परमानंद** म्हणतात. याची तुलना कशाशीही करता येत नाही. येथे आत्मा परमात्म्याशी एकरुप होतो. या परमानंदाच्या प्राप्तीसाठी **जीव** जन्मोजन्मी तडफडत असतो व सुखाच्या प्राप्तीसाठी  तो हजारो उपाय करतो.

हे केल्याने मला आनंद मिळेल..! ते केल्याने आनंद मिळेल..! असे जोपर्यंत मनाला वाटत राहते, तोपर्यंत, ती वस्तू प्राप्त झाल्याशिवाय मन स्वस्थ बसत नाही व जेव्हा ती वस्तू प्राप्त होते, तेव्हा कळते, की यात आनंद नाही व मग पुन्हा मन आनंदाचा शोध घेऊ लागते. एखाद्या गरिबाला वाटते, की मी श्रीमंत झाल्यावर किंवा पैसा मिळाल्यावर मला खूप आनंद होईल, पण जेव्हा पैसा मिळतो व पैसा मिळाल्यावर काही काळ गेला की, त्याच्या लक्षात येते, की हा खरा आनंद नव्हे. पुनश्च

खऱ्या आनंदाचा शोध सुरू होतो. भौतिक वस्तूतील सर्व मिळाले तरी मन अतृप्तच राहते. हे अतृप्त मन आनंदाचा शोध घेतच राहते व दररोज नवनवीन 'आनंदसाधन' ते शोधत राहते. एखाद्या फुलपाखराप्रमाणे ते सारखे उडतच राहते. अशी अनेक वर्षे जातात. अनेक जन्म त्यात जातात. अनेक योनीत जीव आनंदाच्या शोधात फिरत राहतो.

शेवटी एक वेळ अशी येते, की त्याच्या लक्षात येते, आनंद बाहेर कुठेही नाही, त्याला आपल्या हृदयातच शोधायला हवे. हे कळल्यावर तो त्या दृष्टीने प्रयत्न करतो.

तेव्हा त्याच्या लक्षात येते, की परोपकार, दान, मानवता, प्रेम, इतरांना सहकार्य करणे, कुणाचे मन न दुखवणे अशा अनेक सद्गुणांचा आश्रय केल्यानंतर व हे सर्व करून जर ध्यान केले तरच आनंद प्राप्त होईल. जर या गोष्टी न करता उगाच ध्यान करीत बसले तरी आनंद प्राप्त होत नाही, कारण परोपकार, दान, कृतज्ञताबुद्धी, नम्रता, इतरांना मदत करणे व प्रेमाने वागणे या गोष्टी केल्यानेच जन्मोजन्मीचे पाप फिटते व जन्मोजन्मीचे पाप फिटल्यावर शांती व आनंदाची प्राप्ती होते व मगच खरे ध्यान लागते.

इतक्या गोष्टी लक्षात येतात व जीव त्याप्रमाणे वागतो. त्याला परमानंद प्राप्त होतो...

**परमानंद म्हणजे परमात्म्याशी एकरूपता!**

◆ ◆ ◆

# १५. आत्मा

आत्म्याविषयी शब्दामध्ये व्यवस्थित माहिती देणे अत्यंत कठीण आहे.''ज्याप्रमाणे तुम्ही मिठाई खाऊ शकता, पण मिठाईच्या गोडीचे वर्णन अचूक शब्दात करता येत नाही. त्याचप्रमाणे आत्म्याचा अनुभव घेता येतो, पण त्याचे वर्णन शब्दात करता येणे कठीण आहे.'' तरीपण जितक्या सोप्या भाषेत सांगता येईल तेवढे प्रयत्न करतो.

जगातील प्रत्येकाला हे आता चांगले ठाऊक आहे, की ''शरीर हे आत्म्याचे वाहन आहे.'' वृद्धावस्थेमुळे, रोगामुळे किंवा अपघाताने शरीर मृत्यू पावते, परंतु शरीरात राहणारा आत्मा हा पुन्हा दुसरे शरीर मिळेपर्यंत परलोकात भटकत राहतो किंवा मुक्तीला जातो.

समजा, एखाद्या संताचे (जो परमेश्वराशी एकरूप झालेला आहे) देहावसान झाले तर त्याच्या देहातून सुईच्या टोकाएवढा सूक्ष्म तेजोबिंदू बाहेर पडतो व दशम लोकाच्याही पलीकडे निघून जातो. यालाच 'आत्मा' असे म्हटले जाते.

आता आपण आवरणांकीत आत्म्यांची माहिती घेऊ!

ज्याचे अंत:करण पवित्र आहे, परमेश्वराच्या भक्तीने भरलेले आहे, प्रेम, दया, करुणा, शांती, मानवता, परोपकार इत्यादी सद्‌गुणांनी जो मंडित आहे, अशा व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर मोहरीच्या आकाराचा एक तेजोबिंदू बाहेर पडतो व दशम लोकात जाऊन राहतो.

ज्यांनी पृथ्वीलोकात कठोर साधना, तपस्या केलेली असते, साधना, तपस्या करताना ज्यांनी एखाद्या योद्ध्याप्रमाणे कठोर निश्चयाने आपल्या साधना पूर्ण केल्या आहेत व मानवतेच्या रक्षणासाठी ज्यांनी आपल्या शक्तीचा वापर केला आहे, असे लोक मृत झाल्यावर त्यांच्या देहातून आंगठ्याच्या पेराएवढ्या आकाराचा आत्मा बाहेर पडतो व नवम लोकात जाऊन राहतो.

नवम लोक हा देवता लोक असून, हिंदू व इतर अनेक धर्मांच्या पुराणात वर्णन केलेल्या देवतांचा हा लोक आहे. याला ‘शक्तीलोक’ असेही म्हणतात. तेथून सर्व ब्रह्मांडाला शक्ती पुरविली जाते. दशम लोक किंवा त्या पलीकडे जाणारे आत्मे त्यांच्या इच्छेला येईल तशा रूपात राहतात. काही सोळा वर्षांच्या रूपात राहतात, तर काही नऊ दहा वर्षांच्या रूपात राहतात. म्हणून हिंदू देवता सदैव तरुण दाखविलेल्या असतात.

वर वर्णन केलेल्या आत्म्यांपेक्षा थोडा कमी दर्जा असलेले परंतु अत्यंत पुण्यवान, विपुल दान-धर्म केलेले श्रद्धावान असे

लोक आठ व सातव्या लोकात राहतात. हे आत्मे पंचवीस ते पस्तीस वयाचे दिसून येतात.

सातव्या लोकात एका विश्वाची हद्द संपते व दुसऱ्या विश्वाची हद्द सुरू होते. म्हणून सर्व ग्रंथांमध्ये फक्त सप्तलोकांचीच वर्णने आहेत, परंतु त्यापलीकडेही खूपखूप विश्वे आहेत.

मी माझ्या 'आत्मसिद्धी' (Pathway to self Realization) या पुस्तकात परलोकाची वर्णने दिली आहेत. येथे फक्त आत्मा या विषयावर लिहीत आहे. त्यामुळे या वर्णनांना परलोकविश्वाचे वर्णन समजू नये.

पृथ्वीलोकात राहतांना ज्यांनी विपुल दान व परोपकार केलेला आहे, ईश्वरभक्ती केलेली आहे, असे लोक जेव्हा मृत होतात, तेव्हा त्यांच्या देहातून एक ज्योति बाहेर पडते व ती सात किंवा आठव्या लोकात जाते.

पृथ्वीतलावरील अत्यंत सज्जन, चांगल्या विचारांचे लोक व त्यागी, परोपकारी व्यक्ती पाचव्या किंवा सहाव्या लोकात जातात. असे लोक जेव्हा मृत होतात तेव्हा त्यांच्या देहातून त्यांचा सूक्ष्मदेह बाहेर पडतो. त्यांचा हा सूक्ष्मदेह त्यांच्या शुद्ध आचार-विचारांमुळे पारदर्शक व हलका असतो. त्या सूक्ष्मदेहातील रंग व आतील ज्योति व ज्योतिच्या आतलेही थोडेफार दिसू शकते.

असा हा सूक्ष्मदेह पाचव्या सहाव्या लोकात निघून जातो.

पाचव्या व सहाव्या लोकाला 'कनिष्ठ स्वर्ग' असे म्हटले जाते. तर सातव्या लोकाला 'उच्चस्वर्ग' म्हटले जाते. हिंदू धर्मात सातव्या लोकाला 'सत्य लोक' किंवा ब्रह्मलोक म्हटले आहे. सातव्या लोकाचा अधिपती हा सातही लोकांचा अधिपती असतो. याशिवाय एक ते सहापर्यंत प्रत्येक लोकाचा अधिपती असतोच. हिंदू धर्मात सर्वांची नावे दिलेली आहेत, पण येथे त्याचा उल्लेख टाळत आहे. कारण कदाचित प्रत्येक धर्मामध्ये वेगवेगळी नावे असण्याची शक्यता आहे.

पाचव्या लोकात म्हणजे कनिष्ठ स्वर्गात प्रवेश होण्यापूर्वी व जेथे चौथ्या लोकाची सीमा संपते, तेथे दोन्ही लोकांच्यामध्ये एक नदी असून या नदीला **वैतरणा** असे म्हणतात.

तीन प्रकारांनी आत्मे या नदीला ओलांडतात.

१) जे आत्मे चांगलेच पुण्यवान असतात ते आकाशातून (हवेतून) उडत पलीकडे जातात.

२) ज्या लोकांची पुण्याई थोडी कमी आहे, असे लोक काही काळ चौथ्या लोकाच्या अंतिम प्रांतात राहून योग्य वेळ आली, की त्यांना ती नदी ओलांडण्याची आज्ञा मिळते. आज्ञा मिळाल्यावर तो आत्मा त्या नदीत स्नान करतो तेव्हा तेथे एक गाय येते. त्या गाईच्या शेपटीला धरून तो आत्मा वैतरणा नदी पार करून स्वर्गात प्रवेश करतो.

३) भूतलावर काही लोकांनी गुरुची किंवा एखाद्या संताची, सिद्धपुरुषाची सेवा करून आशीर्वाद प्राप्त केलेले असतात, असा आत्मा जेव्हा वैतरणेच्या किनारी जातो, तेव्हा त्या नदीतून गुरुचा हात वर येतो. त्या हाताला धरून हा आत्मा नदी पार करतो.

वरील तीन पद्धतींनी वैतरणा पार करून आत्मे पाचव्या लोकात प्रवेश करतात. पाचव्या लोकातील म्हणजे कनिष्ठ स्वर्गातील आत्मे साधारणपणे पस्तीस ते चाळीस वयाचे दिसतात. यांचे सूक्ष्मदेह खूपच तेजस्वी असतात. पारदर्शक असतात.

माझ्या परिचित एका स्त्रिचे वडील वारले. ही स्त्री अशिक्षित होती. हिला आध्यात्माची आवड वगैरे काही नव्हती. अगदी सामान्य स्त्री होती. त्यामुळे तिला जे स्वप्नात दिसले ते कुणाचे तरी ऐकण्याने किंवा वाचल्याने दिसले असे म्हणता येणार नाही.

स्वप्नात तिने पाहिले, तिचे वडील वैतरणा नदीत स्नान करीत होते. तिने वडिलांना हाक मारली, तेव्हा वडिलांनी तिच्याकडे पाहिले व तेथेच थांब, पुढे येऊ नको व बोलू नको असे खुणेने सांगितले.

वैतरणा नदीत स्नान करताच त्यांना दिव्यरूप प्राप्त झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय सत्तर होते. वैतरणेत स्नान करताच ते पस्तीस ते चाळीस वयाच्या प्रौढ व्यक्तीसारखे दिसू लागले. इतक्यात त्या पाण्यातून एक गाय बाहेर आली. तिच्या शेपटीला

धरून ते पैलतीरावर म्हणजे पाचव्या लोकात निघून गेले.

हे स्वप्न जेव्हा तिने मला सांगितले तेव्हा तिला त्या स्वप्नाचा अर्थ ठाऊक नव्हता, तो तिला मी समजावून सांगितला, म्हणून हिंदू धर्मात गाईला अति पवित्र मानलेले आहे. गाईमध्ये वातावरणातील अपवित्र स्पंदने नष्ट करण्याचे तसेच, वातावरणामध्ये प्रसन्नता निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. गायत्री मंत्रजपाने जे सामर्थ्य प्राप्त होते ते सामर्थ्य गाईच्या सेवेने प्राप्त होते. असे हिंदू पुराणात म्हटलेले आहे. म्हणून हिंदू लोक गाय पाळतात व तिला स्पर्श करून नमस्कार करतात.

या वैतरणा नदीचे वैशिष्ट्य असे आहे, की या नदीच्या किनाऱ्यापर्यंत पोहोचणेच अवघड आहे, तरीही या नदीच्या किनारी करोडो आत्मे भटकत असतात. पुरेशी पुण्याई नसल्याने त्यांना स्वर्गात प्रवेश प्राप्त होत नाही. हे आत्मे सज्जन असल्याने पृथ्वीतलावरील वातावरणाची त्यांना कल्पना असल्याने ते पृथ्वीतलावरही जन्म घेऊ इच्छित नाहीत.

माझ्या मित्राच्या पत्नीला एक स्वप्न पडले. स्वप्नात ती वैतरणा नदीच्या किनारी गेली. तेथे एक वृद्ध, पांढरी दाढी, पांढरे केस असणारा साधू दिसला.

तो साधू त्या स्त्रीला म्हणाला...

''एक हजार वर्षांहून अधिक काळ गेला. या वैतरणा नदीच्या

किनारी फिरून फिरून अगदी कंटाळून गेलो आहे. तुझा आत्मा चांगला आहे. मी जर तुझ्या पोटी जन्म घेतला तर नक्कीच मला स्वर्गात प्रवेश मिळेल. पण तू एक कर! तू स्वत: ईश्वर नामस्मरण व दान-धर्म कर! तसेच उच्चकोटीच्या योग्यांच्या व संतांच्या सहवासात राहा! तसेच माझ्या जन्मानंतर माझ्या हातून दान-धर्म कर! व मलाही सिद्धांच्या सहवासात ठेव!''

या स्वप्नानंतर एक वर्षाने तिला अतिशय सुरेख मुलगा झाला. मुलगा अतिशय हुषार व सुस्वभावी असून, सध्या चोवीस-पंचवीस वर्षांचा आहे. हे स्वप्न जेव्हा तिने मला सांगितले तेव्हा तिचा मुलगा आठ वर्षांचा होता व या स्त्रीलाही चौथा लोक, स्वर्ग किंवा वैतरणा नदी या विषयांची काहीही माहिती नव्हती.

आत्तापर्यंत आपण जी काही माहिती घेतली त्यावरून पुढील गोष्टी लक्षात येतात.

१) आत्म्याचे खरे स्वरूप पीन पॉईंट इतके सूक्ष्म आहे व तेच आपले खरे स्वरूप.

२) कर्मानुसार आत्म्यावर आवरणे पडत जातात.

पहिले आवरण मोहरीएवढे तर दुसरे अर्ध्या आंगठ्याच्या आकाराइतके, म्हणजे अंदाजे एक इंच. नंतर आत्म्याचे तिसरे आवरण ज्योतिसारखे साधारण दोन इंच आकाराचे असते. नंतर आपण पाहिले की, चौथे आवरण म्हणजे आपला सूक्ष्मदेह.

अर्थात हा तेजस्वी असतो व सर्वसाधारण मानवाच्या आकाराएवढा असतो. यास पापाचा लेश जराही नसल्याने तो पाचव्या किंवा सहाव्या लोकात जातो.

येथपर्यंत आपण आत्मा व त्यावरील आवरणे यांची माहिती घेतली. आता आपण चौथ्या लोकापर्यंत आलो आहोत.

चौथा लोक हा बरोबर मध्ये असून, याच्यावर स्वर्गाची सुरुवात म्हणजे उर्ध्वलोक, तर खाली अधोलोक आहेत. म्हणून याला मधला लोक म्हणतात. उर्ध्वलोक (Upper World) म्हणजे स्वर्ग तर अधोलोक (Down World) म्हणजे नरक.

या चौथ्या लोकामध्ये एकूण चार भाग असून, एकदम सुरुवातीच्या भागात भांडखोर व वाईट प्रवृत्तीचे लोक राहतात. तर शेवटच्या म्हणजे वैतरणेच्या जवळपास शांत प्रवृत्तीचे सज्जन राहतात. हिंदूधर्मात या लोकाला **पितृलोक** असे म्हणतात. पृथ्वीतलावरील जे लोक फक्त स्वत:पुरतेच जगतात व जे लोक कुटुंबापुरतेच जगतात, जे फारसा दान-धर्म करीत नाहीत, स्वार्थापुरते देव देव करतात असे सर्व लोक येथे येऊन राहतात.

येथे आत्म्याचे वय हे पृथ्वीतलावरील वयाइतके असते, म्हणजे तो जर सत्तराव्या वर्षी पृथ्वीतलावर मृत्यू पावला तर चौथ्या लोकात त्याच्या सूक्ष्मदेहाचे रूप सत्तर वर्षांइतकेच असते.

अशा प्रकारे कर्मानुसार आत्म्यावर आवरणे निर्माण होतात.

शेवटी सूक्ष्मदेहाचे आवरण तयार होते.

आता ज्या प्रमाणात मनुष्य स्वार्थ, द्वेष, मत्सर, कंजूषपणा, क्रोध व कपट करू लागतो, त्या प्रमाणात त्याच्या सूक्ष्मदेहावर काळ्या रंगाच्या काजळीचे थर जमू लागतात. हे थर जितके दाट होतील, तितका आत्मा खाली खाली जात राहतो. वर ज्या प्रवृत्ती लिहिल्या आहेत, त्या प्रवृत्तींनी मनुष्य मेल्यावर तिसऱ्या लोकात म्हणजे पिशाच्च लोकात जातो व याहून दुष्कर्मे करणारे दुसऱ्या व पहिल्या लोकात जातात. हे लोक पृथ्वीच्याही पोटात आहेत.

◆ ◆ ◆

# १६. आत्म्याची अधोगती

आत्म्याची अधोगती कशी होत जाते हे आपण थोडक्यात पाहिले. आता अशा अधोगतीस गेलेल्या आत्म्यांचे काय होते इकडे एक दृष्टिक्षेप टाकू.

एखादा पापी मनुष्य जेव्हा मरतो तेव्हा मरण्यापूर्वीच त्याच्या शिक्षेचा देह अधोलोकात त्याच्याच कर्माने तयार झालेला असतो. मृत्यूनंतर ते रूप त्याला प्राप्त होते. कुणाला कावळ्याचे, कुणाला कुत्र्याचे, तर कुणाला बेडकाचे अशी विविध रूपे कर्मानुसार आपोआप प्राप्त होतात.

एकदा एक स्त्री माझ्याकडे आली. पाच हजार रुपये देत ती म्हणाली..

''माझे एक नातेवाईक नुकतेच मृत झाले, त्यांच्या नांवाने मी हे पैसे दान करीत आहे.''

तिने इतके बोलताच मला कळले की, तो आत्मा अधोगतीला गेलेला असून, त्याला 'काक योनी' प्राप्त झाली आहे व आता किमान दीड हजार वर्षे तरी पुन्हा मनुष्य जन्म प्राप्त होणार नाही.

तिच्या पैशाला मी हातही लावला नाही. अर्थात तिला मी

त्याचे कारण सांगितले नाही.

व्यक्तीच्या कर्मानुसार त्याच्यासाठी विशिष्ट प्रकारचा सूक्ष्मदेह तयार होत असतो. समजा, एखाद्या व्यक्तीला पुढील जन्म कुत्र्याचा मिळणार आहे, तर ती मृत होताच तिच्या आत्म्याला कुत्र्याचे रूप प्राप्त होते. हा कुत्रा परलोकात म्हणजे तिसऱ्या लोकात भटकत राहतो व योग्य वेळी एखाद्या गाभण कुत्रीच्या देहात प्रवेश करतो.

या तिसऱ्या लोकांमध्ये कावळे, कुत्रे, उंदीर वगैरे जे प्राणी आहेत. त्यांचे दोन प्रकार आहेत.

**१) नैसर्गिक प्राणी**

**२) अनैसर्गिक प्राणी**

१) नैसर्गिक प्राणी म्हणजे आपण जे प्राणी पाहतो त्यांचे **सूक्ष्मदेह**.

२) अनैसर्गिक प्राणी म्हणजे जे पूर्वी मनुष्य होते परंतु त्यांच्या वाईट कर्मांमुळे आता त्यांना प्राण्याचा सूक्ष्मदेह प्राप्त झाला आहे असे!

असे जे अनैसर्गिक प्राणी असतात (कावळा, कुत्रा इत्यादी) ते आकाराने खूपच मोठे असतात. या मोठ्या आकारामुळे त्यांना खूपच यातना होत असतात. परंतु जेव्हा ते जन्म घेतात तेव्हा त्यांचा आकार नैसर्गिक होतो.

उदा : एखादा जीव काकयोनीत गेला असेल तर मृत्यूपूर्वी त्याचे रूप जवळजवळ दोन फुटांचा कावळा असे असते. एवढा प्रचंड सूक्ष्मदेह जेव्हा अंड्यात प्रवेश करतो, तेव्हा यातनाच यातना होतात. पुन्हा पिल्लाच्या रूपाने बाहेर आल्यावरही यातना होतात.

तिसऱ्या लोकामध्ये अशा प्रकारे कोट्यावधी प्राणी असून, हे जन्माची वाट पहात आहेत. येथील उंदीर एक फूट उंचीचा व मजबूत असतो. त्याचप्रमाणे कुत्रेही पृथ्वीतलावरील गाढवाहून उंच व भरगच्च असतात. हे सर्व या योनीत येण्यापूर्वी मनुष्य होते, पण पापकर्मामुळे त्यांना ही योनी (सूक्ष्मदेह) प्राप्त झालेली असते.

वृक्षांमध्ये राहणारे आत्मे दोन प्रकारचे असतात.

१) काही आत्मे वृक्षांवर निवास करून राहतात. त्या झाडांना पाणी दिले तर त्यांना शांती मिळते. पण त्या झाडाखालून एखादी बाहेरची स्त्री गेली तर त्यांना त्रास होतो. यासाठी वड, पिंपळ, औदुंबर, चिंच, बाभूळ अशा वृक्षांजवळ बाहेरच्या स्त्रियांनी जाऊ नये असे म्हटले जाते.

२) दुसरा प्रकार असा की, तो आत्मा वृक्ष रूपाने जन्माला येतो. असा वृक्षरूपाने जन्माला आलेला आत्मा जेव्हा बोलतो तेव्हा मी अमूक वृक्ष आहे, असे बोलतो.

रूईच्या झाडामध्ये दोन प्रकार असतात.

एक श्वेतमंदार व दुसरा कृष्णमंदार या दोन्ही झाडांमध्ये

वेगवेगळी शक्ती असते.

**१) श्वेतमंदार :** हा एकवीस वर्षांचा झाल्यावर त्याच्या मुळांचा आकार गणपतीसदृश्य तयार होतो. हा गणपती उजव्या सोंडेचा असतो व यामध्ये खूपच शक्ती असतात.

**२) कृष्णमंदार :** या वृक्षात वाईट शक्ती असतात. या झाडाखाली लघवी केली असता पिशाच्च बाधा होते.

ज्या झाडावरती मधाचे काळ्या रंगाचे मोठे पोळे लागते, त्या झाडाच्या बुंध्यापासून शेंड्यापर्यंत खूप पिशाच्च शक्ती असतात. या पोळ्यांचा मध काढू नये व खाऊही नये.

योग्याला साधना करताना या सर्व लोकांमधून, योनीतून सूक्ष्मदेहाने प्रवास करावा लागतो व तेथील दु:ख व यातनांचा अनुभव घ्यावा लागतो.

ऋण, हत्या, वैर या तीन कारणांनी जीवाला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात. अनेक योनीतून फिरावे लागते.

आजकाल पृथ्वीतलावर मनुष्य योनीमध्ये प्राणी सृष्टीतील असंख्य प्राणी जन्माला आलेले असून, या तथाकथित मानवांनी मानवी गुण म्हणजे दया, प्रेम, परोपकार इत्यादी शिकावेत. अशी परमेश्वराची इच्छा आहे.

कारण आहार, निद्रा, भय व मैथुन या चार गोष्टी प्राणी, पशु सारे करीत असतात.

**आहार :** आहारासाठी प्रत्येक पशू वणवण फिरत असतो. तसेच पोटासाठी मनुष्य हजार उद्योग करतो व चांगली-वाईट कर्मे करतो.

यामुळे ईश्वराच्या दृष्टीने कोट्याधीश व पशु यात काहीही फरक नाही.

**निद्रा :** प्रत्येक मनुष्य झोपतो व प्राणी, तसेच पशूही झोपतात. परमेश्वराच्या दृष्टीने येथेही फरक नाही.

**भय :** प्रत्येक मनुष्यात भय आहे व प्रत्येक प्राणी, पशुतही भीती आहे. प्राण रक्षणासाठी ते सदैव जागरूक असतात. ईश्वराच्या दृष्टीने येथेही फरक नाही.

**मैथुन :** मनुष्य व प्राणी संतान उत्पन्न करतात. आपली मुले पाहून मानवाला आनंद होतो. वानरी सतत आपल्या पिल्लांना पोटाशी घेऊन फिरते व डुकरिणीच्या मागून तिची पिलावळ चालत असते.

येथपर्यंत मनुष्य व प्राणी यात ईश्वराच्या दृष्टीने काहीही फरक नाही!

**मग**

मनुष्य व प्राणी यात फरक केव्हा व कसा होईल ?

याचे उत्तर असं आहे की....

कुठलाही प्राणी दान व परोपकार करू शकत नाही. त्या

योनीत दान व परोपकार करण्याची सोय नाही. परंतु मनुष्य मात्र हे करू शकतो. म्हणून जेव्हा मनुष्य दान व परोपकार करू लागतो व तो त्याचा स्वभाव बनतो, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने मनुष्य बनतो.

जोपर्यंत परोपकार व दान हा तुमचा स्वभाव होत नाही, तोपर्यंत प्राणी व तुमच्यामध्ये फरक नाही. म्हणून परोपकाराची एकही संधी सोडू नका.

दुसरी गोष्ट म्हणजे...

प्राणी ईश्वर चिंतन करू शकत नाहीत. फक्त मनुष्यच ईश्वर चिंतन करू शकतो, म्हणून ईश्वर चिंतन दररोज करण्याची सवय लावली पाहिजे.

एका महान सिद्धपुरुषाची कथा सांगतो...

इंग्रजांच्या काळामध्ये एकदा एका शहरामध्ये खूप गर्दी होती. कोणीतरी मोठी व्यक्ती येणार असल्याने हजारो लोक त्यांना पाहायला जमा झालेले होते. पोलीस बंदोबस्तही होता.

तेथे हे सिद्धपुरुष नग्नावस्थेत गेले. ती मोठी व्यक्ती आपल्या पत्नीसह गाडीतून हळूहळू मिरवणुकीने जात होती. इतक्यात एका पोलीस इन्स्पेक्टरचे लक्ष या नंग्या साधूकडे गेले. त्याने त्या साधूला म्हटले, 'महाराज! तुम्हाला अशा अवस्थेत एवढ्या गर्दीत यायला लाज नाही वाटत? साहेबांचे लक्ष गेले तर आमची नोकरी जाईल.'

तेव्हा त्या सिद्धपुरुषाने शांतपणे त्याच्याकडे पाहिले व विचारले, ''कोण नग्न आहे ? बघ!'' असे म्हणताच त्या पोलीस अधिकाऱ्याला पूर्ण गर्दी, समाज प्राणीरूप दिसू लागला, कुत्रे, गाय, म्हैस, बैल, डुक्कर, गाढव असा प्राण्यांचा मोठा समूह हळूहळू पुढे सरकत होते. ती मोठी असामी व त्यांची पत्नी हेही पशुरूपात होते. यामध्ये माणसे फारच कमी होती. जेमतेम शंभर, दोनशे माणसे होती. त्यातला हा पोलीस अधिकारीही मनुष्य होता.

थोड्या वेळाने पोलीस इन्स्पेक्टरची तंद्री उतरली, तेव्हा त्या सिद्धपुरुषाने विचारले! ''कळले! या प्राण्यांसमोर मी कशाला लाजू?''

या सत्यकथेमध्ये पृथ्वीतलावरील सर्व समस्यांची उत्तरे आहेत व भगवान् बुद्ध, प्रभू येशूख्रिस्त यांनी जो मानवाला प्रेम व शांतीचा संदेश दिला आहे, त्याचे महत्त्व लक्षात येते.

मनुष्य देह हे एकच असे वाहन आहे, की हे वाहन प्राप्त झाल्यानंतर जीवात्मा परमेश्वरापर्यंत पोहोचू शकतो. याला कोणी '**परमेश्वर तादात्म्यता**' म्हणतात. कोणी '**मुक्ती**' म्हणतात.

या वाहनांचा दुरुपयोग करू नये. दुरुपयोग केल्यास प्रचंड शिक्षा भोगावी लागते व मनुष्य देह किमान हजारो वर्षे प्राप्त होत नाही. याविषयी अनेक सत्यकथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यापैकी पंजाब मधील एक कथा 'कल्याण' मासिकामध्ये प्रसिद्ध झालेली

आहे, ती पुढीलप्रमाणे...

सुमारे बाराशे वर्षांपूर्वी इराणचा बादशहा नादिरशहाने हिंदूस्थानवर आक्रमण केले. या सैन्याबरोबर सुलेमान नांवाचा एक मनुष्य होता. हिंदुस्थानला लुटून सारे निघून गेले. सुलेमान हिंदुस्थानात राहिला. येथे त्याने एका स्त्रीशी लग्न केले. त्याला त्या बायकोपासून दोन मुलगे व दोन मुली झाल्या.

त्यातील एका मुलीचे एका हिंदू मुलावर प्रेम होते. त्याला मारण्यासाठी सुलेमानने खूप प्रयत्न केले, पण यश आले नाही. सूडाच्या भावनेत त्याला मरण आले.

सुलेमानच्या लायकीप्रमाणे त्याला अकराशे पन्नास वर्षे नरकवासाची शिक्षा झाली. ही शिक्षा ठोठावताना त्याला असे सांगण्यात आले, की तू ज्या व्यक्तीचा सूड घेऊ इच्छित आहेस, तीच व्यक्ती अकराशे पन्नास वर्षांनंतर तुला या पिशाच्च योनीतून मुक्त करेल व पुन्हा मनुष्य जन्म देण्यास कारण ठरेल.

त्याप्रमाणे अकराशे पन्नास वर्षे भयंकर यातना भोगण्यात गेली. या सर्व कालामध्ये हळूहळू भूतकाळाचा विसर पडला. अकराशे पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानंतर कानात आवाज ऐकू आला. प्रेतयोनीतून मुक्त होण्याची वेळ आलेली आहे.

दुसऱ्या दिवशी सुलेमान त्याच्या कबरीजवळ खेचला गेला. अर्थात अकराशे पन्नास वर्षांपूर्वीची कबर तेथे नव्हती. तेथे आता मोठा हमरस्ता बनलेला होता. पण एका विशिष्ट शक्तीच्या प्रभावाने

सुलेमान त्या रस्त्याच्या त्या विशिष्ट ठिकाणी जेथे पूर्वी त्याची कबर होती तेथे चिकटून राहिला.

इतक्यात मनमोहनसिंग नांवाचा मुलगा जेथे सुलेमान चिकटला गेला त्या ठिकाणी येऊन लघवी करू लागला. त्या मुलाची लघवी या सुलेमान पिशाच्चाच्या अंगावर पडताच त्याच्या अंगाची आग आग झाली. एका सेकंदात त्याने त्याला झपाटले व अनेक प्रकारे त्या मुलाचा छळ सुरू केला. याच वेळी या सुलेमानला आपोआप कळले, की सुमारे बाराशे वर्षांपूर्वी याचाच आपण सूड घेऊ इच्छित होतो व याला आपण जितके छळू तितक्या लवकर आपली या योनीतून सुटका होईल. म्हणून सुलेमानने मनमोहनसिंगला हजारो प्रकारे छळण्यास सुरुवात केली.

मनमोहनसिंगच्या घरच्या लोकांनी अनेक मांत्रिकांचे उपचार केले, पण उपयोग झाला नाही. शेवटी पंजाबातील संत रोडेवाला ईश्वरसिंह यांच्या दर्शनानंतर प्रेतात्म्याला शांती प्राप्त झाली व त्याने वरीलप्रमाणे हकिकत सांगितली व आपल्याला पुन्हा जन्म द्यावा व ईश्वर भक्तीचा मार्ग आपल्याला द्यावा, अशी विनवणी करणे त्याने सुरू केले.

मनमोहनसिंग हा हिंदू होता, पण त्याच्या देहातून जेव्हा पीर सुलेमान बोलू लागे तेव्हा कुराणातील अनेक आयते पाठ म्हणून दाखवीत असे. लोक ते सर्व रेकॉर्ड करीत. प्रत्येक वेळी आपल्याला आता मनुष्य जन्म मिळणार म्हणून तो परमानंद व्यक्त करी.

एकदा त्याने सांगितले की, मला मनुष्य जन्म मिळाल्यानंतर मी जेव्हा चांगला बोलू लागेन तेव्हा दोन–तीन वर्षे मी माझ्या या मूळ रूपात तुमच्याशी बोलेन व सातव्या आठव्या वर्षी मला सर्व गोष्टींचा विसर पडेल व मी माझ्या नव्या देहाशी तादात्म्य पावेन. नंतर मला काहीही आठवणार नाही.

५ ऑगस्ट १९६८ ला पीर सुलेमानने हिंदू कुटुंबात जन्म घेतला. तत्पूर्वी निसर्गनियमाप्रमाणे सातव्या महिन्याचा गर्भ झाल्यानंतर त्याने मातेच्या उदरात प्रवेश केला होता. पण सुलेमान शक्तिमान आत्मा असल्याने मातेच्या उदरातून तो बाहेर पडून ईश्वरसिंह रोडेवाला या संताकडे येई, सत्संग करी, प्रसाद खाई व परत जाई. हे सर्व तो आपल्या जुन्या माध्यमाच्या मनमोहनसिंगच्याद्वारे करीत असे.

तो लोकांबरोबर खूप गप्पा मारे. आपल्याला मानव देह मिळणार म्हणून परमानंद व्यक्त करीत असे व लोकांना सांगे ! बाबारे ! बघा ! मला जन्म मिळाल्यावर मी सारे विसरून जाईन परंतु तुम्ही माझी ओळख ठेवा व मला सन्मार्गाने नेण्याचा प्रयत्न करा.

शेवटी ५ ऑगस्ट १९६८ ला त्याचा जन्म झाला. चार वर्षांनंतर तो मुलगा एखाद्या ऐंशी वर्षांच्या वृद्धाच्या आवाजात उर्दू बोलू लागला. लोकांनी त्याच्या आवाजाच्या कॅसेट्सही बनविल्या. अनेक वर्तमानपत्रातून व मासिकातून या घटनेला

प्रसिद्धी मिळाली.

वयाच्या आठव्या वर्षी अचानक त्या मुलाला सर्व गोष्टींची विस्मृती झाली व तो एक सामान्य मुलगा झाला. परंतु जे लोक त्या मुलाला ओळखत ते सर्व जाणतात, की या बालकाच्या शरीरात किती जुना आत्मा आहे ते!

ते सर्व त्याला मान देतात.

असे म्हणतात की, मूळ आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे. परमात्म्यापासून विभक्त होऊन त्याला हजारो वर्षे झाली. अनेक योनीतून कर्मानुसार फिरत फिरत, सुख-दुःख, ऐश्वर्य-गरिबी, उच्चयोनी-नीचयोनी असे विविध अनुभव घेत तो पुनश्च परमात्म्याशी तादात्म्य पावतो.

जोपर्यंत ही तादात्म्यता प्राप्त होत नाही, तोपर्यंत एक प्रकारची अतृप्ती त्याला बेचैन करीत राहते. तो श्रीमंतीत राहिला तरी अतृप्त असतो व गरिबीत राहिला तरी अतृप्त असतो. असा हा अतृप्त आत्मा तृप्तीच्या शोधात विविध योनीतून भटकतो. विविध वस्तूंमध्ये तृप्ती शोधतो. तृप्ती त्याला कुठेच प्राप्त होत नाही. मग ईश्वर भक्तीला लागतो, ध्यानधारणा सुरू करतो. तेव्हा कुठे थोडी थोडी मनाला शांती मिळू लागते. थेंबे थेंबे तळे साचे या न्यायाने थेंबा थेंबाने शांती हृदयात साठू लागते व हळूहळू कालांतराने हृदय शांतीने भरून जाते. अपूर्व तृप्तीचा आनंद ओसंडून वाहू लागतो. परमेश्वराशी तादात्म्यता प्राप्त होते.

या जगामध्ये कोणीही हिंदू नाही. कोणीही मुस्लीम नाही. कोणीही ख्रिश्चन नाही. कोणीही ज्यू नाही.

आपण सारे प्रवासी आहोत. आपला देह हेच आपले वाहन आहे व परमेश्वराचे राज्य हे आपले पोहोचण्याचे ठिकाण आहे.

**मानवता हाच आपला खरा धर्म**

**परोपकार हेच धर्माचरण**

**आणि**

**ईश्वरावर प्रेम करणे हाच आपला स्वभाव**

**हेच मानवाचे खरे स्वरूप !**

# समाप्त